

सारविस्तार

भाग : एक

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

सारविस्तार

भाग :एक

(चिंतनक्षण : वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

- शब्दांकन -

श्री. प्रकाश जोशी

*** सारविस्तार – भाग : एक**

पुस्तकरूपाने प्रकाशित दुसरी आवृत्ती : मार्च २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

प्रास्ताविक

श्रींच्या कृपेनं लाभलेल्या जगण्याच्या, अनुभवांच्या, त्यांवरच्या चिंतनांच्या शक्तीचा मी सदैव ऋणी आहे. त्यामुळं लाभलेले अनुभव आणि अभ्यास - हे अत्यंत संक्षेपानं सूत्ररूपानं वचनबद्ध झाले. त्यांतल्या तीनशेपासष्ट वचनांचे एकूण बारा भाग २००६ सालापासून 'चिंतनक्षण' या शीर्षकानं यथावकाश प्रसिद्ध झाले.

घरच्या कौटुंबिक उपासनेत मासिक ज्ञानेश्वरीबरोबर, शनिवार संध्याकाळचं साप्ताहिक निरूपण हा अनेक उपक्रमांतला वर्षानुवर्षं चाललेला एक भाग आहे. त्यासाठी त्यात्या वेळी श्रींच्या आज्ञेनुसार सद्गुरुलीलामृत, ईशावास्य, विष्णुसहस्रनाम इथंपासून अलीकडच्या समर्थसंकीर्तन, निरंजनसंकीर्तन, निवृत्तिनाथसंकीर्तन-अशी अनेक निरूपणं झाली. त्यातच एकदा याच चिंतनवचनांचं निरूपण घ्यायला श्रींनी सांगितलं. ते सांगण्यात, त्यावेळच्या श्रोत्यांना काही लाभ होण्याबरोबरच, स्वतः ज्या चिंतनाचं सार सूत्ररूपानं काढलं होतं, त्याचं माझंच पुन्हा एकदा चिंतन आणि विवरण घडावं, अशी श्रींची इच्छा लक्षात आली. त्यानुसार मध्यंतरी दोन वर्षं पहिल्या साठ वचनांची निरूपणं त्यांच्या कृपेनं झाली. त्या वचनसारांचा पुन्हा एकदा विस्तार झाला. म्हणून हा 'सारविस्तार' आहे. पूर्वी फार थोर ऋषींच्या आणि भगवद्भक्तांच्या वाट्याला आलेलं हे आपल्याच सूत्रांचं विवरण करण्याचं भाग्यच नव्हे तर, त्या विवरणाच्या शब्दांकनाचं संस्करण करण्याचं भाग्यही श्रींच्या कृपेमुळं मला मिळालं, याबद्दल मी कृतज्ञ आहे. अनेकदा वेळेअभावी आणि विवरणाच्या ओघामध्ये विस्तारात राहिलेल्या त्रुटी या संस्करणात दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. याचे पुढचे भाग श्रींच्या इच्छेनुसार यथाकाल प्रसिद्ध होतील.

ज्या परगावच्या साधकांना या शनिवार-निरूपणांना येता येणं व्यवहारानं अवघड आहे पण, ज्यांची ते श्रवण करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा साधकांपैकी एक ज्येष्ठ साधक श्री.प्रकाश जोशी यांनी या निरूपणांचं ध्वनिमुद्रण तर नंतर सातत्यानं ऐकलंच पण एक स्वयंअभ्यास आणि साधना म्हणून ते शब्दबद्ध करून स्वयंस्फूर्तीनं आणूनही दिलं. या सगळ्या कामाच्या निमित्तानं आपण स्वतः दूर असूनही साधनेत राहायला किती मदत झाली, याचं प्रांजळ निवेदनपत्रही त्यासोबत त्यांनी दिलं.

साधनेसाठी त्यांना झालेली ही मदत पाहाता, या शब्दांकनावर संस्कार करून, हे सर्वच जिज्ञासूंसाठी पुस्तकरूपानं देण्याचा निर्णय झाला. या निष्ठेच्या कामाबद्दल मी श्री.जोशीसाहेब यांचा कृतज्ञ आहे. पण, या प्रयत्नांचा ज्यांना साधनेला पुढं उपयोग घडेल, ते भावी वाचकही श्री.जोशी यांच्या या सेवेबद्दल ऋणी राहातील, असा मला विश्वास वाटतो. त्यांची ही सेवा श्रींनी रुजू करून घ्यावी आणि त्यांना विपुल नामप्रसाद द्यावा, अशी मी संतचरणी प्रार्थना करतो.

अशा तऱ्हेनं संतांच्या कृपेनं आणि साधकांच्या साहाय्यानं घडणारी ही विवरणसेवा वाचकांच्या चरणी शुभेच्छापूर्वक अर्पण करतो...

- सुहास पेठे

सारविस्तार : भाग १

अनुक्रम

निरूपण

क्र. १ - वचन क्र. १ : साधना करणे, हा माणसाला मिळालेल्या मर्यादित कर्मस्वातंत्र्याचा, सर्वश्रेष्ठ उपयोग होय. .. ५

क्र. २ - वचन क्र. २ (निरूपण - पूर्वार्ध) : नामाचे खरे महत्त्व समजण्यास, मानवी जीवनातील अपूर्णत्वाची कल्पना येऊन, ते मान्य व्हावयास हवे. ..१८

क्र. ३ - वचन क्र. २ (निरूपण -उत्तरार्ध) : नामाचे खरे महत्त्व समजण्यास, मानवी जीवनातील अपूर्णत्वाची कल्पना येऊन, ते मान्य व्हावयास हवे. ..२६

क्र. ४ - वचन क्र. ३ : शरणागती ही अवस्था आहे, काही साधण्याचा मार्ग नव्हे. ..४२

क्र. ५ - वचन क्र. ४ : बागेत लावलेल्या रोपाची काळजी घेतो तेवढी तरी आपल्या साधनेतल्या संकल्पाची काळजी आपण घ्यायला हवी. ..४९

क्र. ६ - वचन क्र. ५ : भक्ताला परिस्थिती अनुकूल - प्रतिकूल नसते तर ती भगवंताकडं जायला फक्त 'उपयुक्त' असते. ..५९

क्र. ७ - वचन क्र. ६ : प्रपंच मोडू नये व परमार्थ सोडू नये, हा आपला मध्यम मार्ग आहे. ..७३

क्र. ८ - वचन क्र. ७ : कर्तृत्वाने हरला आणि ते माणसाला कळले म्हणजे भगवंताची कृपाच झाली म्हणायचे. ..८२

क्र. ९ - वचन क्र. ८ : साधना म्हणजे, अनेक अडथळ्यांची, सात्त्विक शर्यतच आहे. ..९६

चिंतनक्षण

वचन क्र. १ * निरूपण : क्र. १

साधना करणे, हा माणसाला मिळालेल्या
मर्यादित कर्मस्वातंत्र्याचा, सर्वश्रेष्ठ उपयोग होय.

आपल्याला कर्मस्वातंत्र्य आहे, याबद्दल शंका नाही. सर्वसाधारणपणे आयुष्यात खूप उशिरा जाणीव होते की, ते मर्यादित आहे. आपल्याला सुरुवातीला वाटतं की, खूप स्वातंत्र्य आहे - आपण खूप काही आणि काहीही करू शकतो. त्या जोरात मनुष्य त्याच्या उपक्रमांना, कामांना लागतो. हळूहळू वय वाढतं तसं त्याच्या लक्षात येतं की, कर्मस्वातंत्र्य मर्यादित आहे. साठीला आलं की वाटतं, आपण फार काही करू शकणार नाही. त्यातल्या त्यात घर बांधण्यापर्यंत मजल जाते. नावलौकिक होतो काहींचा. एवढ्या मर्यादित स्वातंत्र्यात जाणार कुठे मजल ? प्रपंच होतो, मुलांची शिक्षणं होतात, अशा कुठल्यातरी टप्प्यापर्यंत मनुष्य पोचतो. तो म्हणतो, हे एवढंच कर्मस्वातंत्र्य आपल्याला दिसतं. बाकीचं आपल्या हातात नाही. त्यातल्या त्यात मुलांची लग्न झाली, सुना - जावई आले की, त्याची खात्री होते. खरं तर त्याच्या आधीच हे ठरलेलं असतं.

कर्म करण्याचं स्वातंत्र्य, साधं एक 'बोलण्याचं स्वातंत्र्य' आहे ना, ते बघू, त्याचा विचार करू. घरात एखादा पदार्थ झाला तर आपल्याला सांगण्याचं स्वातंत्र्य आहे का, की, तो कसा झाला आहे ? आम्हाला आहे बरं का ! तरी तेसुद्धा मर्यादितच आहे. प्रत्येकाला मर्यादितच स्वातंत्र्य आहे. चांगला झाला म्हणायलाच पाहिजे, नाही का ! त्या दृष्टीनं विचार केला तर, त्यात पुन्हा लक्षात ठेवलं पाहिजे की, दुसऱ्या कोणी केलेलं चांगलं झालं,

असं मात्र म्हणायचं नसतं !

जे हुशार लोक असतात ना, ते हे ओळखून असतात. एक वेळ, घरच्यांना चांगलं नाही म्हटलं तर चालेल, पण दुसऱ्या कुणाला मात्र ते चांगलं झालं, असं म्हणत नाहीत. त्यातल्या त्यात चांगलं कुणाला म्हणायचं झालं तर, एखाद्या हॉटेलला म्हणतात, म्हणजे कुणाला चांगलं म्हणण्यात जी आफत येते ती येत नाही. हॉटेल सार्वजनिक, तिथं कुणालाही जाता येतं. आपल्या प्रपंचातलं साधं चांगलं म्हणण्याचं स्वातंत्र्यसुद्धा असं आहे, त्याला काय करणार ? असं हे आपलं स्वातंत्र्य मर्यादित आहे.

बरं, बोलावं हे ठीक आहे. माणसाला न बोलण्याचंसुद्धा स्वातंत्र्य असतं. ते तरी खरं आहे का ? समजा पदार्थ केला आणि आपण मुकाट्यानं तो खाल्ला, काहीही बोललो नाही. तर ते पण स्वातंत्र्य आपल्याला नाही, हे आपल्या लक्षात येईल. आता थोडेफार भाग्यवान असतील की, त्यांना ते स्वातंत्र्य असेलही. पण बऱ्याचा जणांना तेही स्वातंत्र्य नसतंच. अशा प्रकारे बोलण्याचं स्वातंत्र्य आहे, न बोलण्याचंही स्वातंत्र्य आहे. पण खरं तर दोन्हीही नाहीत. तशी आहेत, नाही असं नाही. पण मर्यादित आहेत ! थोड्या वेळानं जरा मूड बघून तुम्ही सांगू शकता की, मागच्या वेळचं याच्यापेक्षा जास्त चांगलं झालं होतं. प्रापंचिक माणूस काय करणार, त्या क्षणी तरी तो म्हणतो, वा ! वा ! एकदम छान झालं आहे. जमलं तर नंतरचं बोलेल नाहीतर गप्पच रहावं लागेल. तर असं मर्यादित स्वातंत्र्य आहे, एवढंच यातून लक्षात येतं.

असं हे साधं प्रापंचिक स्वातंत्र्य आपण बघितलं. प्रपंचात जरा पुढं बघितलं तर मुलांना कुठल्या माध्यमात शिक्षण द्यायचं, त्याला कोणत्या 'साईड'ला घालायचं ? बहुतेक करून हे निर्णय कोण ठरवतात, ते आपल्याला माहिती आहे. त्यांच्या मताप्रमाणं होतं. पुढं मुलं मोठी झाली की, पालक

बाजूला राहतात आणि मुलंच ठरवतात. मग कर्मस्वातंत्र्य कसं मर्यादित ते हळूहळू लक्षात येतं. ही कर्मस्वातंत्र्याची माणसाची अवस्था आहे.

आपण क्षणभर असा विचार करू की, माणसाला कर्मस्वातंत्र्य मिळालेलं आहे की नाही ? तर ते मिळालेलं आहे. त्याला काहीच स्वातंत्र्य नाही अशी त्याची परिस्थिती नाही. त्याच्याकडे मर्यादित का होईना, स्वातंत्र्य आहे. श्री महाराजांच्या भाषेत सांगायचं झालं तर तुरुंगात कुठं रहावं व कसं रहावं, अशा तऱ्हेचं स्वातंत्र्य मनुष्याला आहे. पण ते तुरुंगात आहे, हे मात्र नक्की. श्रीमहाराजांच्याही पूर्वी श्री ज्ञानेश्वर महाराज यांनीसुद्धा म्हटलं आहे की, 'देहाच्या कैदेत न पडावे'. म्हणजे देहात आला म्हणजे सरळ सरळ पारतंत्र्य त्याच्या वाट्याला आलं आहेच.

हे पारतंत्र्य का वाट्याला आलं ? तर त्यानं काही कर्म केली म्हणून ते त्याच्या वाट्याला आलं. असं योगायोगानं उगाच वाट्याला आलं असं म्हणतात, तसलं काही जगात नाही. तर सर्व व्यवस्थित कर्मसिद्धांताप्रमाणं ते पारतंत्र्य आलेलं आहे. म्हणूनच आपण म्हणतो की, मनुष्य विशिष्ट ठिकाणी आला, विशिष्ट एक पद्धतीचा तो आहे, त्याची मनाची विशिष्ट ठेवण आहे आणि ते त्याच्या हातात नाही म्हणजेच तो परतंत्र आहे. तेव्हा मनुष्याच्या कर्मस्वातंत्र्याची परिस्थिती ही अशी आहे. आता याही परिस्थितीत त्याला थोडं स्वातंत्र्य आहे, नाही असं नाही. ते कसं आणि कितपत आहे, ते आपण बघू.

एक विचाराचं स्वातंत्र्य आणि दुसरं कृतीचं स्वातंत्र्य, अशा माणसाच्या स्वातंत्र्याच्या दोन मूलभूत कल्पना आहेत. त्यांचा उपयोग करणारे किती हा वेगळा प्रश्न आहे. त्या स्वातंत्र्याची जाणीव नसल्यामुळं मनुष्याला त्याचा नीट वापर करता येत नाही, हेही खरं आहे. पण हे दोन्ही स्वातंत्र्याचे प्रकार मर्यादित आहेत. त्यांना देहाच्या मर्यादा आहेत, साधनांच्या मर्यादा

आहेत, शक्तीच्या मर्यादा आहेत. देहाची मर्यादा असल्यामुळे स्थलकालाची मर्यादा आली. समजा या क्षणी मला दुसऱ्या गावाला जावंसं वाटलं तर, इथं बसल्या जागेवरून नाही जाता येत. इथली जागा सोडून त्या गावी जावं लागतं. त्यासाठी काही वेळ लागतो. जाण्याएवढी शारीरिक शक्ती लागते. म्हणजे त्याच्यावर स्थलाची, कालाची व शक्तीची मर्यादा आहे.

कधीकधी आपण म्हणतो ना की, हे माझ्या आटोक्याबाहेर आहे. तर हे आटोक्याबाहेर आहे म्हणजे काय आहे ? आटोक्याबाहेर म्हणजे तिथं मनुष्याचं काही चालत नाही. शक्तीनं चालत नाही, देहानं चालत नाही, स्थलकालानं चालत नाही. हे सगळं समजून घेतलं तर कळतं की, अशा तऱ्हेनं आपल्याला मर्यादा आहेत. आता असं आहे म्हणून दुःखी किंवा निराश होण्याचं काही कारण नाही. ते कसं ते पाहू.

फक्त त्यापूर्वी एक लक्षात घेणं उपयोगी आहे ते असं की, बेसावधपणे मनुष्याचं आयुष्य भरकटतं आणि आयुष्याचं सार्थक होत नाही. त्याचं कारण, आपल्याला असलेल्या स्वातंत्र्याची आणि त्यावर असलेल्या मर्यादांची कल्पना मनुष्याला लवकर येत नाही. त्यासाठीच सुरुवातीलाच या कल्पनेची आपण इथं ओळख करून घेतली आहे. अगदी लहानपणी जर ही कल्पना आली तर बरं होईल की, माझ्यावर देहाची, कालाची आणि शक्तीची मर्यादा आहे. आता त्या मर्यादा लक्षात आल्या तर उपयोग हा होईल की, ठीक आहे, हरकत नाही, असू देत मर्यादा. भले मी देहाच्या तुरुंगात असेन, पण या देहाच्या तुरुंगात मला विचार आणि कृती दोन्ही स्वातंत्र्यं दिलेली आहेत आणि मी त्यांचा वापर करू शकतो.

आता देहाच्या साहाय्यानं कृतीचं स्वातंत्र्य दिलं आहे. त्याचा विचार करू. कृतिस्वातंत्र्याला मर्यादा लावली हे बरोबर आहे. देह झाला तरी तो त्रिगुणाचा मिळून आहे, हे त्याच्यामध्ये वैशिष्ट्य आहे. प्रत्येकाला अनुभव

येतो की, आपण जन्माला आलो तर त्रिगुणाची सत्त्व-रज-तम अशी सगळीकडं मर्यादा लागली आहे. काही तमोगुण आहेत आणि ते दूर करणं आपल्या हातात नाही. काही वेळेला मनात वाईट विचार येतात आणि ते थांबवता येत नाहीत. विचारांचं तर स्वातंत्र्य आहे, पण या वाईट विचारांचं काय करावं, ते कळत नाही.

माणसामध्ये रजोगुण आहेत. बारा-बारा तास, अठरा-अठरा तास तो काम करत असतो. आज नोकरीमध्ये काय परिस्थिती आहे ? म्हणजे देह आहे, कर्म आहे, त्याचं स्वातंत्र्य आहे. पण त्याच्या कृतीला एका बाजूनं मर्यादा लावली आणि दुसऱ्या बाजूला बारा तास, अठरा तास काम करायला तो मोकळाही ठेवला आहे. मनुष्याला विचार आणि कृतीचं स्वातंत्र्य दिलेलं आहे, आणि देहाच्या कैदेतून सुटण्यासाठी त्या स्वातंत्र्याचा उपयोग करण्याची तरतूद त्रिगुणातून दिलेली आहे. पण त्रिगुणातून पलीकडं जाण्याचं सामर्थ्य त्रिगुणात कुठून आलं, ते मात्र कळत नाही. मनुष्याच्या कृतींमध्ये तामस कृती, राजस कृती व सात्त्विक कृती आहेत. सात्त्विक कृतीच्या पलीकडं जाण्याचीसुद्धा कृती त्याच्याकडं आहे. वास्तविक जर या तीन गोष्टींचा मनुष्य बनलेला आहे, तर जास्तीत जास्त अपग्रेडेशन-उन्नयन तो काय करील ? तर, तो सात्त्विक कृती करू शकेल - एवढंच तो करू शकेल. वाईट विचार मनात येतात. पण वाईट कृती करत नाही. सतत कामाची राजस कृती तो करतो, तसंच तो शांतपणे बसूपण शकतो. सतत कामामुळं तो थकतो, त्रस्त होतो, मग त्यानं शांत बसावं, मौन पाळावं. म्हणजे आता बोलण्याचं स्वातंत्र्य आहे, बोलण्याची सोयपण आहे, पण मौनाची सोयसुद्धा लागली.

मनुष्याला त्रिगुणांत असताना, त्रिगुणापलीकडं जाण्याचं जे सामर्थ्य दिलेलं आहे ते उलगडत नाही. पण ते सामर्थ्य त्याच्याकडं आहे. तर, हे त्रिगुणात असताना त्रिगुणापलीकडचं सामर्थ्य शोधून काढणं आणि ते वापरणं

यालाच 'साधना' म्हणतात. श्री तुकोबांनी त्यांच्या हरिपाठामध्ये 'पुनरपि संसारा येणे नाही' असं म्हटलं आहे. ही प्रतिज्ञा करून ते जगू शकले आणि त्यांना पुन्हा यावं लागलं नाही, परत देहाच्या कैदेत पडावं लागलं नाही - हे त्यांना कसं साध्य झालं ? तर या मर्यादित कर्मस्वातंत्र्याचा अत्युच्च उपयोग करून ते त्यांनी साधलं. तो अत्युच्च उपयोग म्हणजे 'साधना' होय.

माणूस जन्माला आला तर, त्याला नुसतं बसून राहता येत नाही. अखंड श्वासापासून, खाण्यापिण्यापासून सगळी कर्मं त्याला मृत्यूपर्यंत करत राहावी लागतात. इतकी या कृतींची, जन्माची अशी सगळी अनिवार्यता-कंपल्शन त्याच्यावर आहे. सतत त्याला कृती करत रहावं लागतं. अशी कृतीची टाच त्याच्यावर आहे. विचारांची अनिवार्यता पण तशीच आहे. विचार होत राहतात. ते थांबवणं आपल्या हातात नाही. एका बाजूनं जन्माचा काटा लागलेला आहे. पण त्यात कृतींच्या स्वातंत्र्याची एक सवलतही आहे.जर जाणीव झाली तर, तो काटा काढायला दुसरा काटा ठेवला आहे. तो काटा काढावा आणि दुसरा टाकावा अशी तरतूद आहे. श्रीमहाराज म्हणतात तसं, एका काट्यानं दुसरा काटा काढावा आणि दोन्ही फेकून द्यावेत.

मनुष्याला कळलं की, तो चुकीच्या कृतीत अडकला आहे, मग योग्य कृतीसाठी त्याला पुन्हा कृतीच लागेल. काटा आत गेला की, त्याचं दुःख होतं. हे नुसतं कळून चालत नाही. तो काटा काढण्याची कृती करावीच लागते. म्हणजे एकदा काटा आत गेला, तेव्हा ज्या वेदना झाल्या असतील त्याच वेदना दुसरा काटा घालताना परत होणारच. त्यामुळं कृतीला पर्याय नाहीच. पण ती काटा काढण्याची कृती आहे, दुसरा काटा घालण्याची नाही. आणि ही कृती म्हणजे 'साधना' होय. या जन्मात दुसरा काटा निर्माण न करणं, म्हणजेच 'साधना' होय.

आपल्या अनेक कृती, या पहिल्या कृतीबरोबर, दुसरी कृती निर्माण

करतात. घर बांधलं पण, पुढं त्या घराचं काय होईल, ते विकलं जाईल ना, अशी काळजी त्याला लागते. म्हणजे दोन काटे निर्माण झाले. असं कित्येक गोष्टीमध्ये घडतं. घराचं उदाहरण हे एकच आहे, असं नाही. तर असं सगळ्या कृतींचंच होतं. तर, मी जी कृती करतो ती मला सोडवणारी कृती आहे की, मला बंधनात टाकणारी आहे ? असा विचार मनुष्याच्या मनात आला तर तो 'साधते ज्यास तो थोर, अंती मुक्त सदा असे' असा होईल.

माणसाला कर्म करणं अनिवार्य आहे. त्याला पर्याय नाही. तुम्ही गरीब-श्रीमंत कसेही असा, कुठेही असा, त्यात कर्माला पर्याय नाही. म्हणजे ती बाजू कर्मानं लागली आहे. पण त्याचबरोबर त्याच कर्मानं मुक्त होण्याची तरतूद त्याला दिली आहे. ती तरतूद म्हणजे 'साधना' होय. कर्मांनी बद्ध झाला, म्हणूनच तो जीव जन्माला आला आणि पुन्हा तो कर्म करीतच राहणार. म्हणजे आणखीन बद्ध होण्याची तरतूद आहे. एवढं शिक्षण म्हणजे साधनेचा श्रीगणेशा शिकणं होय.

मनुष्याची तामस, राजस आणि सात्त्विक कृत्यं आहेत आणि या प्रत्येक कृत्यामध्ये त्याला बांधून ठेवण्याची क्षमता आहे. तामस कृती केली तर एका अर्थानं काही विशेष नाही. कारण त्याला त्याची शिक्षा होणं याच्यातच त्याचा परिणाम आहे. त्यामुळं तमोगुण बांधतोच, त्यात प्रश्नच नाही. राजस कृती म्हणजे सतत काम करीत राहाणं होय. त्या कृती केल्यावर त्यातूनसुद्धा मनुष्याच्या मागे लागणाऱ्या गोष्टी निर्माण होत असतात. ऑफिसमध्ये त्रास वाटणाऱ्या कामात चुका होऊ नयेत म्हणून, कामच कमी करायचं, असे काही लोक आपल्यात असतात. तर काम कमी करणं, हा काही खरा मार्ग नाही. निर्दोष काम करणं हा खरा मार्ग होय. कर्म कमी करणं हा जीवनाचा हेतू नाही. असलेली कर्मं निर्दोष करणं हा जीवनाचा हेतू आहे. आणि तो म्हणजेच 'साधना' होय. असे साधनेचे हे सगळे पैलू आहेत.

तर आता हे आपल्याला कसं साधता येईल ? कर्म तर चुकलं नाही, ते तर करावंच लागेल. कारण माणसाला मर्यादित कर्मस्वातंत्र्य आहे. माझं कुठलं कर्म मला बांधेल किंवा कुठलं मला सोडवेल ? मनुष्य घर बांधू शकतो आणि ते तो दुसऱ्याच्या नावावर देऊही शकतो. पैसा मिळवील आणि दान पण करील. दोन्ही त्याच्या हातात आहे. पोटाला लागेल म्हणून त्याला पैसा तर मिळवावा लागेल. पण पोटापेक्षा जास्त मिळतं ते 'बांधतं' आणि 'बाधतं' देखील. त्यामुळं ते दूर व्हावं असं वाटत असेल तर पोटापेक्षा जे जास्त आहे, ते दिलं की, दुसऱ्याचं पोट भरेल व त्या कर्मातून मनुष्य मुक्त होईल.

अशा तऱ्हेनं मनुष्य सर्व क्षेत्रात काम करू शकतो. काही चांगलं काम केल्यानंतर माणसाला प्रसिद्धी मिळते. प्रसिद्धीच्या मोहात माणूस अडकला नाही की त्यातला बंध संपला. एखादा उत्तम गायक आहे. तो प्रपंचासाठी, स्वानंदासाठी गाण्याची मैफल करील, भलावणीमध्ये पडणार नाही. पण दाद मिळत नाही म्हणून त्याला जर त्रास वाटला, तर तो बंधनात अडकला. त्याचं गाणं सोडवणारं राहिलं नाही, ते बांधणार कर्म झालं.

सुरुवातीला जे पदार्थ करण्याचं आपण उदाहरण बघितलं, त्याचं उत्तरही असंच आहे. स्वैंपाक हे कर्म आहे, ते उत्तमात उत्तम करण्याचा विचार करणं आणि कृती करणं, याचं स्वातंत्र्य आपल्याला आहे. पण त्याचबरोबर पुढं पण स्वातंत्र्य आहे की, खरोखरच प्रतिक्रिया आली ती घ्यावी. प्रतिक्रियेची अपेक्षा करू नये, आणि मागू पण नये. आणि समजा नाही प्रतिक्रिया दिली, तर त्रासही होऊ नये - देऊ नये. म्हणजे मग स्वैंपाकाचं कर्म पूजेसारखं कर्म होऊ शकतं. कर्मामध्ये मुक्त करण्याची क्रिया निर्माण होते, ती कशी होते ते कळत नाही, पण मुक्त होता येतं. ते कर्म 'साधन' होतं. स्वैंपाकाचं साधं कर्म करूनसुद्धा माणूस मुक्त होऊ शकतो. त्याला

कुठं जावं लागत नाही आणि ते शक्य आहे.

अनेक संत आपापली कामं करून मुक्त झालेले आहेत. त्यांच्या वाट्याला अगदी साधी कर्मं आलीत. मडकी थापून कसे मुक्त होतात ते ? साधा तुलाधार, पण तो व्यापार करून मुक्त झाला. व्यापार करीत मनुष्य अडकत जातो, हे आपण बघतोच. अगदी टोकाचं कर्म संतांच्या वाट्याला आलं. मेलेल्या गुराची कातडी काढून, अगदी मांसही करणारे लोक - कसे मुक्त झाले ते ? ते कुठं साधनेला बसलेत, जपाला बसलेत की वनात गेलेत, असं काही त्यांनी केलं नाही. जे काम वाट्याला आलं ते प्रामाणिकपणे करीत राहिले, कशात अडकले नाहीत, काही अपेक्षा ठेवली नाही, पोटाला जे मिळालं ते खाल्लं, स्मरण ठेवलं व आनंदात राहिले आणि ते मुक्त झालेत. कारण त्यांच्या त्याच कर्माच्या मागचा दृष्टिकोन वेगळा आहे. म्हणून मुक्त करणारी कर्मं म्हणजेच 'साधना' होय.

अशी मुक्त करणारी कर्म आपल्याला करता यावीत, हा आपला उद्देश आहे. तर, आताची आपली कर्म आपल्याला बांधतात की, मुक्त करतात - हे ठरवण्याची विचारशक्तीसुद्धा माणसाकडं आहे. तिचा वापर जितका लवकर तो करेल, तितकं चांगलं. उशिरा कळलं, केलं तर, 'जागे तभी सबेरा'असं ठरवता येईल. अगदी पन्नाशीला त्याला सुचलं की, मी जे आता कर्म करतो आहे त्यानं मी बांधला जात असेन, तर पुढच्या जन्माची तयारी करतो आहे. पुन्हा एकदा मर्यादित कर्मस्वातंत्र्य आलं आणि अडकण्याची परिस्थिती झाली. मी जर मोकळा होत असेन तर 'देव भेटे याचि देही' अशी स्थिती आहे. बघाल तसं आहे. आपल्याला आपल्या कर्मांकडं असं बघता येईल का ? तो उत्तम कलाकार असेल, ती उत्तम गृहिणी असेल, तो उत्तम ऑफिस कर्मचारी असेल, तर त्याच्या लौकिक कर्मांमध्येसुद्धा तो मुक्त होऊ शकतो. आपण बघितलं संतांच्या वाट्याला कशाही प्रकारची कर्मं

आली. ती त्यांनी केली आणि ती करताना अशा पद्धतीनं केली की ते बाजूला राहिले आणि मुक्त झाले. हे कर्मांचं कौशल्य माणसाकडं येणं म्हणजे त्याला साधनेची वाटचाल कळणं होय. ही वाटचाला आपल्याला करता यावी, यासाठी हे वचन आहे.

या सगळ्यांत महत्त्वाचं असं आपण लक्षात ठेवू की, आपल्याला मर्यादित स्वातंत्र्य आहे. नाहीतर अमर्याद आहे म्हणून, बेसावधपणे मनुष्य खूप काम, धडपड करतो आणि अपेक्षा बाळगतो. हे लवकर ओळखून निदान आपल्याला आपली हानी टाळता येईल. चांगलं व्हायचं राहू देत पण वाईट तरी होणार नाही.

एक मर्यादित स्वरूपाचं स्वातंत्र्य माझ्याकडं आहे ते ओळखावं. उरलेलं स्वातंत्र्य माझ्याकडं नाही. फक्त जे मर्यादित आहे त्याच्यामध्ये मला त्याची प्रत, गुणवत्ता, संख्या, क्वालिटी बदलता येईल आणि आहे त्या प्रपंचामध्ये मला मुक्त होता येईल. एवढी खात्री बाळगली तर, मनुष्य मग त्याचे मार्ग शोधण्याकडं जातो. ते मार्ग शोधायला मिळावेत म्हणून संतवाङ्मय वाचतो, संतचरित्र अभ्यासतो. संतचरित्रांमध्ये संतांचे प्रपंच जर पाहिलेत तर असंख्य प्रकार दिसतील. लौकिकदृष्ट्या कोणाचे प्रपंच आहेत, कोणाचे नाहीत. असा प्रपंच करून मुक्त होता येईल का, असं वाटावं, असे त्यांचे प्रपंच आहेत. तरीही त्यांच्या ठिकाणी ते मुक्त झालेत. याचा अर्थ त्यांना मिळालेल्या मर्यादित कर्मस्वातंत्र्याचा त्यांनी असा काही उपयोग करून घेतला असला पाहिजे की, लागलेला काटा दुसऱ्या काट्यानं काढला आणि दोन्ही टाकून दिले. ते आपल्याला जमलं तर त्याचा उपयोग होईल, एवढं या वचनात अभिप्रेत आहे.

साधना करणं, हा सर्वश्रेष्ठ उपयोग आहे. इथं सर्वश्रेष्ठ हा शब्द अधोरेखित आहे. समजा, आपल्या जवळ शंभर रुपये असतील तर त्याचा

उपयोग करण्याचे शंभर प्रकार सुचतील. हजार रुपये ज्याच्याकडं असतील त्याला हजार रुपयांच्या प्रमाणात उपयोगाचे प्रकार सुचतील. लाख आणि कोटी रुपये असलेल्यांचं काय होतं, ते आपण बघतोच. काय चारशे खोल्यांचं घर बांधावं असा प्रकारपण असू शकेल. म्हणूनच प्रत्येकाचे ज्याच्या त्याच्या प्रमाणात सर्वश्रेष्ठ उपयोग करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

पण इथं आपल्याला असं अभिप्रेत आहे की, माणसाला असलेलं कर्मस्वातंत्र्य मर्यादित आहे. आता ते मर्यादित आहे हे लक्षात घेऊन, त्याचा जास्तीत जास्त चांगला उपयोग - साधना करणं हा आहे ! बाकीचे सगळे उपयोग हे त्याच्या खाली आहेत. व्यावहारिक, प्रापंचिक उपयोग हे सर्वश्रेष्ठ म्हणता येत नाहीत. कारण आज पोट भरलं तरी परत पुन्हा उद्याची चिंता आहेच. आता पाणी प्यालो तरी दोन तासांनी तहान लागणारच. ज्यामुळं तहानच नाहीशी होईल, असं काही आहे का, तर तो सर्वश्रेष्ठ उपयोग असेल.

कर्मस्वातंत्र्य मर्यादित आहे याची गरिबाला कल्पना असते. सत्संगाच्या ठिकाणी जायला त्याच्या घरापासून पाच रुपये पडत असतील तर तो विचार करतो की, मी अर्धा तास लवकर निघालो तर चालत जाऊन पोचेन. तो पायी येतो, सत्संग करतो, नाम घेतो आणि परत घरी जाण्याचेही पाच रुपये वाचवतो. त्या वाचवलेल्या दहा रुपयात त्याचं रात्रीचं जेवण - वडापाव किंवा झुणकाभाकरी - यानं होतं. तर, तो या दहा रुपयांचा अधिकाधिक चांगला उपयोग करण्याचा प्रयत्न करतो आहे. फक्त अजून चार पायऱ्या वर जायला सांगितलं की, सर्वश्रेष्ठ उपयोग काय आहे ते शोधून काढता येईल.

मग तो सर्वश्रेष्ठ उपयोग आपल्याला नेहमीच्या उपयोगांशी संतुलन करून सोडवावा लागेल. पोटासाठी जेवायला तर लागेलच, त्याशिवाय त्याला सर्वश्रेष्ठ उपयोग काय आहे, तो कळणारही नाही. 'देह जावो अथवा

राहो, पांडुरंगी दृढ भावो' हे म्हणायला ठीक आहे. तेवढी तयारी आपली तरी नाही. श्री शंकराचार्यांचा पाय मगरीनं धरून ठेवल्यावर आता तरी संन्यासाला आईची परवानगी मिळून या प्रपंचाच्या पाशातून मी सुटेन अशी त्यांची तयारी आहे. तीसुद्धा उत्पन्न करून का होईना पण एकदा सुटू दे, अशी त्यांची तयारी आहे. इतकंच काय, मगरीच्या तोंडी जीव गेला तरी त्यांची जायची तयारी आहे. कारण ते मुळातच तसे आहेत, बॉर्न आहेत. आपली तशी तयारी नाही, एवढं ओळखलं तरी खूप झालं.

मग जे काही आहे, ते मी संतुलित करीन, ही त्याच्या पुढची तयारी असेल. उपयोग तर मी करतो आहेच. शंभर रुपयांचा मला उपयोग करायचा आहे त्यातले दहा रुपये देवाला ठेवायची आठवण झाली, तरी खूप आहे.मग नव्वद रुपयांत भागतं. कधीतरी मग ऐंशी रुपये पुरतील, पुढं सत्तर रुपये पुरतील. मग देवाची घरातली जागा जरा वाढेल. नाहीतरी शेवटी कट्ट्याखाली देव ठेवलेले आहेतच ! प्रपंचात जाऊन सर्वश्रेष्ठ उपयोग म्हणजे काय, ते शिकता येतं. आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा किंवा जी आपल्याला मिळालेली आहेत, त्या सगळ्या साधनांचा - रिसोर्सेस-चा आपण सर्वश्रेष्ठ उपयोग भगवंताच्या कामी करतो का ? याच्यावर समाधान कसं मिळेल, किती मिळेल याची साधारण पातळी अवलंबून आहे.

हे कळलं तरी तो सर्वश्रेष्ठ उपयोग आपण करतोच, असं होत नाही. आपण सर्वश्रेष्ठ उपयोग आधी स्वतःसाठी, त्यात राहिलाच तर दुसऱ्यांसाठी मग समाजासाठी असा करतो. आणि असं झाल्यावर मग भगवंतासाठी काय राहिलं ? अशा क्रमानं विचार करावा आणि सर्वश्रेष्ठ उपयोग काय आहे, तो शोधून काढावा. मग निदान तो संतुलित असा तरी करता येईल. मला मिळालेल्या सर्व साधनांचा मग पन्नास टक्के प्रपंचात आणि पन्नास टक्के परमार्थात उपयोग करीन, इथंपर्यंत जाता येईल.

इथं साधनांचा म्हणजे पैशाचा नव्हे. प्रपंचात पैशावाचून अडू शकतं, पण परमार्थात पैशाची जरूरी नसते. मुळात परमार्थ पैशामध्ये नाहीच. नाम घेण्यासाठी पैसा लागतो काय ? आता काही लोक त्याचा बाजार करतात, ती गोष्ट वेगळी आहे. बाजार करणारे प्रापंचिकच आहेत. तुकोबांच्या आणि ज्ञानेश्वरांच्या बाजारात असलं काही नाही. फक्त -हरी नाम मुखी- एवढंच आहे. त्याला कुठं पैसा लागतो ? नाही लागत. म्हणजे तिथं पैशामुळं नडत नाही. सर्व साधनं -रिसोर्सेस म्हटलं, ते तेवढ्यासाठीच. कर्मस्वातंत्र्य हे एक साधन - रिसोर्स - म्हटल्यावर आता आपल्याकडं त्याव्यतिरिक्त काय काय आहे, त्याचा सर्वश्रेष्ठ उपयोग म्हणजे साधना करणं होय. आणि त्या साधनेमुळंच सर्वांत श्रेष्ठ असं समाधान मला मिळवता येईल.

म्हणून आपल्या हातात काय काय नाही - म्हणजे आपल्या स्वातंत्र्याला मर्यादा कोणत्या, ते प्रथम ओळखावं. मग कोणतं स्वातंत्र्य आहे त्याचा विचार करावा. त्या स्वातंत्र्यांचे उपयोग करून सर्वश्रेष्ठ उपयोग शोधून काढावा. त्याला पूरक अशी कर्मं करावी. मग मर्यादित कर्मस्वातंत्र्याचा सर्वश्रेष्ठ उपयोग म्हणजे साधना करणं, असं म्हणण्यातला अभिप्राय आपण समजून घेऊ शकू. त्यानुसार जगून समाधान मिळवू शकू. मुक्त होऊ शकू. ती आपली साधना !

।।श्रीराम।।

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. १२/०७/२००८ च्या निरूपणावर आधारित)

चिंतनक्षण

वचन क्र. २ * निरूपण : क्र. २

नामाचे खरे महत्त्व समजण्यास, मानवी जीवनातील
अपूर्णत्वाची कल्पना येऊन, ते मान्य व्हावयास हवे.

(निरूपण : पूर्वार्ध)

नामाचं खरं महत्त्व समजायला मानवी जीवनातली अपूर्णत्वाची कल्पना येऊन, ते मान्य व्हायला हवं. मनाला अनेक गोष्टींची कल्पना येते पण, ते मान्य होतं असं नाही. मान्य होण्यामध्ये स्वीकार आहे, माहिती नव्हे. देवळात कोण जातो ? पाया कोण पडतो ? ज्या मनुष्याला देव मोठा आहे, हे मान्य झालं आहे, तो. म्हणून तो त्याचे व्याप बाजूला ठेवून सकाळी, संध्याकाळी, आठवड्यातून, गुरुवारी, असं त्या-त्या वेळेला तो देवळात जातो. देव मोठा आहे, ही कल्पना त्याला कळून मान्य झालेली आहे. त्यामुळं त्याचा स्वीकार झाला आहे. स्वीकारामध्ये कृती आहे. स्वीकार आणि कृती झाली की, मान्य होतं.

आता नामाचं खरं महत्त्व समजायला मानवी जीवनातल्या अपूर्णत्वाची कल्पना यावी लागते. अपूर्णत्वाची कल्पना यायला, माणसाला ती कल्पना नाही, असं म्हणायचं आहे का इथं ? तर नाही. नवीन काहीतरी त्याला कल्पना येणार आहे, असं काही नाही. दुपट्यावर असणाऱ्या बाळाच्या शरीरामधलं पाणी कमी पडतं, अपूर्ण पडतं, म्हणून ते ओरडतं. मग अपूर्णत्वाची कल्पना मनुष्याला नाही, असं कसं म्हणता येईल ? आता त्याक्षणी त्या बाळाचं कर्मस्वातंत्र्य ओरडणं एवढंच असतं. नाहीतर, मोठ्या माणसासारखा तो घरात धावून गेला असता आणि ते पाणी घेऊन आला असता. कारण थोडा शक्तीमध्ये फरक पडतो. आतून अपूर्णत्वाची कल्पना आहे, जाणीव

आहे. वैद्यकीय भाषेत त्याच्या वॉटर लेव्हल्स् खाली गेल्या, देहाला कमी पडलं. काहीतरी अपूर्ण राहिलं. तसं शरीरात कोरडेपण आलं. बाळाची मागून घेण्याची पद्धत - म्हणून ते आरडाओरडा करतं. मग आईला कळतं की, काय कमी आहे. ती त्याला दूध किंवा पाणी देते. तर, माणसाला अपूर्णत्वाची कल्पना नाही, असं म्हणता येत नाही. काहीतरी कमी पडतं, याची कल्पना त्याला येते, त्याची जाणीव त्याला आहे.

फक्त एकतर, ते काय कमी पडतं आहे आणि काय आणून ते पुरं होणार - याच्या कल्पना मात्र त्यावर काहीतरी विचार करण्यासारख्या आहेत. पाणी आणून बाळाची तहान पूर्ण झाली. त्याच्या शरीरातली पाण्याची पातळी, जी कमी पडली होती, ती वर आली. आता वर आल्यावर, पुन्हा पाणी पाजलं तर, पाजलेलं पाणी पोटातून बाहेर येतं. कारण, बाळाला ते आता नको असतं.

आपल्या शरीराची फार चांगली रचना आहे की, ते गरजेपेक्षा जास्त स्वीकारत नाही. ते द्यायला गेलात तरी, ते चालत नाही. फक्त मनाचं मात्र असं काही नाही. गरजेपेक्षासुद्धा पाहिजे तेवढं घ्यायला ते तयार आहे. गरजेपेक्षा माणसाला सगळ्यांत जास्त काय चालत असेल, तर पैसा ! मनुष्य माणसांनासुद्धा कंटाळतो. तो म्हणतो, काय कलकल आहे. मग तो सुटी घेऊन जातो दुसरीकडं. असं होतं ना, माणसाच्या बाबतीत ? होऊ देत. पण पैसा कितीही जरी झाला तरी, असं होत नाही. फारच थोड्यांचं होत असेल. कारण कोणीतरी बाहेरचे, आजूबाजूचे, काही वेळेला घरातलेसुद्धा पैशामुळं त्याला त्रास द्यायला लागले की, त्याला त्या पैशाचा त्रास वाटायला लागतो. शरीरामध्ये पाणी घातल्यानंतर त्या विशिष्ट मर्यादेनंतर शरीर पाणी स्वीकारत नाही. तसं इतर बाबतींतल्या अपूर्णतेत होत नाही. खरंतर, पूर्णता आली की, थांबायचं आहे. पण शरीराच्या बाबतीतच पूर्णता येते. बाकी जिथं खरं मोठं

काम आहे, मनाचं - त्या मनाच्या बाबतीत, त्या अंतर्यामामध्ये पूर्णता येत नाही. तुम्ही काहीही करा, जिवाचा कितीही आटापिटा करा की, ते पूर्ण झालं आणि आता मला काहीही करायचं राहिलं नाही, असं होतच नाही. कायम त्यांचं काहीतरी करायचं राहिलेलंच असतं. अगदी यश मिळालं, पैसा मिळाला, काहीतरी लौकिक झाला, घरदार झालं, अगदी सगळं झालं आहे. तरीसुद्धा माणसाला सकाळ उजाडली की, आता काहीतरी करावं, असं वाटतंच. काहीच करण्यासारखं राहिलं नाही, असं झालं तरी अस्वस्थता येते आणि आता काय करावं, असं कुणाला तरी तो विचारतो. निदान दुसऱ्याचा सल्ला घ्यावा, असं तरी वाटतंच. म्हणजे पुन्हा काहीतरी करायचं आणि अगदी लोकांसाठी, जगासाठी काहीतरी उद्योग सुरू करावा, असं वाटतच असतं. त्यामुळं अपूर्णत्वाची कल्पना माणसाला नाही, असं म्हणता येत नाही. ती आहे. तर ती कशाबद्दल आहे हे एक आणि काय आणून ती पूर्ण होणार, ते दुसरं, ते आपण बघू. त्याचा आपण विचार करू.

श्रीमहाराजांचं प्रपंचावर एका चांगल्या अर्थानं प्रेम आहे. माझं पण त्या अर्थानं आहे की, तिथं बरोबर माणसाचं स्वभावदर्शन घडतं. आता अगदी प्रापंचिकांच्या संबंधात, आपण अनेकदा ऐकलं असेल - अगदी साध्या भाषेत की, 'मी काय म्हणत होते' अशी सुरुवात होते. असं ज्या वेळेला सांगतात ना, 'मी काय म्हणत होते' की ओळखावं, काहीतरी अपूर्ण आहे. आता तयार नवरा असेल तर, तो सावध असतो. राग येऊ देऊ नका, आपण मूळ विषय समजून घेत आहोत आणि पटकन समजायला सोपं म्हणून हे उदाहरण घेतलं.

तर, 'मी काय म्हणत होते' म्हणजे त्याच्या लक्षात येतं की, पुढं काहीतरी मागणी असणार आहे किंवा बहुतेक सेटअप बदलायचा असणार आहे. फर्निचर करायचं आहे, का तिचे आई-वडील कायमचे इथं मुक्कामाला

येणार आहेत, का त्याच्या आई-वडिलांना बाहेर पाठवायचं आहे ! अगदी सरळपणे हे वाक्य 'मी काय म्हणत होते' टाकलं जातं. या वाक्यानं जरा अधिक चांगलं कळतं, म्हणून ते घेतलं आहे. तरी, ही अपूर्णत्वाची एकप्रकारची कल्पना आहे. ती आता त्यांना बाहेर पाठवून, ह्यांना आणून, फर्निचर आणून, वस्तू आणून, बाहेर कुठंतरी जाऊन - अशी ती पूर्ण होणार आहे. अशी कल्पना या वाक्यामागं आहे.

पण आत्तापर्यंत असं खूप वेळेला करून झालेलं असतं. बऱ्याच लोकांना इकडचं तिकडं करून झालेलं असतं, नणंदा-भावजयांना बाहेर पाठवून झालेलं असतं, कुणाला घरी आणून झालेलं असतं, कुठल्या वस्तू आणून झालेल्या असतात, वेगळंवेगळं राहून झालेलं असतं तरी, इथं काही पूर्ण होतच नाही, खरं आहे ना ? तरीसुद्धा, बाजारात परत सेल लागला की, वाटतं एक चक्कर मारून येऊ या, कदाचित नवीन आयटेम आला असेल ! अपूर्ण जाणवतं, पण ते पूर्ण करण्याच्या ज्या आपल्या कल्पना आहेत, त्या फक्त याच पातळीवर आहेत.

श्री माणिकप्रभूंचं चरित्र आपण वाचलेलं आहे. त्यातली गोष्ट संदर्भासाठी म्हणून समजून घ्यावी. प्रभूंनी अपार दानधर्म केला. वस्तू, पैसा यांचे ढीग ठेवलेले असायचे आणि भिक्षेसाठी येणाऱ्याला खैरात असायची. त्यासाठी त्यांचे बंधुराज तात्यासाहेब खैरात द्यायला बसलेले असायचे. बाजूलाच प्रभू निवांत बसलेले असायचे आणि कुणाला दिलं तर खारका, फुलं असं द्यायचे. तर,तशी इकडं खैरात चालू होती आणि तिकडं तात्यामहाराज तसंच इतरांची वेदांतचर्चा चालू होती. श्री प्रभू त्यांच्या आनंदात मग्न होते. मनुष्य आला की, तात्यामहाराज त्याला मूठभर पैसे,वस्तू अशी खैरात देणं चालू असायचं. इतरांची वेदांतचर्चा चालू आहे. त्या बरोबरीनं खैरात देणं पण चालू आहे आणि अशा वेळेला खैरात टाकत असताना साधूच्या

कटोऱ्यामध्ये ती टाकलेली खैरात खाली गेली. दुसऱ्यांदा टाकलं, खाली गेलं. तिसऱ्यांदा टाकलं, खाली गेलं. कटोरा वर भरून येत नाही म्हटल्यावर, श्री माणिकप्रभूंचं लक्ष साधूकडं गेलं आणि 'या, साई इकडे या' म्हणत त्या कटोऱ्यात त्यांनी स्वतः दोन खारका आणि फुलं टाकली. बाकीच्यांचं लक्षच नाही की, प्रभूंनी काय केलं ते. आणि त्या दोन खारका आणि फुलं टाकल्याबरोबर 'इतना बस, इतना काफी है' असं म्हणून त्या साधूंनी कटोऱ्यातल्या वरच्या दोन खारका आणि फुलं घेतली. सगळा कटोरा उलटा केला. तर त्या कटोऱ्याच्या पाचपट आकाराच्या रुपयांचा ढीग खाली साठलेला होता. ही प्रभूंची खैरात आहे. प्रभू बंधुराजांना म्हणाले की, काय त्या वायफळ चर्चा करता ! कोण येतं, कोण जातं तुम्हाला कल्पना नाही ! प्रत्यक्ष साई - साईबाबा भिक्षेसाठी येऊन गेलेत. श्री प्रभूंची सत्ता आहे, म्हणून त्यांनी दाखवून दिलं की, तो कटोरा दोन खारका आणि फुलं एवढंच टाकल्यावर भरला.

आपल्या मनाची, कटोऱ्याची अवस्था अशी आहे. काय वाटेल ते टाका त्याच्यात, तो कटोरा काही भरत नाही. पाच मजली घर टाकलं तरी सहावा मजला या वर्षी वाढवायचा असतो. सात मजली घर टाका, दोन घरं टाका, तीन प्लॉट टाका, तो मनाचा कटोरा काही भरत नाही. आपली पूर्णत्वाची नक्की काय कल्पना आहे, हा कोणी विचार करील काय ? अशा तळमळीनं श्री माणिक प्रभूंचा हा प्रसंग सांगितला आहे.

मुळात पूर्णत्वाची आपली नक्की कल्पना काय आहे ? ती मुलाच्या, नातवाच्या ॲडमिशनसाठी इंग्लिश मीडियमच्या शाळेबाहेर दोन दिवस तंबू टाकून, रांगेत उभं राहून, पूर्ण होणार का ? नातवाच्याच ॲडमिशनसाठी, पणत्वाच्या नाही. अमुक एका पद्धतीनं ते पूर्ण होणार आहे, असं सांगता येईल का ? अशा किती घटना आपण पाहतो की, अखंड घटना घडवायचं

आणि ते पूर्ण करण्याचं काम अखंड चाललेलं आहे. यांतल्या कुठल्याही घटनेनं आत्तापर्यंत ते पूर्ण झालेलं नाही. श्री प्रभू जेव्हा दान करतात, त्याच वेळेला, त्या दोन खारका व फुलांनी तो कटोरा भरू शकतो. तो कटोरा रुपयांच्या ढिगानं, वेदांताच्या वायफळ चर्चेनंही भरत नाही. प्रभूंच्या खारका म्हणजे साध्या भाषेत 'भगवंताचं नाम', ते टाका. आपल्या प्रपंचात ते टाकलं की, तो कटोरा भरून येईल. मग बाकीचं काय आहे ? काहीतरी असणार, काहीतरी नसणार. आहे आहे, नाही नाही तसं.

निजामाच्या प्रपंचात काय कमी होतं ? संपत्तीची मोजदाद शक्य होणार नाही, अशी परिस्थिती होती आणि ती अजूनही आहे. आजही आंतरराष्ट्रीय पातळीवर निजामाच्या वारसांमध्ये खटला चालू आहे की, त्या संपत्तीमधला वाटा मिळावा. इतकं असूनही शेवटी मुलींची लग्नं जमत नाहीत, या दुःखात निजाम गेला. आता हे ऐकलंत तर काय होईल, प्रवचनानंतर काय लक्षात राहील, ते सांगाल ? दुर्दैव असं की, इतकं ऐकल्यावर, प्रपंचातली अपूर्णता - मुलींची लग्न जमली नाहीत - हे लक्षात राहणार नाही. पण निजामाचा खजिना मोजदाद न करण्याएवढा अजूनही आहे, हे मात्र लक्षात राहील ! खरं ना ?

त्या खजिन्याच्या एक चतुर्थांश देऊनही त्या मुलींची लग्न झाली असती. पण मुलींची लग्न त्याच्या हयातीत झाली नाहीत. माणसाच्या जीवनात अशी अपूर्णता आहे. त्यात प्रभूंचा, भगवंताचा हात आल्याशिवाय ते पूर्ण होणार नाही. निदान प्रपंचाच्या एका मर्यादेत तरी, ते पूर्ण होणार नाही, हे नक्की. प्रभूंच्या खारका आणि फुलांनीच तो कटोरा भरला ना ? काहीही कॉम्बिनेशन-परम्युटेशन करून बघा की - हे करू, त्याला बाहेर काढू, हे आणू, भावजया-नणंदा बाजूला राहू देत, घरांचे प्रकार बदलून बघू, फर्निचर बदलून बघू - पुन्हा आपलं अपूर्ण आहे तसंच आहे. आत टाकलं की,

निघून जातं सगळं, पुन्हा कटोरा रिकामाच.

श्री महाराजांचं म्हणणं नेहमी प्रॅक्टिकल-व्यावहारिक असतं. मी जी माणसं जोडून ठेवली आहेत, त्यांचं सगळं व्यवस्थित करायला पाहिजे. आपल्याला रोज काहीतरी काम पाहिजेच की ! नुसतं नाम म्हटलं तर, दिवसभर करणार काय ? नवरा-बायको, मुलं-बाळं, त्यांचं पोट-पाणी चालू आहे, त्यामुळं त्यांचं सगळं व्यवस्थित करायचं. माणसं येतील, जातील त्यांचं करत राहायचं, काय ढीग लावायचा तो लावायचा. पण या सगळ्यानं आपला प्रपंच पूर्ण होणार आहे, अशी कल्पनासुद्धा मनाला शिवू द्यायची नाही. माझं मन असल्या प्रपंचातल्या गोष्टी करण्यानं आनंदानं भरून जाईल, असं चुकूनसुद्धा वाटू द्यायचं नाही. अजिबात नाही. परत उद्या सकाळी त्या कटोऱ्यासारखं, काहीही टाका त्यात, रिकामा तो रिकामाच राहणार. म्हणूनच खऱ्या अपूर्णत्वाची कल्पना आपल्याला यायला पाहिजे, हा आपला मूळ सिद्धांत आहे.

या सगळ्या दृश्यामध्ये सगळं अपूर्ण म्हणजे अपूर्णच आहे. कुणी पूर्ण झालं, असं म्हणत असतील तर, तो भ्रम आहे. माझा प्रपंच पूर्ण झाला, असं खूप लोक सांगतात. पण सकाळी उठून पुन्हा, मला दूध आणू दिलं नाही, पेपर आणू दिला नाही, मी हे करतो, मी ते करतो, मी हे आणतो, असं त्यांचं सुरूच असतं. तुमचा प्रपंच पूर्ण झाला ना, मग स्वस्थ रहावं. आपण आज जिवंत आहोत तर, काहीतरी काम काढून करीत राहिलं तर, हरकत नाही, पण जी अस्वस्थता त्यात राहाते, ते वाईट त्याच्यातलं. सुनेनं म्हटलं की, तुम्ही कशाला केर काढता, मी काढते. तर त्यात आनंद मानावा की नाही ? ती केर काढेल, किंवा तिची ऐपत असेल तर ती, दुसऱ्याकडून काढून घेईल, चांगली गोष्ट आहे ! पण याच्यावरती कशाला पैसे उधळता, प्रपंचात काटकसर पाहिजे, स्वतः शरीरकष्ट करायला नकोत, पैसा आहे

म्हणून हे सुचतं आहे - ही अस्वस्थता आहेच.

म्हणजे देहाच्या बाबतीत असो, माणसांच्या बाबतीत असो, निसर्गाच्या बाबतीत असो, वस्तूंच्या बाबतीत असो - दृश्यात कुठं पूर्णता येणं किंवा आणणं शक्य नाही. ती बाहेर कुठं आणणं शक्य नाही. बाहेरून कुठून आणणं शक्य नाही. जे मन अंतर्यामी आहे - असमाधानी आहे - अपूर्ण आहे, ते समजून घेऊन, तिथंच ती पूर्णता आणणं शक्य आहे. ते कसं शक्य आहे, त्या बाबतीत नामाचा संबंध आणि महत्त्व काय आहे, ते आपण पुढच्या वेळी समजून घेऊया.

।। श्रीराम ।।

(उत्तरार्ध : निरूपण क्र. ३)

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. १९/०७/२००८ च्या निरूपणावर आधारित)

चिंतनक्षण

वचन क्र. २ * निरूपण : क्र. ३

नामाचे खरे महत्त्व समजण्यास, मानवी जीवनातील अपूर्णत्वाची कल्पना येऊन, ते मान्य व्हावयास हवे.

(निरूपण : उत्तरार्ध)

आपण माणसाच्या आयुष्यातलं अपूर्णत्व पाहातो आहोत. अनेकांनी अर्थात याच्यावर पूर्वी विचार केलाही नसेल. तसं असलं तर, तो विचार आज करू. कारण, अपूर्णत्व आहे आणि ते टळत नाही, हे सत्य आहे. अपूर्णत्व कशामुळं येतं ? तर, माणसाच्या आयुष्याला पूर्णत्व आणण्याच्या त्याच्या कल्पना मर्यादित आहेत आणि त्या अमलात आणण्याच्या त्याच्या कुवतीसुद्धा मर्यादित आहेत. म्हणून आयुष्य अपूर्ण राहातं.

माणसाच्या कुवतींना मर्यादा असली तरी, त्या मर्यादा कळण्याची शक्ती त्याच्याकडं आहे ! ही शक्ती लक्षात आली, वापरली तर, अपूर्णता कळू शकते. ती मान्य व्हायला, ज्या-ज्या गोष्टींच्या अपूर्णतेची कल्पना येते, त्यांचा अनुभव पाहावा. त्यामुळं आपल्याला अपूर्णता समजू शकते. तीन प्रकारच्या अपूर्णता माणसाच्या आयुष्यात असतात. त्यांचा अनुभव कुणीही घेऊ शकतो. याची आपल्याला अर्थात कल्पना असेलच. पहिलं म्हणजे जगातलं सगळं कळणं. आपल्याला आपल्या एवढ्याशा प्रपंचातलं सगळं कळत नाही, ही वस्तुस्थिती आहे तर, सगळ्या जगाचं कसं कळणार ? आता काहींना आपल्याला सगळं कळलं आहे, असं वाटतं, त्यांची गोष्ट सोडा. तो अहंकारामुळं निर्माण झालेला एक भ्रम आहे. आपण तो ओळखून सोडून दिला तरी चालेल. म्हणून या अर्थानं कळण्याच्या बाबतीत - ज्ञानाच्या

बाबतीत - माणूस अपूर्ण राहातो.

दुसरं कर्मांच्या बाबतीत. जितकी, ज्या प्रकारे सुचतील, तितकी कर्मं माणूस करतो. उद्देश काय की, अपुरं आहे ते पुरं करावं. आयुष्यातली सगळी व्यावहारिक कर्मं आपल्या हातून घडावीत. घरात नसलेल्या वस्तू नाही का आपण आणीत ! प्रत्येक वस्तू आणताना, असं वाटतं की, आता हे पुरं होणार ! पुढं काय होतं, ते आपल्याला ठाऊकच आहे. नेमकं सहज म्हणून शेजाऱ्यांकडं जावं तर, आपल्याला माहीत नसलेली तिसरीच वस्तू त्यांच्या घरी प्रत्यक्ष दिसते. म्हणजे आधी माहितीनं अपुरं - ज्ञानानं अपुरं, मग असं कर्मानं अपुरं. पण हे लक्षात येत नाही. मग करा चौकश्या, ते कुठून आणलं, हुडका, खर्च करा, ती वस्तू आणा. हे आयुष्यभर करूनसुद्धा पुन्हा कर्मानं काहीतरी अपुरं राहातंच. प्रत्येकाच्या आयुष्यात शरीरप्रकृती, नातेवाईक, समाज, शिक्षणं, मान्यता, संबंध, पैसा, लग्नकार्यं, मुलं-बाळं, घर - अशा सर्वसाधारण गोष्टी झाल्या म्हणजे ते आयुष्य पूर्ण झालं, अशी एक कल्पना असते. अनेक माणसं त्यादिशेनं आयुष्यभर धडपडत असतात. तरीसुद्धा, आपण आपलाच काय इतरांचाही अनुभव पाहावा की, इतकी कर्मं या आयुष्याला पूर्णता आणण्यासाठी केली तरी, कुणी नातेवाईक दुरावतो, कुणी अकाली जातं, कुणाची शिक्षणाची बाजू कमी पडते, कुणाला पैसा कमी पडतो, कुणाला हे जमतं पण शरीर साथ देत नाही, कुणाला ऐपत असून - घरदार असून साधी पार्किंगला जागा नाही म्हणून ऐपत असून गाडी घेता येत नाही,कुणाला सगळं अनुकूल पण लग्न होत नाही - अपूर्णतेला अंत नाही, हे खरं.

दुसरी कर्मांतली अपूर्णता त्या त्या कर्माच्या बाबतीत असते. जसं सहा-सहा महिने तयारी करून, अगदी बारकाईनं लक्ष ठेवून, लग्नाची प्रत्येक गोष्ट पुरी करायचा प्रयत्न करावा तरी, कुणाची तरी, जवळच्याचीच पत्रिका

राहाते. कुणाच्यातरी जवळच्याचाच मान करायचा राहातो. हे झालं आयुष्यातल्या अनेक बाबतींत कर्मं म्हणून राहणारी अपूर्णता. सगळी कर्मं काळजी घेऊनही त्यांच्या सगळ्या बाबतींत पुरी होत नाहीत. अपूर्ण राहातात. एखादी मोठी रांगोळी काढायला घेतली. खूप राबून, अनेक तास कष्ट करून, कर्माला पूर्णता आणायचा प्रयत्न केला, अगदी कौशल्यानं केला तरी, पाहायला येणारा पाहात असताना आपल्यासुद्धा लक्षात येतं की, कुठल्यातरी कोपऱ्यातली एखादी रेघ जोडायची राहिली. कुठल्यातरी सिमेट्रीच्या बाबतीत इकडच्या पिवळ्या रेघेला तिकडं पिवळ्याऐवजी तांबडी रेघ ओढली गेली. आता ही एवढीशी गोष्ट आहे, ती पूर्ण करता येईलही. पण राहिलं ते राहिलंच आणि राहातंच. तर मोठ्या कामांचं काय होत असेल ? अशा कर्मांतल्या विविध अपूर्णता !

तिसरी अशीच सार्वत्रिक आहे, मोठी आहे. ती इच्छांच्या बाबतीतली. त्यांचं योग्य - अयोग्य क्षणभर बाजूलाच ठेवू. पण मुळातच ना इच्छा थांबत, ना त्या सगळ्या पुऱ्या होत. मनुष्य कितीही जगला आणि कितीही प्रकारचे भोग भोगले तरी, पुन्हा हवेपण राहातंच. शेवटी निसर्गाकडून इशारे मिळतात - सिग्नल येतात की, आता हे पाहाणं शक्य नाही, हे खाणं शक्य नाही, इथं जाणं शक्य नाही, ते तुमचं कर्तव्य असो नाहीतर, नसो. आपणच झाड लावलं, वाढवलं तरी, त्याचीसुद्धा साधी फळं-फुलं आपल्या वाट्याला येतील, याची खात्री नाही. जी येतील, ती येतील - उरलेली सोडून द्यावी लागतील आणि अशा तऱ्हेनं, पुन्हा एवढ्याशा बाबतीतही प्रपंच अपूर्णच राहील. आता सगळ्या आयुष्यात एकूण अपूर्णत्व किती असेल, याचा विचार केलेला बरा.

एवढ्या तिन्ही प्रकारे आपण पाहिलं की, माणसाच्या जीवनात अपूर्णत्व आहे. आता या अपूर्णत्वाची कल्पना आपल्याला आली आहे

ना ? आता पूर्णत्वाच्या आपल्या कल्पना कोणत्या आहेत आणि त्या कल्पनांनी ते पूर्ण झालं का, याचा मनाशी आढावा घेऊन पाहाणं, याचा विचार करून पाहाणं - म्हणजे आपल्या या वचनातल्या विचाराच्या जवळ जाणं होय. कारण, पूर्णतेच्या ज्या-ज्या कल्पना आहेत, त्या आपल्या नेहमीच्या वस्तू, घरदार करत करत, अगदी शेवटी ज्याला आपण उच्च समजतो त्या - समाजसेवेपर्यंत सर्व कल्पना - तिथपर्यंत मनुष्य जाऊन शेवटी मनाला असमाधानच घेऊन येतो किंवा आत्ता आपण पाहिल्याप्रमाणं पूर्णत्वाच्या भ्रमात राहातो !

कारण, मनुष्य ते आत्ताच्या त्याच्या कल्पनांनी - कर्मांनी पूर्ण करू शकत नाही, हे सत्य आहे. मनातल्या न संपणाऱ्या इच्छांनी - हवेपणानं माणसाला अपूर्णत्व येतं. ते अशाश्वत गोष्टी आणून अर्थातच पूर्ण होत नाही. त्यासाठी एकतर, हे मन-अंतर्याम शाश्वत गोष्ट आणून पूर्णत्व गाठता येईल. नाहीतर, अपूर्णत्व देणारं हे मनच नाहीसं करून, पूर्ण होता येईल. आपल्याला जमण्यासारखा मार्ग अर्थातच, आपल्या प्रापंचिक ठेवणीला सोयीचा, म्हणजे पूर्ण गोष्ट आणण्याचा. त्यातही त्यांतला सोप्यात सोपा मार्ग म्हणजे नाम. अर्थात हे थोडं समजून घ्यावं लागेल.

आपल्याला जे हवं आहे, ते पूर्णत्व म्हणजे काय आहे, ते नक्की कळलं तर बरं होईल. अपूर्णत्व म्हणजे दारिद्र्य, दुर्भिक्ष्य, वैगुण्य, विपन्नता - नव्हे. तसंच पूर्णत्व म्हणजे श्रीमंती, सुबत्ता, नुसती गुणसंपदा किंवा संपन्नता - नव्हे. पूर्णत्वाचा गुण किंवा लक्षण समाधान आहे. खरं समाधान असेल तर, ओळखावं की, पूर्णत्व आहे. कदाचित प्रपंचात काही कमी असेल, वैगुण्य असेल - त्यानं नाही फरक पडत. पूर्णत्वाचा अनुभव समाधान आहे आणि ते टिकाऊ आहे. न सांगता इतरांना कळणारं आहे, अनुभवाला येणारं आहे. आता ते कशानं येईल, हा खरा शोधाचा विषय आहे. चुकीच्या

दिशेला कितीही जाऊन, प्रवास करून गाव नाही गाठत, तसं होतं आहे. 'जेथे नाही तिथे शोधितो, वाया जीवन जगी दवडितो' असं होतं. जिथं पूर्णत्व नाही - समाधान नाही, तिथं आपण शोधायला जातो. या कल्पनांना स्पष्टता नसल्यामुळं, मनुष्याची, बाहेर खूप काहीतरी आहे आणि ते आणून आपण हे पूर्णत्व मिळवू, मग समाधान होईल - या चुकीच्या कल्पनेनं शोधाला सुरुवात होते. बाहेरच्याला अंतच नाही, त्यामुळं शोध कधीच संपत नाही आणि ते आणून, आत्ता पाहिलं तसं, समाधान कधीच मिळत नसतं - म्हणूनही ते मिळत नाही. यासाठी हे सगळं स्पष्ट माहीत असावं.

आपण बघा, आपल्या बाहेर कुटुंब-नातेवाईक-गोतावळा एवढं तरी जग आहे. ते आपल्या नेहमीच्या पद्धतीनं पुरं करायला - अधिक माणसं, अधिक घरं, अधिक सत्ता, अधिक संबंध - हे सगळं माणूस करतोच आहे ना ? त्यानं ते पूर्ण होतं का ? समाधान मिळतं का ? नाही. आयुष्यभर कर्मं केली, कितीही माहिती मिळवली, कितीतरी इच्छा पुऱ्या झाल्या पण, वय झालं, इतरांना जबाबदारी नको म्हणून - आपली इच्छा असूनही, गाडी आपली असूनही - तरुण मंडळी तुम्ही घरीच थांबा म्हणतात तेव्हा, दुःख येतंच. आपल्याला भले जगाची माहिती असली तरी, एवढासा बोटाएवढा नातूसुद्धा शहरात वन वे कुठं आहे ते सांगतो, ते आपल्याला माहीत नसतं. मग पुन्हा असमाधान. आजारपण येतं, घरात गडगंज असून चहात चमचाभर साखर खायला मिळत नाही, तेव्हा किती समाधान टिकतं ? मग कळेल की, हे सगळं अगदी पूर्ण करायचा प्रयत्न केला तरी, कुठल्या क्षणी असमाधान म्हणजे अपूर्णत्व, दत्त म्हणून समोर उभं राहील, हे सांगता येत नाही.

हे साध्या कुटुंबाचं. बाहेरून मोठे दिसतात, झगमगाट असतो म्हणून ते प्रपंच - ते लोक पूर्ण आहेत, समाधानी आहेत अशी का आपली समजूत आहे ? उपमुख्यमंत्र्यांना मुख्यमंत्री व्हायचं आहे, मुख्यमंत्र्यांना केंद्रात पद

हवं आहे - सगळ्या सत्ता उपभोगल्या तरी, आता निदान राज्यपालपद तरी मिळावं असं वाटतंच ना ? एक टर्म झाली तर दुसरी मिळावी. मग तेच एक इंडस्ट्री झाली तर दुसरी - यापेक्षा आणखी काय वेगळं असणार ! लौकिकदृष्ट्या विद्वान झाले, संशोधक झाले म्हणून हे कळतं, असं का आहे? ते नसतंच तसं. हे समाधानाचं - पूर्णत्वाचं शास्त्रच वेगळं आहे. एक संतच जाणोत ते. इकडची विद्वत्ता पद देईल, प्रसिद्धी देईल, पैसा देईल पण पुढची हावही देईल. असिस्टंट डायरेक्टरला डेप्युटी झालो नाही, हे दुःख काय आणि विभागीय संमेलनाचा अध्यक्ष झालो पण अखिल भारतीयचा अध्यक्ष झालो नाही हे दुःख काय - प्रपंच अपूर्णच आहे आणि तो आपला असमाधानाचा गुण दाखवीलच. कुणी गप्प बसेल, कुणी कुणाला दोष देत बसेल. हे झालं मोठ्यांचं. ते आपल्या कुवतीतलं असो नसो, समजून घ्यायला आवश्यक आहे.

एक नक्की की, आपल्या पातळीवर समजून घेतलं तर आपल्या पातळीवर पूर्णत्व - समाधान गाठता येणं शक्य आहे. त्यांच्या पातळीवर त्यांनी समजून घेतलं तर, त्यांच्या पातळीवर पूर्णत्व - समाधान त्यांनाही गाठणं शक्य आहे. एक लक्षात ठेवावं, शून्याचा आकार लहान असला किंवा खूप मोठा असला म्हणजे त्याची किंमत बदलत नाही. तेवढीच या प्रपंचातल्या फरकांची किंमत आहे.

म्हणून पहिलं लक्षात घेतलं ते, माणसाच्या आयुष्यातलं अपूर्णत्व. ते पूर्ण करण्याचे - समाधान आणण्याचे त्याचे चुकीच्या दिशेचे प्रयत्न. मग ओळखलं, ते या दृश्य प्रपंचात, पूर्णत्व शक्य नाही हे. आता जाणतो आहोत ते खऱ्या पूर्णत्वाची - समाधानाची जागा कुठं आहे आणि ते कशानं मिळू शकतं, हे. आता हे लक्षात न येणारे लोक खूप. म्हणून हे सगळे पूर्णत्वाचे बाह्य शोध चालू दिसतात आणि ते तसेच चालू आहेत आणि त्यांचा शेवट

होत नाही, होणारही नाही.

हे सारं आपल्याला सांगणारा कुणी भेटत नाही किंवा आपल्यात तेवढी नम्रता किंवा तेवढा प्रामाणिकपणा नसतो. अनेकदा लक्षात येऊनही आपली मान्य करण्याची तयारी नसते. इथं अपूर्णत्व मान्य होण्याचा या वचनात उल्लेख आहे, तो महत्त्वाचा आहे, तो या अर्थानं. अनेक गोष्टी आपल्याला कळल्या तरी, त्या मान्य होतातच असं होत नाही. आपल्याबद्दल, आपल्या स्वभावाबद्दल घरातले लोक सांगत असतात. अशावेळी ते आपल्याला कळत नाही, असं म्हणता येईल का ? तर आपल्याला कळतं पण मान्य होत नाही. मान्य झालं तर त्याचा स्वीकार होणं, मग त्याची कृती होणं - यात पुढचं सगळं गणित आहे. ते अर्थातच सुटत नाही. म्हणून साध्या प्रपंचातल्या गोष्टीतही एक तात्पुरती पूर्णता किंवा समाधानाची झुळूकसुद्धा माणसाला मिळत नाही. हे कळलं तर, पुढं कळून घेण्याचं महत्त्व वाटेल. आणि त्याच्या नंतर नाम व त्यानंतर त्याचं खरं महत्त्व असे दोन टप्पे आहेत. ते टप्पे आपण बघू या.

आपल्याला नामाचं खरं महत्त्व कळायला 'नाम' म्हणजे नाव अशी समजूत आहे, ती अडचण आहे. समजा एखाद्याचं अ.ब.क. असं नाव आहे. तसं, माणसाचं राम हे एक नाव आहे, कृष्ण हे एक नाव आहे, हरी एक नाव आहे,अशी आपली कल्पना आहे. 'नाम' आणि नाव यांत फरक आहे. म्हणून नामाचाच खरा अर्थ आधी कळायला पाहिजे. मग त्यानंतर नामाचं खरं महत्त्व आणि ते आणून मग पूर्णत्व, या दृष्टीनं आपण त्याचा विचार करू शकू.

नाम्ना सद्गुण्यं म्हणजे जे काही अपूर्ण असेल ते नामानं पूर्ण होतं, असा सिद्धांत आहे. काही राहिलं असेल तर, ते नामानं पूर्ण होतं. म्हणून सगळ्यात नाम घालतात, सगळ्या गोष्टींत नाम वापरण्याची पद्धत आहे.

असं सोपं करून दिलं आहे. म्हणून शेवटी नाम घ्या म्हटलं आहे किंवा नाम घेऊन सुरुवात केली आहे. वेदाच्या आरंभी 'हरिः ॐ' म्हटलं आहे. ते ॐ म्हणून सुरुवात झाली व शेवटी 'तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु' म्हटलं आणि अर्पण करून - विष्णवे नमो, विष्णवे नमो, विष्णवे नमः - असं नाम घेऊन थांबले. तर अशी आपल्याकडं रचना करून ठेवली आहे.

पूर्णत्व आणणारी एवढी पारंपरिक रचना आपल्याला मान्य नसेल तर, आपण 'नाम' म्हणजे काय आणि त्याचं खरं महत्त्व काय आहे, हे ओळखून घ्यावं. आपली कल्पना असते की, नाम हे एक नाव आहे. नामाचं स्वरूप केवळ नाव असं नाही. श्री विनोबांना कुणीतरी विचारलं की, आपण कुणाचं नाम घेता ? त्यावर ते उत्तरले की, दशरथानं आपल्या मुलाला ज्याचं नाव ठेवलं, त्याचं मी नाम घेतो ! दशरथानं मुलाला जे नाव ठेवलं, ते आधी असलं पाहिजे, त्याच्याही आधी असलं पाहिजे. तर ते कुठं असेल, तर्क लावता येत नाही. दिशा दाखवण्यासाठी श्री विनोबांनी दशरथाच्या मुलाचं नाव, हा शब्द वापरला. आपल्याला यावरनं नामाची कल्पना येईल.

तेव्हा आपल्या नामामध्ये, प्रत्येक नामामध्ये, नावामध्ये म्हणू फार तर, टिकाऊपण नाही. आपल्याला माहिती आहे की, आपल्यामागं आपलं नाव कोणी काढील की नाही ? तशी शंकाच वाटते ! असताना घेत नाहीत! असताना आठवण राहात नाही, म्हणजे पुढचं कळलंच. कुणासाठी किती काही करा, पण शेवटी सांगावं लागतं ना की, आठवण ठेवा, घराण्याचं नाव काढा. इथंसुद्धा आपल्या देखत आपल्या नावाची कोणी आठवण काढील आणि तीसुद्धा चांगली काढील याची खात्री नाही. तर हे तर, त्याच्या पुढचंच आहे. नंतर काय करतील याची कल्पना आपल्याला येऊ शकते. इतकं आपल्या नावाला तकलादूपण आहे ! आणि ते किती कचकडीचे नाव आहे, ही पण कल्पना येईल. पण आपलं अस्तित्व आपल्याला कचकडीचं वाटत

नाही ना ? ते जिवंत वाटतं ना ? ते आपल्या नावापेक्षा वेगळं, मोठं वाटतं ना ? ते खरं ज्या अस्तित्वाच्या आधारानं राहतं, ते मूळ अविनाशी, शाश्वत अस्तित्व म्हणजे 'नाम' होय. ते अस्तित्व आपल्यामध्येपण असतं. आपल्याला ज्याच्या साहाय्यानं, काहीतरी एक नाव अ.ब.क., असं म्हटलं तर, त्याच्यामागं जर ते अस्तित्व नसतं, जिवंतपण नसतं, शाश्वत चैतन्य नसतं तर, असं अ.ब.क. म्हणता आलं असतं का ? क्षणभर असा विचार करू की, आपल्यातल्याच माणसाला काय हरी म्हटलं, किंवा रामकृष्ण म्हटलं तर, त्याच्यामागं काही नसतं तर, ते नाव त्या माणसांना देता आलं असतं का ? तर त्याच्यात जे अस्तित्व आहे, ते म्हणजे नाम होय. एरवी आपण जे वापरतो ते नाव होय. म्हणूनच गॅझेटमध्ये आपल्याला नाव बदलता येतं. आपल्यालासुद्धा अनेक नावांनी पुकारलं जातं, बोलावलं जातं.

बऱ्याच वेळेला काही लोक, आपलं म्हणून एक वेगळं नाव, एखाद्या माणसाला ठेवतात. ते एक वेगळंच प्रकरण आहे ! आपल्याला असं वाटतं की, त्याच्या नावाचं आपण महत्त्व वाढवतो. पण असं काही नसतं. आपण एक वेगळं नाव ठेवून, आपलं स्वतःचंच महत्त्व वाढवतो आणि हे लक्षात येतच नाही. मुलाला त्याच्या आईवडिलांनी नाव ठेवलं, ते आपण म्हणावं. पण मी त्याला अमुक म्हणणार. त्या - अमुक एक म्हणणार - यामध्ये काय आहे नक्की ? तर, त्या मुलाच्या नावाचं महत्त्व नसून आपण त्याला स्वतंत्र नाव देऊन, आपलंच महत्त्व प्रस्थापित करायचा नकळत प्रयत्न करत असतो, हे लक्षातच येत नाही. अशी आपली प्रपंचामध्ये गडबड चालू आहे. ती लक्षात आली की, मग पुढं जाता येईल.

आपण एखादं नाव उच्चारलं तर, त्या माणसाची आठवण होते ना ? कारण ते नाव साधं आहे. अमुक ठिकाणी राहणारा, काळा, गोरा, अमकातमका, असं काहीतरी डोळ्यासमोर येतं. म्हणजे त्या सगळ्याचा

संकेत म्हणजे त्याचं नाव आहे. त्यामुळं त्याच्या मागच्या अर्थाची जाणीव करून देण्याचं सामर्थ्य त्याच्यामध्ये आहे. त्याच्यामागे अर्थाचे संकेत आहेत आणि ते आपल्या अनुभवानं ठरतात. जे अर्थाचे संकेत अनुभवाच्या पलीकडं आहेत, त्यांची जाणीव करून देण्याचं सामर्थ्य ज्याच्यामध्ये आहे, त्याला 'नाम' म्हणतात.

आपले नेहमीचे संकेत अनुभवाच्या कक्षेतले आहेत. म्हणून एक मनुष्य म्हटला की, आपल्याला माहिती आहे त्यानुसार त्याचं नाव आठवतं की, अमुक वयाचे, अमुक ठिकाणी राहतात, अमुक करतात. आपल्याला असं आठवत जातं. ही आपली साधारण कुवत झाली. नाव उच्चारल्यावर ते सगळं आठवतं कारण, तो एक संकेत आहे. त्याच्यात पुढं काही करण्याचं सामर्थ्य नाही.

पण 'नाम' म्हणजे हे आहे का ? तर, तसं नाही. मी जेव्हा भगवंताचं नाम घेतो, तेव्हा त्या नामात मात्र याच्या पलीकडं असलेलं सामर्थ्य आहे. मला भगवंताचं स्वरूप कुठं माहिती आहे ? तरीसुद्धा मी त्याचं नाम घेतोच काहीतरी. ज्याचं स्वरूपही मला माहीत नाही, ते सूचित करण्याचं सामर्थ्य ज्याच्यामध्ये आहे, त्याला 'नाम' म्हणायचं. आपली ती नावं म्हणायचीत. तर, असा स्पष्ट दिसणारा एक फरक 'नाम' व 'नाव' यात आहे. याच्यानंतर पलीकडं राहणाऱ्या अर्थाचा संकेत हे तर आहेच, पण त्याच्याचबरोबर त्या संकेताच्या अर्थानुसार, त्या व्यक्तीचं जीवन घडवण्याचं सामर्थ्य नामात आहे. नाम घेताना परिणाम होतच असतो. श्रीमहाराज सांगायचे ना की, नामस्मरणाचा अर्थ समजून घेऊन नामस्मरण करा. तर, नामाचा अर्थ समजून घेऊन, एखाद्यानं विचारपूर्वक नाम घेतलं तर, त्याला जे समजलं आहे, तेवढा त्या नामाचा परिणाम तर होईलच, पण जो अर्थ त्या माणसाच्या कक्षेत येत नाही, तो अर्थसुद्धा त्याच्या मनामध्ये जागृत करण्याचं काम नाम

करतं. असं पहा, आपण विठ्ठल-विठ्ठल म्हणत आहोत. मला कळणारं ते भगवंताचं एक सगुणरूप आहे. त्यामुळं मनात समजून घेतल्यानं देवत्व जागृत होतं. त्या दैवतानं अनेक भक्तांना दिलेलं प्रेम, समानतेची वागणूक, संकटांत केलेलं रक्षण - अशा मला समजलेल्या अनेक गोष्टी मनात जागृत करण्याचं काम नाम करतं. पण त्या दैवताच्या सगुणाच्याच नव्हे तर, निर्गुणाच्या रूपात किती अर्थ भरलेला आहे, याची कल्पना मला येत नाही. तरी, जे अर्थ, जी कल्पना, माझ्या आवाक्यात नाही, त्याचे सात्त्विक आणि पूर्णत्व देणारे संस्कार मनात जागृत करण्याचं सामर्थ्यही त्याच नामामध्ये आहे.

आणखी एक पैलू पाहू. माझ्या विचाराला एक प्रकारची अपूर्णता आहे. तिच्यात दोन विरोधी गोष्टी एकत्र करण्याचं सामर्थ्य नाही. आपण उदाहरणानं समजून घेऊ. आपल्या विचारात - तू आहेस, तू नाहीस - या दोन गोष्टी एका ठिकाणी कशा चालतील ? नाही चालणार. मनुष्य आहे आणि नाही, झाड जिवंत आहे आणि नाही, असं कसं म्हणता येईल ? पेशंट जिवंत आहे आणि नाही, असं म्हटलं तर ? तसं म्हणता येत नाही. विचाराला ते पटत नाही. पण तिथं, नामामध्ये, ते आहे. ते आहे आणि नाही, असली भाषा त्याला लागू होते. असे विरोधाभास कसे तयार होतात ? कारण ते आपल्या विचाराच्या कक्षेत येत नाहीत, त्याच्या पलीकडं ते आहेत. म्हणून आपल्या कक्षेच्या पलीकडं असलेला अर्थ देण्याचं सामर्थ्य आणि तेसुद्धा नुसते कसलेतरी अर्थ नाहीत - तर, विधायक अर्थ, माणसाचं उन्नयन करतील असे अर्थ, देण्याचं सामर्थ्य नामात असतं. म्हणूनच म्हणतात ना की, नाम घेऊन माणसं पावन झाली. तर, पावन करण्याचं सामर्थ्य त्या संकेतांमध्ये, म्हणजे नामामध्ये, आहे.

श्रीमहाराज म्हणायचे तसं, सत्संगाचा अर्थ आणि परिणाम समजून घ्यायचे असतील तर माळ, शस्त्र असे वेगवेगळे उच्चार करून बघावेत.

तलवार - हा उच्चार केला तर, जास्तीत जास्त काय मनात येईल ? आत्ता माझ्या हातात तलवार नाही, पण तलवार म्हटलं की, काहीतरी संकेत निर्माण होतो. पण तो विघातक आहे. हिंसक आहे. तेच माळ- हा शब्द उच्चारला तर, जप-नाम, असे संकेत निर्माण होतात. ते विघातक नाहीत, हिंसक नाहीत. हे कळणाऱ्या संकेतांबद्दल झालं. या संकेतांचासुद्धा एक संग आहे, जो आपल्यात वृत्ती, भावना, कृती निर्माण करू शकतो. उघड आहे की, तलवार-तलवार म्हणण्यानं विघातक संकेतांचा संग जडून, मनुष्याकडून तशा कृती घडतील. तर, उलट माळ-नाम म्हणण्यानं विधायक संकेतांचा संग जडून, भगवंताला-सत्प्रवृत्तीला अनुकूल कृती घडतील. हा झाला नामाचा सत्संग. जो माळेनं साधेल - जपानं साधेल. नाम हा अत्यंत विधायक संकेत आहे की, ज्याच्या विधायकतेची मला कल्पनासुद्धा करता येत नाही, माझ्या कक्षेत मावत नाही, ते 'नाम' हे असं आहे !

हे सगळं ओलांडून पलीकडं गेल्यावर, कदाचित नामाचं खरं महत्त्व कळेल. सध्या आपण एवढं बघावं की, आपण कुठं चाललो आहोत, कुठल्या अपूर्ण जगात आहोत, त्यानुसार आपले व्यवहार कसे चाललेत ते बघावं. नंतर त्याच्या पलीकडं जाणं म्हणजे काय, याचा थोडासा अंदाज घ्यावा. मग पाहावं, आपल्या जीवनाला आपण वळण देऊ शकतो, इतपत सामर्थ्य आपल्याकडं आहे का ? आपल्याला आढळेल की, तिथं तर सगळ्या बाजूंनी अपूर्णत्व आहे. माणसामध्ये एक दृश्याची मर्यादा ठरलेली आहे. तिथपर्यंत तो वळण देऊ शकतो. परिस्थितीला वळण देणं, माणसाला बरं करणं, आजारी पडणं - न पडणं, माणूस सुधारणं - बिघडणं, हे सगळं करायचं आहे. पण त्याच्या सर्व मर्यादा ठरलेल्या आहेत. तिथपर्यंत तो काम करतो, त्याच्या पलीकडं तो काम करू शकत नाही. मग त्याच्यानंतर हे घडवण्याचं खरं सामर्थ्य कशात आहे, त्याचा शोध घेता येईल.

मग त्यांतल्या त्यात सोपा मार्ग नामाचा, हे लक्षात येईल. आणि त्याचं महत्त्व हे लक्षात येतं की, जे अशक्य आहे ते शक्य होईल. जे असाध्य आहे ते साध्य होईल. अशा रीतीनं जी शक्ती नामामध्ये आहे, ती कळली तर, नामाचं सामर्थ्य लक्षात येईल. नामाचा थोडासा अर्थ लक्षात येऊ शकतो, फार नाही लक्षात येत. तो खरा अनुभवानंच लक्षात येतो. त्याला नाम घेणं हाच उपाय चांगला.

त्याचं खरं महत्त्व समजायला आपल्या जीवनाची अवस्था आधी लक्षात आली पाहिजे. मीच पूर्ण आहे आणि सर्व करीन, अशी समजूत असेल तर, नामाचं महत्त्व कधीच कळणार नाही. अगदी मोठे मोठे राज्यकर्ते घ्या, हिटलर घ्या, शेवटी कर्तृत्व लटकं पडतं ना ? इतर राज्यकर्ते घ्या - इतरांची राज्यं जिंकली पण घरगुती कलह, बंडाळ्या, मुलांची वर्तनं, सहकाऱ्यांच्या स्पर्धा - अनेक गोष्टींनी मोठमोठे लोक घाईला आलेले आपण पाहिले नाहीत का ? अगदी विधायक कार्य करणारे लोक घ्या, यांच्यातले कोण राहिले आणि त्यांनी देहात राहून स्वतःचं आणि जगाचं काय पूर्ण केलं? या पातळीवर आपण विचार केला तर, आपल्याला अपूर्णतेची कल्पना येईल.

ही अपूर्णतेची कल्पना आल्यानंतर, मग नामात आपण कसं जावं आणि त्याची गरज किती तीव्र आहे, हे लक्षात येईल. शेवटी हे सगळं करण्याची मला जरूर का आहे, तर मला समाधानाची जरूर आहे, आनंदाची ओढ आहे. सुखाचं काय होतं ते मला माहिती आहे, म्हणून शाश्वत सुखाचा मी विचार करतो.

तर, हे सगळं व्हायला, त्याच्यापेक्षा इतका मोठा संकेत पाहिजे की, जो माझ्या मनामध्ये अधिक मोठी गोष्ट, जी मनात मावत नाही तिथंपर्यंत जातो आणि जो माझ्या मनाच्याही पलीकडं जाऊ शकतो. मनात मावणारी

अधिकात अधिक मोठी गोष्ट इथंपर्यंत ठीकच आहे. ती तर गोष्ट मिळेलच. म्हणजे ज्या प्रपंचातल्या आता या पार्श्वभूमीवर साध्या वाटणाऱ्या पण योग्य असलेल्या गोष्टी तो संकेत सहजपणे देईल. म्हणजे, जी मुलं-बाळं, घरदार, स्थावर, पैसा इत्यादी गोष्टी, त्या त्या संकेताच्या सामर्थ्यानं घडून जातील. आपल्या संकल्पानं आणि शक्तीनं या गोष्टी करण्यात जाणारी शक्ती, वेळ, अचूकता - यांपेक्षा या संकेताच्या शक्तीनं या गोष्टी किती सहजतेनं घडून जातात, हे संतांच्या उपदेशातून शिकावं आणि चरित्रांतून खात्री करून घ्यावी. म्हणून महाराज म्हणत की, तुम्ही आपला प्रपंच आपल्या स्वतःच्या कल्पनांनी आणि शक्तीनं करता, अपूर्ण राहाता, दुःखी होता, तो नामावर-रामावर सोपवून पाहा, तो तुमच्यापेक्षा किती चांगल्या तऱ्हेनं तो करू शकतो. उलट तुमच्यापेक्षा तो नेमका, गरजेचा आणि यशस्वी करतो.

म्हणून जो संकेत माझ्या कल्पनेच्या पलीकडच्या आणि खरं समाधान-पूर्णत्व देणाऱ्या गोष्टी देऊ शकतो, तो त्याखाली असलेल्या दृश्यातल्या, प्रापंचिक गोष्टीतर, सहज आणि खचितच देऊ शकतो. एक उदाहरण म्हणून बघा की, बँकेमध्ये अधिकारी असतात, त्यांना काही अधिकार दिलेले असतात की, तुम्ही एक लाखापर्यंत सही करू शकता, दहा लाखापर्यंत सही करू शकता किंवा एक कोटीपर्यंत सही करू शकता. आता ज्याला दहा लाखाची सही करण्याची क्षमता दिली आहे, त्याला पाच रुपयांच्या चेकवर सही करून, तो पास करता येणार नाही का ? नक्कीच करू शकेल. पाच, दहा, शंभर - ज्याची जशी कल्पना असेल त्याप्रमाणं. जे मिळवण्याची कुवत या मनुष्य जन्मात आहे, त्या शाश्वत समाधानाच्या तुलनेनं, सर्व घरंदारं, सुखं म्हणजे पाच-पन्नास रुपयांच्या गोष्टीच !

श्रीमहाराज भिकाऱ्याची गोष्ट सांगत. राजानं भिकाऱ्याला काय पाहिजे ते माग म्हटल्यावर, जो राज्य द्यायला तयार आहे, त्या राजाकडं

भिकाऱ्यानं, जरा धड घोंगडी मागितली. कारण, त्यानं धड घोंगडी कधी बघितलीच नव्हती. आपल्या प्रपंचातल्या मागण्यासुद्धा अशा धड घोंगडीपुरत्याच असतात.

संकेताचं - नामाचं - खरं सामर्थ्य हे की, जी माझ्या मनात येऊ शकत नाही, कल्पनेत बसत नाही, मावत नाही आणि कल्याणाची असते- ती गोष्ट तो देतो. उदाहरणार्थ, शाश्वत समाधान -नाम- ते तो भगवंताचा संकेत देऊ शकतो. कल्पनेत मावणाऱ्या आणि कल्याणाच्या चाळणीतून उतरणाऱ्या प्रापंचिक गोष्टी करायला लागणारी अचूक शक्ती, बुद्धी देऊन, हा संकेत ते काम करतो. तर, कल्पनेच्या बाहेर असलेल्या आणि खऱ्या समाधानाला गरजेच्या असलेल्या, पूर्णत्व आणणाऱ्या भगवंताच्या विशाल जगाची आणि त्या जगात सामावून जाण्याची शक्ती आणि बुद्धीसुद्धा हाच संकेत - हेच नाम देतं, ही त्याच्या सामर्थ्याची फक्त झलक आहे.

मुळात असं पाहू की, आपल्याला अपूर्णत्वाची कल्पना का यावी? तर, आपली कल्पनेचीसुद्धा अपूर्णता आहे. विचारात पूर्ण येत नाही, कल्पनेत पूर्ण येत नाही, कर्तृत्वात पूर्ण येत नाही, तसंच ज्ञातृत्वातही पूर्णता येत नाही. पूर्ण विषय समजून आला तोपर्यंत, दुसऱ्या दिवशी सकाळी काहीतरी नवीन जर्नल येतं, त्यात लिहिलेलं असतं की, हे नवीन संशोधन असं आहे. की झालं. परत सगळा अभ्यास करायला पाहिजे. पूर्णता येतच नाही त्याला. म्हणजे पूर्णतेचं महत्त्व काय आहे, ते लक्षात येतं. ही पूर्णता जगाच्या, दृश्याच्या बाजारात शोधायची नाही, याची खात्री होते. ती पूर्णता अदृश्याच्या, पण अनुभव येऊ शकणाऱ्या, विशाल विश्वात आहे याकडं लक्ष जातं. आणि मग तो अनुभव देऊ शकणारं जे 'नाम' आहे, त्याचं महत्त्व थोडं कळायला लागेल, अशा स्वरूपाचे विचार या वचनात आहेत.

आपण त्याादृष्टीनं आणि आत्मपरीक्षणानंच ते समजावून घ्यावं.

जगाच्या थोड्या अनुभवावरून ते थोडं कळतं. पण स्वतःवरून जास्त कळतं. खरं सांगायचं तर, नामाचं खरं महत्त्व नामात रंगलेल्या माणसाकडूनच कळेल, त्यातल्या त्यात बाहेरून कळायचं असेल तर ! नाहीतर स्वतः रंगून जाऊन कळेल, हे त्याहीपेक्षा खरं आहे.

या वचनाच्या संदर्भात स्वतः जोपर्यंत रंगून जात नाही, तोपर्यंत त्याचं खरं महत्त्व कळलं नाही, असं समजायला हरकत नाही. मला नामामध्ये जोपर्यंत आनंद निर्माण होत नाही, तोपर्यंत नामाचं खरं महत्त्व कळलं नाही, असंही समजायला हरकत नाही. अर्थातच तोपर्यंत आपल्याला अजूनही नामाचं महत्त्व समजून घेण्याची गरज आहे, हे ओघानंच आलं.

त्यासाठी आपल्या आयुष्यात आत्मपरीक्षण करण्याची पण गरज आहे आणि आपल्याला त्याला प्रवृत्त करणाऱ्या अशा सत्संगाची पण गरज आहे. आपल्याला ती जाणवली असेल पण, ती नीटशी मान्य झालेली नाही. नाहीतर मी कृतीलाच लागलो असतो. जर मी कृती करायला तयार नसेन तर या अभ्यासाची अजून गरज आहे, असा त्याचा अर्थ समजून घ्यावा. मग पुढच्या कृतींनीच नामाचं खरं महत्त्व लक्षात येऊ लागेल !

।। श्रीराम ।।

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. ०२/०८/२००८ च्या निरूपणावर आधारित)

चिंतनक्षण

वचन क्र. ३ * निरूपण : क्र. ४

शरणागती ही अवस्था आहे,
काही साधण्याचा मार्ग नव्हे.

शरणागती ही अवस्था आहे, काही साधण्याचा मार्ग नव्हे ! साधण्याचे खूप मार्ग असतात. प्रपंचात आपल्याला अनेक गोष्टी माहीत असतात की, कशा पद्धतीनं एखादी गोष्ट साध्य करावी, केव्हा मागावं, नवीन घ्यायच्या वस्तूचा विषय केव्हा काढावा, हे अगदी लहान मूल पण जाणतं. त्यामुळं साधण्याचे मार्ग आपल्याला माहीत आहेत.

आपल्याला कळतं की, त्या माणसाचा मूड चांगला असेल, होय म्हणायची शक्यता असेल, निदान विचार तरी करेल, उद्या बघू या, असं तरी म्हणेल, अशी साधारण मनःस्थिती बघून काम करण्याची सवय प्रत्येकाला प्रपंचातसुद्धा आहे. विशेष म्हणजे अगदी लहान मुलालासुद्धा ते ज्ञान असतं. कसं असतं कुणास ठाऊक. पण त्याला बरोबर कळतं. बाबा बाहेरून रागावून आलेले आहेत, त्यावेळेला ती मुलं काहीही मागणार नाहीत. गुपचूप बाहेर खेळत राहतात, काहीतरी आपलं काम करतात आणि अगदी फारच झालं तर, अशा वेळेला अभ्यासाला बसतात, सगळा उतारा आजच्या आज ! त्यावेळेला एक धोरण ठरवूनच मुलं तसं करतात. प्रापंचिकच प्रापंचिकाला बरोबर ओळखतो. मग एकदा शांतता झाली की, नंतर विषय काढतात. एखादे दिवशी बाबा प्रसन्न दिसले की, मग लगेचच सांगायचं की, अमुक एक आणायचं आहे, तेव्हा अभ्यास बिभ्यास काही नाही ! तेव्हा, माणसाला साध्य करण्याचे मार्ग आहेत, त्याची कल्पना आहे आणि ते मार्ग वेगवेगळे

आहेत. प्रापंचिकाला पारमार्थिकापेक्षा, सत्पुरुषांपेक्षासुद्धा ते जास्त कळतात की काय, असं वाटतं.

साधूची एक गोष्ट आहे. एका माणसाला साधू व्हायचं होतं, कारण साधूला मिळणारा मान त्याला हवा होता. म्हणून तो एका साधूकडं गेला. त्या साधूनं त्याला सांगितलं की, एका ठिकाणी निरपेक्षपणे तुम्ही बसा. कुणाकडूनही मानाची अपेक्षा ठेवू नका. मान आपोआप चालत येतो. संध्याकाळी शेवटी कंटाळून, त्यानं हे सांगणाऱ्याला जाऊन विचारलं की, मी सकाळपासून मानाची अपेक्षा सोडून बसलो आहे पण, अजून एकही जण मला मान द्यायला चालत आला नाही ! आता काय करावं ?

मानासाठी साधू व्हायचं असलं म्हणजे हे असं होतं. साधू व्हायच्यासाठी मान सोडून दिला असता, तर ते घडलंही असतं. या गोष्टीत मान मिळवण्याचा मार्ग काय आहे तर, मानाची अपेक्षा सोडणं, हे होय. पण त्या माणसानं मानाची अपेक्षा सोडलीच नाही, म्हणून तर हा प्रश्न आला. आपल्याला काही साधण्याचे मार्ग माहीत आहेत, असं म्हटलं. पण ते असं वरवरचं आणि फसवंही असतं, हे स्पष्ट व्हावं.

आपणच काही मागायचं नाही. मग 'न मागे तयाची रमा होय दासी'प्रमाणं वृत्ती असायला पाहिजे. मी न मागता आपण होऊन माझ्या खात्यात पैसे जमा व्हायला पाहिजेत, घरी तसं स्टेटमेंट आणून द्यायला हवं, असं वाटून कसं चालेल. आपण 'न मागे तयाची रमा होय दासी' असं ठरवलं आहे ना ? मग स्वस्थ बसावं, या अपेक्षा ठेवू नयेत. पण लोक लक्ष्मीला दासी करण्यासाठी हा मार्ग वापरतात. ती भक्तीही नव्हे आणि शरणागतीही नव्हे. कष्टानं जमत नाही. म्हणून पत्करलेला हा मार्ग झाला !

हे किती सूक्ष्म आहे ! ती इच्छा आहे. आपल्या प्रपंचात असतं की, न मागता होत असेल तर, न मागून बघू. आधी ते करतात का बघू, देतात का

बघू, काय करतात ते बघूयात. माणसाच्या लक्षात येत नाही की, हे खरं तर मागण्याचेच प्रकार आहेत. त्यांना नको आहे, असं झालेलं नाही. ते भगवंताच्या इच्छेवर नाहीत, नको आहे अशी अवस्था नाही. 'न मागे तयाची' म्हणजे त्याची अवस्था अशी असायला हवी की, त्याला इच्छाच उरली नाही. सत्पुरुषांना किंवा साधूंना वाटतं, पैसा मिळाला काय, न मिळाला काय - त्यांना त्याची इच्छाच नसते. पैशाची किंमत ते ओळखतात. पण त्याच्यासाठी त्यांची तळमळ, इच्छा अशी नसते. अशी त्यांची ती अवस्था असते. म्हणून मग ते शक्य होतं. अर्थात त्यांना त्याची किंमत उरलेली नसते, हे वेगळं !

काही माणसं भक्तीमध्ये, शरणागतीकडं एक मार्ग म्हणून पाहतात. भगवंत जर तपश्चर्येनं साध्य होत नसेल तर, शरणागतीनं तो मी साध्य करीन ! आता ही अवस्था नाही, मनुष्याचं ते आणखी एक शस्त्र आहे. म्हणजे एखाद्याकडून काम करून घ्यायचं आहे. हातात काठी घेऊन ते करून घेणं, हा एक मार्ग झाला. समजा, तो माणूस त्या शस्त्राला दाद देणारा निघाला नाही, पण म्हणाला, तुम्ही विनंती केलीत तर मी ते काम करीनही. तर विनंती करायला तयार होणं आणि म्हणणं, 'ही मी विनंती करतो'. तर कसं होईल ? अशा पद्धतीनं ही 'विनंती' होईल का ?

'विनंती' म्हणजे, किती भाव आहे त्यात ! की, तुम्हाला द्यायचं असेल तर द्या. माझी विनंती आहे, ऐकणं न ऐकणं तुमच्या हाती आहे. दिलं तर आनंदच आहे. न दिलंत तरी मी शांत राहीन. ही विनंती आहे. ही विनंती हा मार्ग नाही, ती अवस्था आहे. तसं शरणागती ही अवस्था आहे.

अनेकांची अशी समजूत आहे की, प्रयत्न करून इतर मार्गांनी साध्य होत नसेल तर, शरणागती हा एक साधण्याचा मार्ग आहे. शरणागतीमध्ये प्रयत्न नाहीत, अशी अनेकांची समजूत असते. शरणागती ही पळवाट आहे, त्यामध्ये कर्तृत्वाला वाव नाही, त्यात कमीपण आहे - अशी शरणागतीबद्दल

टीका केली जाते. पण शरणागती हे सर्वोच्च प्रयत्न आहेत, हे कोणाच्या लक्षात येत नाही. आपल्याला कळावं म्हणून प्रयत्न असं नाव द्यायचं. माझे सर्व प्रयत्न मी केलेले आहेत, पण प्रयत्नांची अपूर्णता माझ्या लक्षात आलेली आहे.

माझे प्रयत्न सतत सुरू आहेत. परिस्थिती सुधारण्याचे प्रयत्न, वस्तू आणण्याचे प्रयत्न, सुख मिळवण्याचे प्रयत्न - हे सुरू असूनही त्यात अपूर्णता आहे. ती दूर करण्याचा शरणागती हा त्यानंतरचा आणखी एक प्रयत्न नव्हे. शरणागतीमध्ये उच्च स्वरूपाची सक्रिय अवस्था आहे. ती सक्रिय प्रयत्नशून्य अवस्था आहे.

आपल्या मनाच्या सतत हालचाली - ऑपरेशन्स चाललेल्या असतात. असं काहीतरी करू, तसं काहीतरी करू वगैरे. तर, त्या सर्व हालचाली थांबल्या आहेत. असं असूनही साध्यावर आपण स्थिर आहोत. या अर्थानं शरणागती ही सक्रिय अवस्था आहे. आता भगवंत जे करील ते करू देत, जसं ठेवील तसं राहू,ही शरणागती आहे. शरणागतीचा अभंग आहे ना - 'जेथे ठेवशील तेथे राहू, जे जे करिशी ते ते पाहू' ते खरे भक्तिमार्गी - राघोबाचे पथिक, अशी अवस्था आहे. आता त्याच्यामध्ये मनुष्यानं काही केलं नाही, असं काही आहे का ? तर त्यानं सर्व प्रयत्न केले आहेत. पण त्याच्या मनाची अवस्था अशी आहे की, स्वतःचं म्हणून तो आता काही करायला तयार नाही. भगवंत जे घडवील ते, अशी अवस्था आहे. ती शरणागतीची अवस्था आहे आणि या अवस्थेत मन सातत्यानं भगवंताच्या ठिकाणी राहणं अभिप्रेत आहे. एक मार्ग म्हणून तो यावेळेला पत्करला आहे. स्टान्स - स्टॅन्ड आहे तो. एखादा गरज म्हणून नम्रतेचा स्टान्स घेतो. अर्थातच, तो मनानं नम्र नसतो. तो तुमच्याकडं येतो. प्रश्न विचारतो. आपल्याला वाटतं, त्याला कळत नाही, तो नम्र आहे, त्याला

जिज्ञासा आहे. पण प्रत्यक्षात त्याला बघायचं असतं की, तुम्हाला किती कळलं आहे. तुमच्याकडून तो उत्तर काढून घेतो आणि मला हे माहीत होतं, असं तो म्हणतो ! त्याला फक्त खात्री करून घ्यायची असते. असा मनुष्य हा काही शरणागत नव्हे. शरणागतीमध्ये असलं काही अभिप्रेत नाही. यावरून शरणागतीची आपली कल्पना स्पष्ट झाली असेल. भगवंत जे करतो किंवा जे करणार असेल ते उत्तम आणि कल्याणकारकच आहे, आता त्यासाठी भगवंत माझ्याकडून काही कृती करून घेत असेल तर त्याच्या इच्छेनं ती घडेल, तिला मी प्रतिसाद देईन - अशा निखळ भावनेनं वास्तवाचा जो स्वीकार करतो, तो शरणागत होय.

माझं जे कल्याण होतं, तेव्हा मी गप्प, स्वस्थ बसलो आहे, असं असं होत नाही. भगवंत जे करतो ते कल्याणाचंच करतो. मग त्यानं आजारी पाडलं तर, म्हणता येईल का, हे कल्याणाचं आहे म्हणून ? मनुष्याची सहजपणे अशी भावना होत नाही. शरणागत व्हायला कसं पाहिजे की, तेसुद्धा माझं कल्याण आहे. आता बरं असल्यावर मला काय माहिती की, माझ्याकडनं माझं काय होणार आहे ? मग त्यापेक्षा बरा नाही हेच बरं, चांगलं आहे, असं वाटावं. माणूस बरा असला म्हणजे त्याचं काही चांगलं असतं, असं नाही. समजा, एखादा आजारी पडला काय, अपघात झाला काय, तर तो सोडून, बाकीचे अपघात न झालेले लोक फिरतच असतात ना ? ते काय स्वानंदी असतात की सुखाच्या साम्राज्यात असतात ? असं काही असतंच असं नाही. ते दुःखीच असतात. तर, खरं सुख नुसतं बरं होण्यावर, निरोगी राहाण्यावर नाही.

आपण विचार करा, एखाद्या आजारपणात एखाद्या ग्रंथाची गाठ पडते, एखाद्या सत्पुरुषाची गाठ पडू शकते. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झालेल्या मनुष्याच्या हातात प्रवचनांचं पुस्तक पडतं, ते वाचल्यावर त्याला कळतं की,

बापरे ! आपल्या आयुष्यात केवढी महत्त्वाची गोष्ट मला आजपर्यंत कळली नाही. आता ते कळायला, काय व्हायला लागलं ? लौकिकदृष्ट्या हे आजारपण, ॲडमिट होणं ! मग आता ते आजारपण त्याच्या कल्याणचंच ठरलं ना ? की, त्याचं नुकसान म्हणायचं ? पण साधारणपणे आजारी पडला हे कल्याणाचं झालं, असं आपल्याला वाटत नाही. सामान्य माणसाची अशी मनाची उलघाल सुरू असते. म्हणून शरणागतीची व्याख्या समजून घेणं महत्त्वाचं आहे. भगवंत जे करतो आहे किंवा जे करेल, ते उत्तम आणि कल्याणाचंच आहे. अशा निखळ, शुद्ध भावनेनं वास्तवाचा स्वीकार करण्याची मनाची अवस्था, म्हणजे शरणागती होय.

आता वास्तवाचा स्वीकार प्रयत्न सोडून आहे का ? तर नाही. प्रयत्न सगळे करून झालेले आहेत. आता पुढे काय ते सांगा. वर्षभर अभ्यास केला आहे. पेपर लिहिल्यानंतरची अवस्था ही शरणागत अवस्था आहे. अभ्यास करण्यापूर्वी शरणागत भाव नाही ! मुलांनी ते लक्षात ठेवावं ! मोठ्यांनी आयुष्यातील पेपर तसे सोडवावेत.

एखादी सिस्टीम असते. तर त्या सिस्टीममध्ये काम करताना शेवटच्या क्षणापर्यंत धडपडावं लागतं. ती तशी धडपड करायची. त्यानंतर काय ? तर आता मग शरणागती. त्या धडपडीतून जे निर्माण होईल, ते उत्तम होत असेल तर, ते भगवंतानं केलेलं आहे. आणि ते माझ्या कल्याणाचं आहे. याची खात्री बाळगणं. आणि समजा, त्यात अपयश आलं - फेल्युअर येत असेल तर ? तरीसुद्धा, ते माझ्या कल्याणाचंच म्हणून ठेवलेलं आहे, ही ज्याच्या मनाची अवस्था होऊ शकते, त्याला शरणागतीची कल्पना आहे किंवा त्याला शरणागतीचा खरा अर्थ लक्षात आला.

अशा अर्थानं शरणागती ही अवस्था आहे, काही साधण्याचा मार्ग नव्हे. ती अवस्था पूर्ण समजुतीनं आलेली आहे. पूर्ण प्रयत्नांनंतर आलेली

आहे. ही शरणागती संतांना, भगवंताला अभिप्रेत आहे. हात पाय गाळून, शस्त्र टाकून आता लढायला तयार नाही, कर्तव्य करायला तयार नाही. असली शरणागती भगवंताला मान्य नाही. भगवंत म्हणतो, तुला जे हात पाय दिले, जे कर्तव्य दिलं, जी परिस्थिती दिली - त्यात तुझे सर्व प्रयत्न असू देत. नुसतं प्रयत्न न करता, मी शरणागत राहतो असं म्हणू नको. भगवंत म्हणतो, मग दिले कशासाठी हात पाय ? जे काही दिलं असेल ते वापरण्यासाठी आहे. हात, पाय, शक्ती, बुद्धी - जे चालू शकतं, ते चालवणं, त्याला अभिप्रेत आहे.

पण प्रयत्न संपल्यानंतर, त्यांची मर्यादा आल्यानंतर मात्र - मी तरीही सगळं चालवीतच राहीन - असं म्हणणं मात्र भगवंताला मंजूर नाही. तुझे सर्व प्रयत्न करून झालेत तर, आता आनंदानं रहा, मला काय द्यायचं ते मी देतो, असं त्याला म्हणायचं आहे. हे सारं स्वीकारण्याची तयारी ही शरणागती आहे. त्यामुळं शरणागती ही अवस्था आहे, काही साधण्याचा मार्ग नव्हे !

शरणागतीविषयी असा सारा समजूतदार विचार करून चाललं, तर अशी अवस्था साधकाला गाठता येईल. ती अवस्था त्याच्या प्रगतीची ठरेल !

।। श्रीराम ।।

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. ०२/०८/२००८ च्या निरूपणावर आधारित)

चिंतनक्षण

वचन क्र. ४ * निरूपण : क्र. ५

बागेत लावलेल्या रोपाची काळजी घेतो तेवढी तरी आपल्या साधनेतल्या संकल्पाची काळजी आपण घ्यायला हवी.

खरंतर मूळ तत्त्व सांगायचं असतं, लक्षात ठेवायचं असतं आणि उपयोगीही पडतं. पण ते तत्त्व असल्यामुळं, अनेकदा ते समजून घ्यायला मर्यादा असतात. मग ते तत्त्व सोपं करण्याचा प्रश्न येतो. ते सोपं करण्याचा एक मार्ग म्हणजे, ते समजू शकेल असा एखादा दृष्टांत देणं !

फक्त हे एक लक्षात ठेवलं पाहिजे की, दृष्टांताला मर्यादा असते. तो एका मर्यादेपर्यंत त्यातला भाव सांगतो. फक्त आपल्याला कळणाऱ्या भाषेत तो असतो, म्हणून तो दृष्टांत असतो. आपण जे बाहेर पाहिलं आहे, त्यात कुठंतरी मूळ तत्त्वाचा अनुभव येऊ शकतो.

आपलं मूळ तत्त्व असं की, आपल्या साधनेतल्या संकल्पाची आपण काळजी घ्यावी. संकल्प म्हणजे, आपल्या अंतिम हितासाठी, उद्धारासाठी, कल्याणासाठी निर्धारपूर्वक ठरवलेली विशिष्ट कृती होय. ती कृती प्रत्येक मनुष्याच्या मनाच्या ठेवणीप्रमाणं, त्याच्या प्रगल्भतेप्रमाणं, त्याच्या स्वतःच्या गरजेप्रमाणं त्या-त्या स्वरूपाची असू शकते. एखाद्याला देवदर्शनाचासुद्धा संकल्प पुरेसा असेल. एखाद्याला नित्य पारायणाची गरज असेल. एखादा आणखी काही अभ्यास करीत असेल, एखाद्याचा जपाचा संकल्प असेल, पुढं वृत्त्यंतर असेल - अशा स्वरूपाचे संकल्प आपल्या आत्महितासाठी, आत्मकल्याणासाठी, उद्धारासाठी असतात.

श्री विश्वनाथ महाराजांच्या अभंगात, 'ऐसे करावे साधन, नरजन्म होई धन्य' असं म्हटलेलं आहे. तेव्हा स्वतःला तर धन्यता वाटावी आणि इतरांनाही आपल्या जीवनाबद्दल धन्यता वाटावी, असं साधन करणं म्हणजे खरा संकल्प होय.समजा एखाद्यानं खूप मोठा श्रीमंत व्हायचा संकल्प केला, फार मोठी इस्टेट करायचा संकल्प केला तर, त्यात त्या माणसाचं स्वतःचं लौकिक कल्याण झालं, इतरांचं नाही झालं. तो संकल्प या 'धन्यते'मध्ये बसत नाही. आत्मकल्याणामध्ये आपोआप दुसऱ्याचा उद्धार होत असतो. अशा तऱ्हेच्या उद्धाराची कल्पना आपल्याकडं आहे.

हा जो बागेतल्या रोपाचा दृष्टांत आहे, तो एका मर्यादेपर्यंतच सांगतो. हे एवढ्यासाठी की, त्यातून आपल्याला कळायला सोपं पडतं. बागेत लावलेल्या रोपाची आपण जेवढी काळजी घेतो, तेवढी तरी आपल्या संकल्पाची घ्यावी. तेवढी तरी घ्यावी म्हणजे, तेवढीच घ्यावी असं नाही. बागेत लावलेल्या रोपाची किती प्रकारे आपण काळजी घेतो. एखाद्या रोपवाटिकेत आपण जातो. तिथला छान गुलाब बघून, हा आपल्या बागेत नाही म्हणून ते रोप विकत घेतो किंवा कुणाकडून त्याचं योग्य मूल्य देऊन आणतो. मूल्य म्हणजे केवळ पैसा नव्हे. रोप देण्याची विनंती, कृतज्ञता, साधा नमस्कार, रोप दिल्याची आठवण - हेसुद्धा मूल्यच होय. रोप आणल्यावर, चांगला खड्डा घेऊन, त्यात चांगली माती घालून रोप लावतो. तसा तो मनुष्य त्या रोपासाठी कितीतरी गोष्टी करतो.

यासाठी स्वतःचीच बाग पाहिजे आणि त्यात रोप लावलं पाहिजे, असं काही नाही. जे लोक रोप लावतात त्यांच्याकडं बघूनसुद्धा कळतं की, ते काय काय काळजी घेतात. तेवढी ज्यांच्याकडं बाग नाही, त्यांनी तशी काळजी घ्यावी. ज्याअर्थी आपल्याकडं बाग नाही, आपण कधी रोप लावलं नाही त्याअर्थी हा दृष्टांत आपल्याला लागू नाही, असा समज होण्याची

शक्यता आहे. कारण मनुष्य मुळातच जन्मजात वकील असतो.

काहीजण दुसऱ्याच्या फुलझाडावरची फुलं घेऊन जातात. त्यांना तरी, त्या मनुष्यानं लावलेल्या रोपाच्या काळजीची, त्याच्यासाठीच्या कष्टांची कल्पना नक्कीच(?) असेल ! त्यांच्या देवाला तरी कोण फुलं आणून देणार ? मालकाला एवढं सगळं शक्य नाही, म्हणून ते त्याला मदत करतात ! अशी सगळी फुलं गोळा करून विकण्यापेक्षा ते जास्त चांगलं आहे. प्रश्न मूल्य देण्याचा आहे. देवाला फूल घातलं म्हणजे त्याचं मूल्य झालं. तसं केलं तरी हरकत नाही. पण परवानगी घेऊन फुलं काढणं अधिक चांगलं होय. तर, अशा लोकांनाही रोपाची काळजी, त्याचे कष्ट याची माहिती असते.

ते रोप फुलाच्या अवस्थेला येईपर्यंत किती काळजी घेतली जाते ! त्याचं पाण्याचं प्रमाण ठरलेलं असतं. जास्त पाणी दिलं तर, रोपं कुजतात. रोप अशा ठिकाणी लावतो किंवा ठेवतो की, त्याला ऊन्हपण मिळेल. उन्हाचीपण रोपाला गरज असते. उन्हात रोप तापतं आणि त्याच्या वाढीला लागणारे घटक त्यामुळं निर्माण होतात. घरात अंधारात ठेवलेल्या झाडापेक्षा ते उन्हात वाढलेलं झाड कसं जिवंत, अधिक चांगलं येतं. तर, त्यादृष्टीनं आपण रोपाची काळजी घेतो. आपल्या साधनेचे संकल्प असतात ना, त्यामध्येसुद्धा अशा थोड्या तपःश्चर्येची गरज असते. रोपाला उन्हाची आच लागते, ती नसली तर रोप तरारून वाढत नाही. म्हणून हे लक्षात ठेवावं की, काही कष्ट न घेता माझी साधना चालू असेल तर, ती तपःश्चर्या नव्हे ! ती साधनासुद्धा अशी तीव्र आणि जिवंत होणार नाही. तर एवढी तरी काळजी आपण आपल्या संकल्पाची घ्यावी.

आपण जेव्हा रोप लावतो, त्याच्यामध्ये सूक्ष्म भाग आहे की, ते रोप कशासाठी लावतो ? आता काहींना काम नसतं, कमी असतं म्हणून ते मिळावं, अशासाठी ते बागकाम करतात.काहीतरी करण्यापेक्षा बागकाम

करणं नक्कीच चांगलं आहे. त्यामुळं निदान चार वनस्पतींना जीव मिळतो, त्यांना वाढवायची संधी मिळते. साधारणपणे मनुष्य बागकाम काही आपला वेळ जाण्यासाठी म्हणून करत नाही. रोपावर जे फूल येणार, फुलाचा सुगंध मिळणार - त्यातून त्याला आनंद मिळणार त्यासाठी तो हे सारे कष्ट करतो. फूल, त्याचा सुगंध ही रोपाची परिपूर्णता आहे. परिपूर्णतेसाठी केलेली छोटीशी कृती म्हणून बागेतल्या रोपाचं उदाहरण दिलेलं आहे. त्याऐवजी एखाद्या वृक्षाचं किंवा दुसऱ्या कुठल्या गोष्टीचं देता आलं असतं. पण बागेतल्या रोपाची काळजी घेण्याचा दृष्टांत यासाठी घेतला आहे की, त्या सगळ्या माध्यमातून परिपूर्णतेसाठी केलेले प्रयत्न लवकर आणि चटकन कळून येतात. तेव्हा आपले जे उपासनेतले संकल्प असतात तेसुद्धा आनंदाच्या परिपूर्णतेसाठी असावेत, आणखी कशासाठी नसावेत.

रोप निर्माण होण्यासाठी, त्याला सर्व अनुकूलता मिळेल अशी योग्य काळजी आपण घेतो. आता हे करताना, आपल्याला माहिती आहे की, यात काही तज्ज्ञतेचा भाग आहे. कोणती रोपं कशा पद्धतीनं लावावीत, कशी वाढवावीत, त्या रोपाला काय द्यावं, काय देऊ नये, कोणत्या गोष्टी हव्यात, कोणत्या नकोत - याचीसुद्धा काळजी व्यवहारानं घ्यावी लागते. ज्यांच्याकडं रोप लावण्याची जागा आहे किंवा ज्यांनी प्रयोग करून बघितले आहेत त्यांना अनुभव येतो की, रोप आणून लावलं पण ते आलं नाही. कारण, त्याच्यासाठी आवश्यक सल्लामसलत घ्यायला पाहिजे ती त्यांनी घेतली नाही. यासाठीसुद्धा काही तज्ज्ञ लोक असतात. त्यांच्याकडून आपण समजून घेतो की, कोणत्या सीझनला -हंगामात रोप लावावं, त्याची पद्धत, छाट देणं, त्यात येणाऱ्या अडचणी - या सगळ्यांचा सल्ला घेतो. तसंच साधनेतल्या संकल्पासाठीसुद्धा सल्ला घेण्यासाठी जावं.

हे रोपाचं उदाहरण खूप बारकाव्याचं आहे म्हणून ते दिलेलं आहे.

आपण लावलेली रोपं येतातच असं नाही. साधनेची, संकल्पाची लावलेली रोपंसुद्धा काही प्रमाणात येतात, काही वेळेला खुरटतात, काही वेळेला मरगळून जातात. अशावेळेला आपण ते रोप लावण्याचा जो आपला उद्देश आहे तो सोडून देत नाही. पुन्हा एकदा सर्व प्रयत्न करून, पुन्हा एक नवीन रोप लावतो.

मग संकल्पाच्या बाबतीतसुद्धा तसंच करायला हरकत नाही. साधनेतला संकल्प तडीला गेला नाही तर, पुन्हा करण्यात अर्थ नाही, हे आपण फक्त साधनेत लागू करतो ! पण आपण गेलेलं रोप आलं नाही म्हणून प्रयत्न सोडून देत नाही. आता पुन्हा आयुष्यात रोप लावण्यात अर्थ नाही म्हणून सोडून देत नाही. काही कारणांनी ते रोप गेलं असेल, वेळ चुकली असेल, ते रोप चांगलं नसेल असं म्हणून, परत एकदा मनुष्य रोप लावण्याचे सर्व प्रयत्न करतो. शेजारी तसंच रोप चांगलं आलं तर, त्यांचा सल्ला आपण घेतो. त्याप्रमाणं मार्गदर्शकाची गाठ घेतो, त्याच्या सल्ल्यानुसार सर्व अडथळे दूर करतो. रोप जास्तीत जास्त चांगलं यावं, म्हणून शेणखतासारखी नैसर्गिक खतं आहेत त्यांचा वापर करतो. वारा, प्रकाश - अशा गोष्टींची मदत घेतो. रोप परत यावं, म्हणून सर्व प्रयत्नांचा,काळजी घेण्याचा यात समावेश करतो.

साधनेतल्या संकल्पासाठीसुद्धा अवश्य ती सर्व काळजी आपण घ्यावी. जसं पहिलं रोप लागलं नाही तर, दुसऱ्या रोपाची जशी काळजी घेतो, तशीच आपल्या साधनेतल्या संकल्पाचीसुद्धा घ्यावी, हे त्यात ओघानंच आलं आहे. फुलांची रोपं बागेतच लावली जातात आणि ती बागेतच चांगली येतात.

म्हणून बागेत जे रोप लावतो त्याचं उदाहरण मुद्दाम द्यायचं कारण असं की, साधनेचे संकल्प हे मनाच्या बागेमध्येच उमलतात, कुठेतरी नसतात. आपल्या मनाच्या बागेतसुद्धा परमार्थाच्या संकल्पांची रोपं चांगली येतात.

मनाची जमीन अत्यंत सुपीक आहे. तिनं पिकवायचं ठरवलं असेल तर, ती पिकवते. म्हणून तिला फक्त संकल्पाची गरज असते. काय पिकवावं, हे सांगण्याची गरज असते. जमीन उत्तम असेल तर, तिच्यात काय लावाल ते येतं. एखादा चुकीचा संकल्प असला तरी, तोसुद्धा मूळ धरतो व त्या कृतीपर्यंत जाऊन पोहोचतो. आपण हा अनुभव घेतला असेल. असं ज्याअर्थी होऊ शकतं, त्याअर्थी मनाची जमीन सर्वांत सुपीक जमीन आहे, हे खरं. बागेचं उदाहरण दिलं आहे ते अशासाठीच की, परमेश्वरकृपेनं आपल्याला मनाची सुपीक जमीन मिळाली आहे. आपल्या प्रयत्नानं नाही, हे भाग्य आपल्या लक्षात यावं !

आता बागेत जे रोप येतं ते आपण कुठूनतरी आणतो आणि लावतो, हे बरोबर आहे. पण रोपाचे निर्माते आपण नाही. तीच संकल्पाची गोष्ट आहे. आपण संकल्प करतो. पण बुद्धी कोण देतो याचं भान असावं म्हणजे संकल्प चांगले उगवून येतात. मला जी नाम घेण्याची बुद्धी झाली, संकल्प करण्याची बुद्धी झाली, देवदर्शनाला जाण्याची बुद्धी झाली त्याचा दाता दुसरा कुणीतरी आहे, हे भान असलं की, रोपाचं उदाहरण किती तंतोतंत लागू आहे, हे बरोबर लक्षात येईल.

रोप रोपवाटिकेतून जाऊन आणलं किंवा कुणाकडून आणलं तरी, त्या रोपाची निर्मिती सृष्टी करते, आपण करीत नाही. आपण फक्त अलगद त्यांच्याकडून उचलून आणून चांगल्या तऱ्हेनं लावतो. एवढंच काम आपण करतो. तेव्हा मनामध्ये ही जी सद्‌बुद्धी उपजते तिचा कर्ता कोण, याचा कायम विचार करावा. म्हणजे संकल्पाची योग्य ती काळजी घेतली जाते आणि मध्ये जे अहंकाराचं तण वाढतं, ते वाढत नाही. जे अडथळे येतात ते येत नाहीत. ते अडथळे येऊ नयेत म्हणून, जरी रोप मी लावलेलं असलं तरी, त्याचा निर्माता दुसरा आहे - एवढं जरी लक्षात ठेवलं तरी, या वचनाचा

आपल्याला उपयोग होऊ शकेल.

या वचनात सगळे शब्द साररूपानं आलेले आहेत. म्हणून ते एका वाक्यात तेवढेच शब्द आहेत. रोपाची जी विविध प्रकारांनी काळजी घेतो तशी आपण आपल्या संकल्पाची घ्यायची आहे. संकल्पाची काळजी करणारे बरेच लोक भेटतात, पण त्यामानानं काळजी घेणारे कमी असतात ! तेव्हा काळजी घेण्याची जबाबदारी स्वतःची आहे. मी संकल्प केला आहे. त्यासाठी सर्वांनी राबलं पाहिजे, मदत केली पाहिजे, मला अनुकूल वातावरण ठेवलं पाहिजे असं नाही. काळजी आपण घ्यायची. बाकीच्यांनी नाही. मी रोप लावलं. तुम्हाला ते दिसतं की नाही, मग जाता-येताना त्या रोपाला पाणी घातलं पाहिजे - अशासारखं होईल ते !

तुम्ही रोप लावलं आहे, तुम्ही काळजी घ्या. परमेश्वराची अशी अपेक्षा आहे की, असे जे परमार्थातले संकल्प असतात ते स्वतःसाठी, स्वतः केलेले आणि कुणीतरी सद्बुद्धी उपजवून दिलेले संकल्प असतात. त्यासाठी मार्गदर्शक किंवा मदती असतात. त्या सगळ्या घ्याव्यात. रोपाप्रमाणं आपल्या संकल्पाची काळजी आपण घ्यावी, याला महत्त्व आहे. काही वेळा नीट घडलं नाही तरी,रडू नये,त्रागा करू नये.माझ्याकडून कसं होईल, अशी नुसती काळजी करण्यात अर्थ नाही. त्याचा काही उपयोगही नाही. व्यवहारात साधी इन्शुरन्सची - विम्याची नोटीस आली की, आपण त्याची डायरीत नोंद करून ठेवतो. ती तारीख येईपर्यंत आपण मधूनमधून डायरी बघतो.आठवण होण्यासाठी जशी डायरी ठेवतो,तशी संकल्पाची का नको ? त्याची नोंद का नको ? याचा विचार आपणच आपल्या मनाशी करावा.

काळजी घ्यायला पाहिजे म्हणजे काय काय करायला पाहिजे ? प्रपंचात साधं औषध घ्यायचं असलं तर, माणसाचं स्वतःचं रिमाईंडर - स्मरणपत्र लावलेलं असतं किंवा कुणाला तरी सांगितलं असतं की, त्या

वेळेला आठवण करून द्या म्हणून. व्यवहारात कुणावर अवलंबून राहू नये पण अशी मदत घ्यायला हरकत नाही. तशी मनुष्य स्वतःच स्वतःचे रिमाईंडर ठेवून काळजी घेतोच. नुसतंच ते माझ्याकडून कसं होईल, असं म्हणत बसत नाही. तेव्हा काळजीत अपेक्षित कृती करणं म्हणजे काळजी घेणं. संकल्पातही अनेक वेळेला विसरलं जातं, राहून जातं. मग हळूहळू बंद पडतं.

रोज आई-बाबांना नमस्कार करणं अशी छान कृती सुचते. उत्तम संकल्प सुचतो. एक दोन दिवस नमस्कार केला जातो. तिसऱ्या दिवशी अभ्यास राहतो, त्या गडबडीत बाहेर पडल्यावर आठवण येते की, नमस्कार राहिला. परत आत जाऊन येणार तर उशीर होईल. त्यामुळं आज आत्ता नको, आल्यावर नमस्कार करू या. आपल्या संकल्पाच्या गमतीजमती अशा घडत असतात.

मूळ मुद्दा माझ्या संकल्पाचं काय होतं आहे, त्याचा आहे. आईबाबांच्याऐवजी देवाला, गुरूंना, रामाला किंवा श्री महाराजांना नमस्कार करायचा, त्यांना सांगायचं आणि निघायचं, असा साधा संकल्प केला आहे. चपला घालत फट् फट् पायऱ्या उतरताना आठवण होते की, अरेरे ! सांगायचं राहिलं. श्रीमहाराज तर काय सर्वत्र भरलेले आहेत ! त्यामुळं तिथंच 'महाराज'म्हणून मोकळे !

आपण कसे बॉर्न लॉयर-जन्मतःच वकील आहोत. श्रीमहाराज जसे सर्वत्र भरलेले आहेत, तसे ते देवघरात किंवा फोटोत पण आहेत ना ! तर, आपला संकल्प आहे ना, श्रीमहाराजांना घरात नमस्कार करून, सांगून निघायचं - मग परत घरात येऊन ते करावं, असं जेव्हा चार वेळेला होईल, तेव्हा ते नक्की विसरलं जाणार नाही. आपल्या मनाचा विसरण्याचा, न विसरण्याचा मेकॅनिझम - कार्यपद्धती आपल्याला माहिती आहे.

मनाची फार सुंदर मशिनरी - यंत्रणा आहे. असं चार वेळेला

चौकातून मागं यायला लागेल तेव्हा थोडा उशीर होईल, धावपळ होईल. समजा, ऑफिसला जायला उशीर होईल, तिथं उशिरा आल्याबद्दल ऐकून घ्यावं लागेल. त्यामुळं थोडंसं आपलं नुकसान होईल. म्हणून तरी उद्या जाण्यापूर्वी श्रीमहाराजांना नमस्कार करून सांगून निघता येईल आणि ते मग आपोआप घडेल. कारण मनच सगळा व्यवहार करणारं तर, त्याच्याकडून ते होण्याची शक्यता आहे.

आपण हे फक्त सगळं समजून घेतलं तर होणार आहे. आपले संकल्प मुक्त करणारे, भगवंताकडं नेणारे, आनंदी करणारे अशा स्वरूपाचे असावेत. अशा तऱ्हेनं संकल्पाची सगळी काळजी आणि तशी कृती मी करीत असेन तर, परमार्थाच्या, साधनेच्या संकल्पाबाबतीतसुद्धा मला सगळं करता येणं शक्य आहे. यादृष्टीनं आपण या वचनाकडं बघावं आणि आपण तशी काळजी घेण्याचं लक्षात ठेवावं, अशी आपल्याला विनंती आहे.

आपण काळजी कशी घ्यावी, ते रोपाकडं बघून ठरवावं. कोणकोणत्या प्रकारची घेतो ते बघावं. रोपाच्या दृष्टांताची शेवटी मर्यादा आहे. प्रपंचात ज्या गोष्टी असतात, त्या व्हाव्यात म्हणून आपण सांगतो की, आठवण म्हणून तुम्ही मला दोन रिंग द्या. मला निघताना तुम्ही आठवण करा. दुसऱ्याच्या मदतीनं आपल्याला प्रपंचात चालावं लागत असेल तर, हरकत नाही. कुणीतरी मदत करणारं असेल तर, त्याची मदत घ्यावी. पण ती घेतल्यानंतर शेवटी आपण आपली काळजी घ्यावी. त्यामुळं तसं करता आलं तर, हीच आपली रिंग आपल्याला घेता येते, अशी व्यवस्था आहे. ती व्यवस्था फक्त ऑपरेटिव्ह - कार्यान्वित नसते, एवढाच फक्त प्रश्न आहे.

लहान मुलांची सहल जायची असेल किंवा मोठ्यांना परगावी कामासाठी जायचं असेल तर, मग कशी वेळेवर जाग येते ? पाचचा गजर लावला दोनला पहिली जाग, चारला दुसरी जाग, पावणेपाचला तिसरी जाग

आणि पाचला जागच नाही. अशीही गंमत घडते. गजर असला तर ठीक, नसेल तर ? असलं काहीतरी होतं. एवढा सगळा मेकॅनिझम-कार्यपद्धती दोन वाजल्यापासून चालतो तर, जाताना श्रीमहाराजांना सांगून जाण्याची आठवण व्हायला काहीच हरकत नाही. एवढं लक्षात ठेवलं तर, या वचनाचा आपल्याला उपयोग होईल.

आता आपण इतक्या बाजूंनी विचार केलाच आहे. तर, तशी आता आपण आपल्या साधनेच्या संकल्पाच्या रोपाची काळजी घ्यावी, म्हणजे झालं !

।। श्रीराम ।।

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. ०९/०८/२००८ च्या निरूपणावर आधारित)

चिंतनक्षण

वचन क्र. ५ * निरूपण : क्र. ६

भक्ताला परिस्थिती अनुकूल - प्रतिकूल नसते तर
ती भगवंताकडं जायला फक्त 'उपयुक्त' असते.

भक्ताला परिस्थिती अनुकूल - प्रतिकूल नसते तर ती भगवंताकडं जायला फक्त उपयुक्त असते, असं म्हणताना, प्रथम हे लक्षात घ्यावं की, भक्त झाला म्हणजे परिस्थिती माफ होते, असं काही नाही. भक्ताला देह आहे, त्याच्याबाजूला माणसं आहेत, सारख्या वेगवेगळ्या घटना घडत आहेत, त्या घटना मनाविरुद्ध आहेत, काही वेळा त्या मनाप्रमाणंपण घडत आहेत. म्हणजे भक्तालापण अशी परिस्थिती असते.

सत्पुरुषांची चरित्रं आपण वाचतो, त्यांचा अभ्यास करतो आणि त्यांच्याकृपेनं तो करीतही राहू. अगदी रामकृष्णांपासून ते श्रीमहाराजांपर्यंत सर्व महापुरुषांची चरित्रं आपण वाचली आहेत. विचार केला तर, परिस्थितीमधलं त्यांच्या वाट्याला काय आलं नव्हतं ? तर सगळं होतं. कुणाला मुलं-बाळं होती, कुणाला नव्हती, कुणाला मुलांचा त्रास होता. श्री एकनाथ महाराजांच्या घरच्या प्रपंचाची आपल्याला माहिती आहेच. त्यांनी आयुष्यभर भेदभाव विसरून जगाशी व्यवहार केला. त्यांच्याच मुलानं घटपटादी वेदान्त स्वीकारून विद्वत्तेमध्ये अडकावं, यासारख्या प्रपंचाच्या आणखीन काय तऱ्हा असाव्यात ? श्री एकनाथ महाराजांचं आपण भागवतासाठी नाव घेतो की, जो ग्रंथ आपल्याला आदर्श आहे आणि त्याच्यावर आजही भागवत धर्माचं सगळं चाललं आहे. तर, त्या नाथांना पण मुलाची प्रतिकूल परिस्थिती वाट्याला आलीच ना ?

सर्वसाधारण माणसाची परिस्थितीबद्दल तक्रार असते आणि ती ती त्याला सारखी अनुकूल-प्रतिकूल अशी वाटत असते. भक्ताच्या दृष्टीनं आणि सामान्य माणसाच्या दृष्टीनं परिस्थितीकडं बघण्यात फरक आहे. भक्तांनापण परिस्थिती आहे.

श्रीमहाराजांची पहिली पत्नी वारली. तसा लौकिकदृष्ट्या विचार केला तर, केवढं नुकसान आणि केवढा प्रसंग होता त्यांच्यावर ? त्याकाळच्या परिस्थितीमध्ये त्यांनी दुसरं लग्न केलं. दुसरी पत्नी अंध होती. मुलं झाली, पण ती अकाली गेली. कित्येक कारणांसाठी लोकनिंदा सहन करावी लागली. इस्टेटी, जमिनी, त्यांचे वाद, त्यासाठी कोर्टकचेऱ्या कराव्या लागल्या. म्हणजे परिस्थिती म्हणून जर विचार केला तर, ती त्यांच्याही वाट्याला आली. कारण एकदा देह धारण केला म्हटल्यावर, आईवडिलांपासून सर्व परिस्थिती वाट्याला येणारच.

तेव्हा परिस्थिती ही कुणालाही असणारच. मग यात फरक कुठं असावा ? ते बघण्याआधी अनेकांची 'भक्तीची कल्पना' स्पष्ट केलेली बरी. आपण भक्त आहोत, साधना करतो, देवाचं नाव घेतो तर - परिस्थिती माफ होत नाही. देवाचं नाव घेतलं की, आता आपलं सगळं सुरळीत चालणार, असं होत नाही. तसं झालं तर, मग भक्ती म्हणजे एका औषधासारखं काम झालं. औषध घेतलं की, बरं होईल, अशासारखं झालं. भक्तीच्या अशा कल्पना रुजायला लागल्या तर, त्यामुळं पुढं मग अपेक्षाभंग होतो.

एवढं देवाचं नाव घेतो पण परीक्षेत पास नाही झालो, अजून लग्नाचं काही जमत नाही, असं मनुष्य म्हणतो. मी एवढी भक्ती करतो पण अचानक अनपेक्षितपणे एवढा आजार, एवढा अपघात कसा वाट्याला आला, असं म्हणतो. आता खरंतर, हे जे काय सगळं घडलं ते परिस्थितीचाच भाग आहे ना ? श्रीमहाराज सांगतात त्याप्रमाणं, घडामोड हा जगाचा स्वभावच आहे.

आपणही त्यामुळं घडलेलंही बघतो आणि मोडलेलंही बघतो. आपल्याला दोन्हींही बघावी लागतात, आपण भक्त असो किंवा नसो. तर ही सगळी वस्तुस्थिती आहे.

भक्ताच्या आणि सामान्य माणसाच्या परिस्थितीकडं बघण्यामध्ये व ती घेण्यामध्ये फरक आहे. आपण म्हणतो ना, हाऊ हॅव यू टेकन अ थिंग? थिंग्ज आर देअर. त्या तशाच आहेत. त्या तुम्ही कशा घेता, याच्यावर सगळं अवलंबून आहे. भक्ताचं त्या घेण्यामध्ये काही वैशिष्ट्य असलं पाहिजे की, हाऊ टु टेक ? तुम्ही कशी घेणार परिस्थिती ? प्रत्येक परिस्थितीची जी काही हालचाल होते, ती मनुष्य आत घेत असतो. भांडण झालं तरी आत घेत असतो, कुणी मनाप्रमाणं वागलं तरीसुद्धा ते आत घेत असतो. प्रत्येक वेळेला ते आत जात असतं आणि त्याच्या प्रतिक्रिया येत असतात. त्यावेळेला अनुकूलतेच्या प्रतिक्रिया आणि प्रतिकूलतेच्या तक्रारी निर्माण होतात.

काही परिचित वाक्यं आपण बघू. 'माझ्या घरातली माणसं अनुकूल असती ना तर, बघा मी काय केलं असतं !' 'आम्हाला बुद्धी कमी पडली, नाहीतर आम्ही काय करून दाखवलं असतं !' आता वरचं लौकिक उदाहरण सोडून साधनेचं उदाहरण बघू. 'घरात शांतता राहिली असती तर, माझा जप झाला असता !' 'हे घरातले सगळे काहीतरी कटकट कटकट करत राहतात. त्यामुळं माझं जपामध्ये लक्ष लागत नाही !' किंवा 'माझ्याकडून जास्त जप होत नाही !' आता ज्या माणसाच्या घरात कोणी कटकट करीत नाही त्याच्याकडं जपाचा किती ढीग पडला आहे, ते चौकशी करून यावं, म्हणजे याचं उत्तर सापडेल. आपली जर अशी कल्पना असेल की, शांतता झाल्यावर जपाचं प्रमाण वाढणार आहे, तर अशी समजूत करून घेण्यात काही अर्थ नाही. तसं काही नसतं.

अनेकांना पैशाची चिंता लागलेली असते. एकदा पैशाचं मार्गी लागलं

की, चिंतेचं काही कारण नाही, असं वाटत असतं. स्वाभाविक आहे की, साधं दूध आणायला मनुष्य गेला तरी पैसा लागतो. पायाला चप्पल म्हटली की, पैसा लागतो. मग पैशाचं मार्गी लागलं की, चिंतेचं काही कारण नाही, असं वाटणं हे वरवर पाहाता किती बरोबर आहे, असं वाटतं. म्हणून पुढं मनुष्य म्हणतो की, हे पैशाचं मार्गी लागलं की, मग आपण आपलं नुसतं ध्यान करू शकू, ध्यान ! मग फक्त महाराज ! फक्त नाम ! एवढंच करायचं.

आता पैशाचं ज्यांचं मार्गी लागलेलं आहे, मार्गीच काय, भलतंच मार्गी लागलं आहे - त्यांच्याकडं ध्यानाचं काय चाललेलं आहे, तेवढं बघा म्हणजे झालं ! ज्यांना पैशाची चिंतासुद्धा उरलेली नाही त्यांच्याकडं जाऊन बघावं. कारण, आता आपल्याला एकदम काही पैसा निर्माण करून अनुभव घेता येणार नाही. तसं असतं तर, अधिक सोपं झालं असतं ! कारण लोक म्हणाले असते की, हाच मार्ग चांगला आहे. निदान ह्या निमित्तानं पैसा तरी आला. अनुभवच द्यायचा आहे ना तर, देवानं एकदा तेवढं तरी करावं, एकदा भरपूर पैसा देऊन टाकावा, म्हणजे खरंच त्यानं चिंता मिटून साधना होते आहे की, नाही हे आम्ही अनुभवानंच सांगू शकू ना ! आम्हाला जरा पैशाची चिंता लागली आहे. तेवढा द्यावा. म्हणजे शांतता झाली की, मग बघाच तुम्ही नुसतं ! म्हणजे ही आणखी एक प्रापंचिक युक्तीच झाली !

तर, ते असं आपल्याला बघायचं असतं. पण ते तसं शक्य नाही. एकतर, ती विषाची परीक्षा होईल. कारण याचा अनुभव अगणित लोकांनी पूर्वीच घेऊन ठेवलेला आहे. दुसरं असं की, परिस्थितीच्या अनेक घटनांमुळं ती पैशाची निर्मिती होते. ते घटक काही अनुभव घ्यायचा म्हणून असे हवेतून उत्पन्न करता येणार नाहीत. तसं करणं योग्यही नाही. म्हणून इतरांच्या अनुभवाचा आधार घेऊन, हे लक्षात ठेवावं की, पैशाचा आधार वाटत असल्यामुळं आपण गृहीत धरतो आहोत की, पैशाची व्यवस्था लागली

म्हणजे सगळं व्यवस्थित होणार. मग आता ज्यांच्याकडं पैसा भरपूर आहे, अशी माणसं खरं तर भक्तिमार्गात एकेक महासागर असली पाहिजेत. पण तिथं तर जास्तच दुष्काळ आहे, तुम्ही जाऊन बघा तिथं. ध्यान, भक्ती, देव, नाम, शांती - हे तर सोडाच, तिथं उलट गरीबांपेक्षा जास्त लोभ, त्याची काळजी, असुरक्षितता, इस्टेटींचे वाद, कोर्टकचेऱ्या, भीती - अशा अनेक गोष्टी झोप उडवीत असतात. निदान ज्याच्याकडं पुरेसा पैसा आहे, तिथं तरी हा भक्तिमार्ग नांदला पाहिजे की, नाही ? पण ते तसंही नसतं. म्हणून हा सगळा परिस्थितीचा विचार करायला लागतो.

मुद्दाम होऊन ही उदाहरणं घेतलेली नाहीत. घरची माणसं, पैसा - असे आपले परिस्थितीचे अनेक घटक आहेत की, ज्यांच्यामुळं आपली तक्रार असते, म्हणून घेतली आहेत. परिस्थितीचं मूळ-बेसिक घटक म्हणजे खरंतर, सर्वांत पहिलं म्हणजे आपली शरीर प्रकृती आहे ना ? आपण पाहा, खूप लोकांना वाटतं की, माझ्या तब्येतीच्या सतत काही तक्रारी सुरू असतात. माझ्यावर ही शारीरिक प्रतिकूल परिस्थिती आली, म्हणून माझ्या हातून साधन होत नाही, जपात लक्ष लागत नाही किंवा जप होत नाही. त्यासाठी श्रीमहाराजांनी एकदा मला तेवढा तंदुरुस्त ठेवावं, असं वाटतं.

श्रीमहाराजांना माहिती आहे पुढं काय होणार ते ! याला तंदुरुस्त ठेवला तर, हा जगात आणखीन दहा उद्योग निर्माण करेल. हा नादुरुस्त आहे, हेच साधनेला चांगलं आहे. त्याच्या हिताचं आहे.

आणखी पाहा, काही वेळा मनुष्य लग्न जमत नाही म्हणून श्री महाराजांकडं खेपा घालतो. श्रीमहाराजांची भक्ती करतो. पाच-पाच तास जप करतो आणि लग्न झाल्यानंतर म्हणतो, श्रीमहाराजांकडं जायला अलीकडं वेळच मिळत नाही. लग्न जमावं या आशेनं आधी उलट जास्त जप होत होता. श्रीमहाराजांच्या कृपेनं त्याचं लग्न झालं तर, तेच आता साधनेच्या

आड आलं.परिस्थिती ही अशी आहे. मनुष्याला नोकरी नसली की, महाराज महाराज करत निदान जप तरी करतो आणि एकदा नोकरी लागली की, म्हणतो काय, सकाळी आठला बाहेर पडावं लागतं ते रात्री दहा वाजतात परत यायला, कधी महाराजांचं नाव घेणार ? जर अनुकूल परिस्थिती असती तर, जप केला असता. लग्न जमावं, नोकरी लागावी ही अनुकूलता लाभली, ती तुम्हीच मागितली ना, श्रीमहाराजांजवळ? जर अनुकूल परिस्थिती तुमच्या साधनेच्या आड यायला लागली तर भगवंतानं ती द्यावी की, नाही याचा खरोखरच विचार करावा. म्हणूनच श्रीमहाराज परिस्थितीत बदल घडवण्याच्या भानगडीत पडत नाहीत. तेच काय, सगळे संत उलट म्हणतात, तुमची जी कर्मं आहेत, त्यानुसार तुमची परिस्थिती आहे. ती तुम्ही समजून घ्या. त्यातसुद्धा परमार्थ होईल.

कॉलेजमध्ये मुलांच्या निरोपसमारंभासाठी शुभेच्छा देण्याकरता श्री मामासाहेब दांडेकरांना बोलावलं होतं. त्यांनी आपला आशीर्वाद दिला, 'धर्मकर्मे असो तुम्हा कल्याण' कारण शेवटी असं आहे, वर्षभर तुम्ही जसा अभ्यास केला असेल, त्याप्रमाणं तुमचं कल्याण होणार आणि ते होऊ देत, असं स्पष्टपणे मामांनी सांगितलं. उगाच आता आशा लावायची म्हणून, तुम्ही माझा आशीर्वाद घेतला आहे ना तर, आता काही तुम्ही काळजी करू नका, तुम्ही मेरीटमध्ये याल, असलं काही म्हणण्याची गरज नाही ! कारण असल्या बुवाबाजीवर त्यांचा अजिबात विश्वास नाही.

ज्याच्या त्याच्या अभ्यासाच्या कर्मानुसार त्याला मार्क मिळावेत, त्याचं कल्याण व्हावं. कारण संतांनी याचा अभ्यास नसताना, त्यांच्या अपवादभूत अधिकारात त्याचं कल्याण केलं तर, पुढं हा भगवंताची आठवण ठेवणार का, हा प्रश्न आहेच. तरीही शेवटी अर्थात मामांनी सांगितलं की, माऊली मवाळ आहे, प्रेमळ आहे, मला तुमच्या चिंता पाहावत नाहीत,

म्हणून मी सर्वांना आशीर्वाद देतो की, तुम्हा सर्वांना चांगलं यश मिळो ! मामांनी प्रेमळ आशीर्वाद दिला. पण प्रथम त्यांचा दंडक हाच होता की, जशी कर्मं केली आहेत तशीच परिस्थिती वाट्याला येईल आणि ती आपण स्वीकारावी !

आपण विचार करावा, परिस्थिती म्हणजे तरी, नेमकं काय आहे ? माझ्या कर्मांचे गोळा झालेले परिणाम म्हणजे माझी परिस्थिती. ही परिस्थिती, तशी ही माणसं, गावं, घटना, यशापयशं आलीत कुठून ? काहीतरी ऋणानुबंध आहेत, काहीतरी देणं - घेणं आहे म्हणून ती आलेली आहेत.

श्री महाराज गाडीतल्या डब्यातल्या माणसांचं उदाहरण द्यायचे. गाडीत डब्यात दहा माणसं जवळ येतात, एकत्र बसतात. एखादं स्टेशन आलं की, आपण तिथं फळं विकत घेतो. निदान लाजेकाजेनं, व्यवहार म्हणून किंवा खरोखरच अगदी भावना म्हणून, त्या माणसाला दिल्याशिवाय कसं खावं, असं आपल्याला वाटतं. म्हणून सगळ्यांना आपण देतो. त्या स्टेशनवर दुसरा मनुष्य चढतो. आता दिल्यावर शेवटी बरोबर एक फळ राहिलं, ते त्याचं ! म्हणून तो मनुष्य आत आलेला आहे. पुढच्या स्टेशनवर तो उतरून पण जातो ! तसे आपल्या प्रपंचामध्ये त्यांचे त्यांचे ऋणानुबंध आहेत, म्हणून माणसं आली आहेत आणि आपल्या प्रपंचात बसलेली आहेत. आपल्याच कर्मांचे परिणाम गोळा झाले, म्हणून परिस्थिती झाली, हे समजून घेतलेलं जास्त योग्य होईल.

आता सामान्य माणूस परिस्थितीबद्दल अनुकूल-प्रतिकूल, चांगली-वाईट, हे असं आहे म्हणून तसं आहे, हे लोक म्हणतात म्हणून असं होतं, हे लोक करतात म्हणून तसं होतं. अशा प्रतिक्रिया व्यक्त करत असतो. परंतु भक्त तसा विचार करत नाही. भक्ताच्या दृष्टीनं जी परिस्थिती गोळा झालेली आहे तिचे दोन भाग आहेत. एकतर पूर्वीच्या कर्मांचे परिणाम आणि

दुसरे आत्ताच्या.

समजा घरात भांडणं होतात, त्यामुळं माझं लक्ष लागत नाही, अशी परिस्थिती आहे. आता भांडणं काय एकट्याचीच होतात काय ? दोघांची मिळूनच होतात ना ? कारण मला तरी असं वाटतं की, एकटा मनुष्य उठून भिंतीसमोर भांडायला गेला तर, ॲडमिट करतील की, त्याला ! मतभेद एकमेकांचेच होणार ना ? तो दुसऱ्या माणसांसमोरच काहीतरी करणार, बोलणार ना ? म्हणजे याचा अर्थ दोन पाट्र्या नक्कीच असणार. काही ठिकाणी चार-चार पाट्र्या असतात ते सोडून देऊ. पण ही परिस्थिती म्हणून दोन माणसं, चार माणसं गोळा नाही का झाली ? त्या दोनमुळंच भांडण सुरू झालं ना ? मग त्याच्यात माझा सहभाग-कॉन्ट्रिब्यूशन असेल की नाही ? एखाद्या लग्न - कार्यासाठी, सणासमारंभासाठी आपण एकमेक पन्नास रुपये, शंभर रुपये अशी कॉन्ट्रिब्यूशन काढतोच की नाही ? तेव्हाच तो अहेर तयार होतो. तो मोठा दिसतो. कदाचित प्रत्यक्ष देणाराही एकटाच असेल पण तो काही एकट्याचा अहेर आहे का ? इतरांचे वाटे आहेत ना त्याच्यात !

भक्त तसा विचार करतो की, परिस्थिती माझ्यापुरती असली आणि त्याला इतर जबाबदार आहेत,असं वाटत असलं तरी, माझी यात कॉन्ट्रिब्यूशन आहेच. तर मी आता थांबेन. या परिस्थितीचा तो कसा वापर करील ? तर माझी कर्मं चुकली म्हणून हा वाद, भांडण, त्याचा त्रास माझ्या वाट्याला आला आहे. हे तो समजून घेईल.परिस्थिती प्रतिकूल आहे,याबद्दल दुमत नाही.पण त्याचा त्याला त्रास वाटणार नाही. समजा घरामध्ये विसंवाद आहे तर, परिस्थिती प्रतिकूल आहे यात शंकाच नाही. म्हणजे परिस्थिती प्रतिकूल की,अनुकूल हा प्रश्नच नाही. पण ती आत कशी घेणार हा प्रश्न आहे !

त्यावेळेला माझी कर्म चुकली. भांडणात निघतं की नाही, तुम्ही त्यावेळेला तसं बोलला होता. म्हणजे त्यातूनच पुढं सगळं सुरू झालं.

भक्ताच्या दृष्टीनं परिस्थिती असली तरी तो विचार करतो की, माझ्या कर्मांच्या परिणामांमुळं हे निघालेलं आहे किंवा त्यांच्या कर्मांच्या परिणामांमुळं निघालेलं आहे. तर ते आहे तसं राहणारच. तर आता प्रश्न एवढाच आहे की, ज्यावेळेला जे मी बोललो, जे काय शब्द वापरले, जे काय चुकलं - तर ते आतापासून पुढं तरी मला टाळता येईल. ज्यामुळं ही परिस्थिती वाट्याला आली त्या कर्मांचे परिणाम, तक्रार न करता सहन करणं आणि तशी कर्मं आजपासून पुढं टाळणं, ही भक्ताच्या दृष्टीनं 'साधना' आहे. मग अशी साधनेची संधी प्रतिकूल आहे की, साधनेला अनुकूल आहे ? आपणच ठरवा.

समजा घरातली सगळी माणसं तुमच्या मनासारखी वागतात. अगदी सकाळी कॉटवरून उठले की, हातात पाण्याचं भांडं घेऊन उभे आहेत. तुम्ही केव्हा उठता आणि तुम्हाला केव्हा पाणी देतो असं त्यांना होतं आणि ते तुम्हाला कुर्निसात करतात अशी कल्पना करू ! आता असं काही घडणार नाही, पण स्वप्न रंगवायला काय हरकत आहे ? तर अशा अनुकूल परिस्थितीत भगवंताची, श्री महाराजांची आठवण उठल्याबरोबर तुम्हाला होईल का ? खरं पाहिलं तर, इतकं सरळ आहे. उठल्याबरोबर आत कडकड ऐकू येते, दिवसाचं चित्र दिसायला लागतं आणि त्यामुळं लगेच स्मरण होतं, 'महाराज'!

आता काय ते सांगा. कुठली परिस्थिती अनुकूल, कुठली प्रतिकूल? मुळात दोन्ही सारख्याच. पण आपल्यापुरतं खरं सांगायचं तर, आपल्याला प्रतिकूलच बरी आहे. आम्ही अनुकूलतेमध्ये स्मरण ठेवणारे 'नाथ' नव्हेत. फार तर प्रतिकूतेमध्ये स्मरण ठेवणारे 'तुकोबांचे' पाईक आहोत, 'तुकोबा' नव्हेत हां ! त्यांच्या दिंडीत आहोत, असं लक्षात ठेवावं. 'बरे झाले देवा बाईल कर्कशा, बरी हे दुर्दशा जनामध्ये !' यांतले. म्हणजे मग परिस्थितीकडं बघण्याचा दृष्टिकोन बदलतो.

परिस्थिती प्रतिकूल आहे कारण ती माझ्या कर्मांचा परिणाम आहे.

दुसऱ्या कोणी काही केलं आणि ते माझ्या वाट्याला आलं, असं होत नाही. दुसऱ्याच्या पेपरचे मार्क तुमच्या वाट्याला कसे येतील ? आजकाल बोर्डात होतो तसा घोटाळा असं म्हणतात, पण ते एक्सेप्शनल-अपवादात्मक असतं. तसं ते मान्य करून दुरुस्तपण करतात. पण मूळ बरोबर करतात ना ? आता मूळ काय आहे तर, ज्याच्या त्याच्या पेपरचे मार्क्स्. तसं माझ्या घरामध्ये माझ्या पेपरचे मार्क देणारी मंडळी मला मार्क देत आहेत. पण ते मान्य करायची आपली तयारी नसते, ही आपली अडचण आहे. भक्त मान्य करतो की, कर्मांचे परिणाम मी मान्य केले, म्हणूनच ती माणसं माझ्या वाट्याला आली आणि ती आता मार्क देत आहेत ते घेतलेच पाहिजेत. जे असं मार्कांच्या बाबतीत तेच प्रतिकूलता, अडचणी, मनाविरुद्ध होणं, अपयशं, आजारपणं - अशा बाबतींत स्वीकारताना, त्याला शक्य होतं. कारण भक्ताला त्या परिस्थितीतल्या प्रतिकूलतेमुळं भगवंताची वारंवार आठवण होते आणि तिचा साधनेला उपयोगच होतो.

आता अनुकूलता असली तर, भगवंताचं, श्री महाराजांचं स्मरण राहील का ? तर, एरवीच्या सामान्य माणसाचं राहाणार नाही. एकतर, त्या अनुकूलतांत तो गुंगून जाईल. त्या अधिकाधिक हव्याशा वाटत राहातील. नाहीतर, दुसऱ्या बाजूला त्या सगळ्या अनुकूलता आपल्या स्वतःच्याच कर्तृत्वानंच आल्या आहेत, असा विचार करीत स्वतःच्या कौतुकात-अहंकारात रमेल. म्हणजे त्यातही साधन होणार नाहीच.

समजा यश मिळालं, चार माणसं चांगली वागली, मान दिला, शरीरप्रकृती उत्तम राहिली - अशी अनुकूल परिस्थिती आली तर, भक्त असा विचार करील की, याला योग्य अशी कर्मं माझ्याकडून मागं झाली असली पाहिजेत. परीक्षेचं मार्कशीट हातात पडावं, तसे हे चांगले मार्क हातात पडत आहेत. ते माझ्या चांगल्या कर्मांचे परिणाम आहेत किंवा काही

कृपेचा भाग आहे. यापेक्षा त्याला महत्त्व द्यायचं काही कारण नाही. भक्ताचा मार्ग असा की, आता हे सर्व अनुकूल आहे तर, जपाला बसायला काहीच हरकत नाही. आधी प्रतिकूल होतं, त्यामुळं ते पुरं करेपर्यंत, जो त्रास आहे तो मिटेपर्यंत - जपाला बसणं शक्य नाही, असं सामान्य माणसाला वाटतं.

पण भक्ताला मात्र तेव्हा चुकलेली कर्मं सुधारावी, त्याचे परिणाम बिनतक्रार, आनंदानं सहन करावे आणि जे सहन होत नाही त्यासाठी- त्यानिमित्तानं भगवंताचं स्मरण ठेवीत राहावं, साधना करीत राहावं, असं वाटत होतं. त्यामुळं तेव्हाही साधना घडत होती.

आता तर सुदैवानं सगळं चांगलं ठेवलं आहे. सर्व अनुकूलच आहे. तेव्हा भक्त विचार करतो की, हेही माझ्या कर्मांचे परिणाम म्हणून आले, माझ्याबद्दल माणसं चांगलं बोलत आहेत, परिस्थिती अनुकूल होत आहे. जर मला ही अनुकूल परिस्थिती अशीच राहायला हवी असेल तर, माझी कर्मं अशीच चांगली ठेवली पाहिजेत. या विचारामुळं कर्मांची सुधारणा टिकून राहाते आणि दुसऱ्या बाजूनं अनुकूलता असल्यामुळं तर, मला आता साधन करायलाच पाहिजे. कारण आता काही अडचण नाही, कुणी आपला वेळ घेत नाही, अशांतता करीत नाही. सगळे आपापल्या मार्गानं छान चालले आहेत तर, आपल्या साधनेला आपण लागावं. म्हणून अशा लौकिकदृष्ट्या अनुकूल परिस्थितीतही गुंगून न जाता किंवा तिचं कौतुक करीत न बसता, तिची उपयुक्तता लक्षात घेऊन, भक्त अधिकच जोमानं साधनेला लागतो. म्हणून भक्ताला प्रतिकूल आणि अनुकूल अशी परिस्थिती नसते, ती प्रत्येक परिस्थिती फक्त भगवंताकडं जायला 'उपयुक्त' असते !

सॉक्रेटिसची गोष्ट आपल्याला माहिती आहे. त्याची बायको झांटिपी. ती शीघ्रकोपी होती. सॉक्रेटिसनं मित्राला घरी जेवायला बोलावलं. दोघं मिळून जेवायला बसले. त्यावेळेला काहीतरी झांटिपीच्या मनाविरुद्ध झालं.

तिनं अक्षरशः दोघांसमोरची ताटं हिसकावून घेतली. तिचा राग एवढा अनावर झाली की, तिनं सॉक्रेटिसच्या डोक्यावर पाणी ओतलं. सॉक्रेटिस मित्राला म्हणाला, 'मी जी अलौकिक शांतता मिळवली आहे, त्याचं प्रशिक्षण मला इथंच मिळतं, बरं का !' सामान्य माणसानं विचार केला असता की, हिला नंतर बोलता आलं नसतं का. काय करायचं ते नंतर करता आलं नसतं का. एकवेळ मी उपाशी राहिलो असतो. त्याला एकट्याला जेवू द्यायचं, जाऊ द्यायचं बाहेर.मग दार लावल्यावर हे सगळं चाललं असतं.मी भिजलो असतो!

सामान्य माणसाची प्रतिक्रिया आणि भक्ताची, महापुरुषाची प्रतिक्रिया यांच्यामध्ये काय फरक असतो, ते यातून समजून घ्यावं. कारण सॉक्रेटिस म्हणतो,'अशा वेळेलासुद्धा मी जास्तीत जास्त शांत राहून तिला योग्य आहे, ते करतो. यात शांती टिकवण्याचं प्रशिक्षण उलट मलाच घरबसल्याच मिळतं.'

म्हणून हे अगदी लक्षात घेण्यासारखं आहे. त्यात भक्ताचं सामान्य माणसापेक्षा वेगळेपणही आहे. ते असं की, परिस्थितीबद्दलच्या सुखदुःखापेक्षा त्याला परिस्थितीकडं बघण्याच्या आलेल्या दृष्टिकोनामुळं, भक्ताला दोनच पर्याय सुचतात - प्रतिकूल परिस्थिती माझ्या प्रशिक्षणासाठी,कसोटी घेण्यासाठी आहे तर,अनुकूल परिस्थिती वेगानं पुढं जाण्यासाठी आहे,असं तो समजतो.

परमेश्वराच्या इच्छेनुसार आणि कर्मांचे मूळ हेतू विसरत चाललेल्या माणसांच्या कृपेनं आता आपले सण सार्वजनिक रीतीनं सुरू होतील. देव देवळात होता, घरात होता - तो आता बाहेर चौकात येईल. त्यावेळेला मोठमोठ्या रेकॉर्ड लागतील, प्रदर्शनं येतील, देखावे उभे होतील - त्यांच्या त्या डेसिबल्सच्या पद्धतीनं सगळं चालेल आणि ते सगळं आपल्या वाट्याला येणार. हे चालू असताना आपलं जपात किती लक्ष लागतं, वाचनात किती लक्ष लागतं, श्री महाराजांचं स्मरण किती राहतं - हे सगळं बघण्याची चांगली संधी आपल्याला मिळणार, आपली परीक्षा सुरू होणार - असं

समजून या सार्वजनिक सणांना सामोरं जायला काही हरकत नाही.

आवाज कमी ठेवला तर अनुकूल आहेच. आपण पुढं जाणारच आहोत. त्यामुळं मौनजप जमेल, ध्यान जमेल. तर, त्या वाट्याला येणाऱ्या सार्वजनिक उत्सवातल्या अकारण वाटणाऱ्या आवाजांशी ॲडजस्ट करून घ्यायचं, बाकी काही करण्याची गरज नाही. साधना सुरूच राहील.

आता समजा, परिस्थिती प्रतिकूल असेल,आरडाओरडा असेल तर, वैखरी जप ठेवावा. भक्ताला परिस्थिती फक्त 'उपयुक्त' असते, एवढं लक्षात ठेवावं. गणपती आले, नवरात्र आलं, आता अकरा दिवस काही बघायला नको हो, काही साधना नाही, जप नाही, एवढा आरडाओरडा असतो - आता काही शक्य नाही, असं वाटून घेऊ नये आणि पंधरा-पंधरा दिवस बिनसाधनेचं राहू नये. आरडाओरडा आहे ना, मग वैखरी जप ठेवू. लिखित जप भरून काढू. मग पुढं नुसता मौनजप केला तरी चालेलच. अनंत चतुर्दशी, दसरा झाला की, आपण मोकळे आहोतच. अशा तऱ्हेनं परिस्थितीकडं बघता येतं, तसं आपण बघावं.

सभोवतालची माणसं आणि घटना यांच्यामुळं निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार आपण केला. आता देहाच्या परिस्थितीचा विचार बघू. सर्वसाधारणपणे सगळ्यांची तक्रार असते की, एक दिवस नामजप करायचा आहे. पण रजा काही मिळत नाही. पण विचार करा, एका दिवशी सकाळी उठून ताप भरला की, तीन दिवस मनुष्य शांतपणे घरी राहतो. घरातूनच रजेचा अर्ज जातो, तो सँक्शनसुद्धा होतो. आता अशी भगवंतानं तीन दिवस नामदिवस करायची संधी दिली तर, आनंदानं नामदिवस करावा की नाही ? एरवी आपण म्हणतो ना, आपल्याला नामदिवस करायचा असतो ना ? मग आता ताप आला, ताप आला, असं म्हणून कसं चालेल ?

अलीकडं काय वाटेल ते व्हायरस येतात. इन्फेक्शन होतात. यांत

तीन-तीन दिवस घरी बसावं लागतं. आजारामुळं साधना गायब होते. पण बरं नसलं तरी, पेपर वाचायचा राहात नाही. उलट वेळ मिळतो, संधी मिळते म्हणून जास्तच वाचला जातो. मग त्याच्यावर कॉमेंट्स् ! तीन-तीन दिवस घरात. मग सारखं घरात ज्यात त्यात लक्ष जातं. हे काय चाललंय, ते काय चाललंय असं. मग , ते बघून त्याच्यावर कॉमेंट्स् ! असं सगळं चालू राहिलं म्हणजे आपली साधना तर राहातेच पण, मग घरातल्यांचंही स्वास्थ्य बिघडतं आणि असंच राहायचं ठरवलं तर, घरातले लोक 'वेगळ्या कारणासाठी' प्रार्थना करायला लागतात की, हे लवकर बरे व्हावेत ! भक्त आणि सामान्य माणूस यांत काय फरक पडतो ते बघा म्हणजे झालं.

आपल्याला माहीतच आहे, श्री गुरुदेव म्हणायचे,'आजारपणाचा दिवस म्हणजे देवाचा दिवस - डे ऑफ सिकनेस इज द डे ऑफ गॉड.' काय सुंदर वाक्य आहे. लक्षात आलं तर, आजारपणाकडं बघायचा दृष्टिकोनच बदलून जातो. बस, आता आजारपण आलं ना, छान ! आता दोन दिवस, आठ दिवस, पंधरा दिवस - काय असेल ते, मला नाम घेण्याची उत्तम संधी मिळणार. ज्यावेळेला मी बरा आहे त्यावेळेला लवकरात लवकर ऑफिसमधून काम उरकून घरी येईन आणि त्यांचं स्मरण ठेवीन. कारण त्यांनी मला स्मरणासाठी गरज आहे म्हणून बरं ठेवलं आहे.

असं जर सगळ्या परिस्थितींबद्दल वागता आलं तर, किती चांगल्या तऱ्हेनं आपल्याला पुढं जायला उपयोग होईल आणि परिस्थितीबद्दलसुद्धा विसंवाद कमी राहतील. मग प्रत्येक परिस्थिती 'उपयुक्त' असते, असं म्हणण्यातला अभिप्राय कळून येईल. एवढं आपण या वचनाच्या निमित्तानं कृपा करून, लक्षात घेतलं, तरी खूप होईल !

।। श्रीराम ।।

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. १६/०८/२००८ च्या निरूपणावर आधारित)

चिंतनक्षण

वचन क्र. ६ * निरूपण : क्र. ७

प्रपंच मोडू नये व परमार्थ सोडू नये,
हा आपला मध्यम मार्ग आहे.

प्रपंच मोडू नये व परमार्थ सोडू नये, हा आपला मध्यम मार्ग आहे. मुळात हा प्रश्न मार्गाचा आहे. ज्याला ध्येय आहे, काहीतरी गंतव्य म्हणजे जाण्याचं ठिकाण आहे, त्याला मार्गाचा प्रश्न समजतो. ज्याला कुठं जायचं नाही, इथंच घोटाळायचं आहे, त्याला काय करायचा मार्ग ? प्रपंच करा किंवा करू नका किंवा काय त्याचा गोंधळ करायचा तो करा. अशा माणसाला पुढं काही मार्गाचा संबंध नाही. इथं मार्गाचा संबंध आहे. कारण कुठंतरी जायचं आहे.

श्री महाराज नेहमी म्हणत की, आपलं जीवनाचं ध्येय ठरत नाही, ही सर्वांत मोठी अडचण आहे. ते म्हणतात ती गोष्ट अगदी प्रत्येकाच्या आयुष्यात त्याला अनुभवाला येणारी आणि गरजेची आहे. आता महाराज हे कुठल्या अर्थानं म्हणाले असतील, ते आपण समजून घेऊ.

आपला अनुभव पाहा. आधी शिक्षण ध्येय ठरतं. मग नोकरी, लग्न - असं ध्येय ठरतं. अशी ध्येयं अखंड ठरत असतात. अगदी मृत्युशय्येवरसुद्धा, काही करून एकदाचा बरा झालो पाहिजे, इथपर्यंत ध्येय ठरत असतं. अशी ध्येयं सारखी बदलत असतात. त्यामुळं आपल्या जीवनाला निश्चित असं ध्येय नाही. ते ध्येय देणं, हे परमार्थाचं काम आहे. आपल्या जीवनाला जे आदर्श ध्येय असू शकतं, ज्याला आपण मुक्ती, मोक्ष, आनंद, शांती, शाश्वत समाधान - जे म्हणू ते ध्येय देणं, हे आवश्यक आहे. कारण ती ध्येयं

अंतिम ध्येयं आहेत. मग त्यांच्यापर्यंत जाण्याच्या मार्गाचा प्रश्न येतो.

आपण साध्या पातळीवर विचार करू की, एखाद्यानं परीक्षेत काही मार्क मिळवायचं ध्येय ठरवलं आहे. असं ध्येय ठरलेलं असलं की, आज टीव्हीची सिरियल बघायला नको. कारण महत्त्वाचा अभ्यास आहे, काही सबमिशन आहे. एरवी टीव्ही सिरियलशिवाय चालत नाही. पण आज चालतं. कारण मर्यादित का होईना, काहीतरी ध्येय आहे. म्हणून येणारे अडथळे तो बाजूला करायला तयार आहे. अभ्यासाचा मग मार्गही ठरतो. पुढच्या त्याच्या मदती आहेत - मार्गदर्शन, शाळा, कॉलेज, क्लास - त्याही ठरतात. मार्ग ठरला की, आड येणाऱ्या गोष्टी बाजूला होतात. म्हणून सर्वांत महत्त्वाचं हे की, आपल्याला मार्ग तर असेलच, पण आधी आपल्याला ध्येय आहे का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे !

ज्यांना ध्येय आहे त्यांनी प्रपंच मोडू नये आणि परमार्थ सोडू नये, हा मध्यम मार्ग आहे. इथं मध्यम शब्द वापरला तो कनिष्ठ, मध्यम, उत्तम - या भाषेतला,'उत्तम' समजावा. प्रपंच मोडू नये आणि परमार्थ सोडू नये, हे दोन्हींही करणं म्हणजे, कनिष्ठ, मध्यम अशा अर्थानं मध्यम शब्द वापरलेला नाही. तर, हे दोन्हींही करणं हा मध्यम म्हणजेच उत्तम मार्ग - असा अर्थ अभिप्रेत आहे. मध्यम मार्ग हा जीवनात अत्यंत सुसंवाद निर्माण करतो.

कल्पना करा की, एखादा टोकाच्या भूमिकेचा माणूस आहे. त्याचं स्वतःचं समाधान होतं की नाही कुणास ठाऊक पण, बाकीच्यांचं मात्र नक्कीच असमाधान होतं. तो आनंदाचा होत नाही. तो स्वतःसुद्धा शेवटी साशंक असतो की, त्याची टोकाची भूमिका कुठं घेऊन जाईल कुणास ठाऊक. हुकूमशहा टोकाच्या भूमिकेचे असतात म्हणून ते फार काळ मानवत नाहीत. आपण बघितलं असेल की, शेवटी 'राज्यान्ते नरकः'अशी त्यांची वाईट अवस्था होते. ते आपण कित्येक उदाहरणांतून शिकलेलो आहोत. कारण ते

टोकाचे मार्ग आहेत. म्हणून आपला 'मध्यम माणसाचा मार्ग' किंवा 'मार्गांतला मध्यम मार्ग' म्हणजे 'उत्तम मार्ग' हा आहे की, प्रपंच मोडू नये आणि परमार्थ सोडू नये.

असं इथं का म्हटलं आहे, त्याचा विचार करू या. प्रपंच मोडण्याचा आपल्याला अधिकार नाही, म्हणून तो मोडू नये आणि ते शक्यपण नाही. जो प्रपंच मोडतो म्हणजे तो काय करतो ? तर संन्यास घेतो. संन्यास या मार्गाबद्दल आदर राखून मी सांगतो. संन्यास घेतला म्हणजे घरातली माणसं आई-वडील, बायको, मुलं यांना सोडून दिलं आणि कुठंतरी निघून गेले. जिथं गेले तिथं परत थंडी, वारा, पाऊस, पाणी, झाडं सगळं आहे. तिथं अशी काय जागा ठेवली आहे का की, ती कशालाच बांधलेली नाही ? अशी जागाच नाही. श्री महाराज म्हणायचे की, प्रपंच हा पाचांचा आहे. म्हणजे ज्यामध्ये दुसऱ्यांची गरज लागते, तो प्रपंच ! प्रपंचाची व्याख्या अशी स्पष्ट आहे. जर, दुसऱ्याची गरज लागते, तर ती गरज कशी मोडता येईल ?

आई-वडील, बायको, मुलं, घरदार हे सगळं सोडलं तरी, जिथं जाल तिथं प्रपंच पाचांचा आहे. वारा सोडता येत नाही, अंगातली पोकळी सोडता येत नाही, आकाश सोडता येत नाही. तर, यांतलं काय विसर्जन करणार ? पृथ्वितत्त्व विसर्जन करता येईल ? नाही जमणार. शरीरातला अग्नी सोडूया का ? तर ते जमणं शक्य नाही. पोकळी काढून घेऊ या ? शक्य होत नाही. जोपर्यंत बाहेरच्या सगळ्या वातावरणाशी आपल्या पोकळीचं संतुलन-बॅलन्सिंग आहे तोपर्यंत सगळं ठीक आहे. पोकळी वाढलेली चालत नाही की, कमी झालेली चालत नाही. ती असावीच लागते. शरीरातलं पाणी काढून टाकू म्हटलं तर, ते चालत नाही. म्हणजे काय कमी करणार ? या पाचांचा जो प्रपंच आहे तो तरी सुटत नाही, एवढं लक्षात आलं तरी, प्रपंच सोडण्याच्या कल्पना साधारणतः का फोल असतात, ते कळेल. बाकीचं

म्हणजे पाचांचा, म्हणजे पाच माणसांचा प्रपंच, वगैरे सगळं आपल्याला कळत असेलच. तेही सोडता येत नाही. मग मोडता काय येणार ?

प्रपंच मोडता येत नाही म्हणून मुळात तो मोडूच नये, हा आपला उत्तम मार्ग आहे. कारण त्यानंच काहीतरी घडण्याची शक्यता आहे. मनुष्य प्रपंचात आहे तर, त्याला खूप संधी प्राप्त होतात. मुलाबाळांच्या रूपानं वात्सल्याची संधी आहे. आईवडिलांच्या रूपानं सेवेची संधी आहे. प्रपंच गृहस्थाचा केला तर, अन्नदानाची संधी आहे. घर बांधलेलं आहे, त्यामुळं कोणातरी पांथस्थाला निवारा देण्याची संधी आहे. यादृष्टीनं प्रपंचाकडं बघितलं तर, प्रपंचात या सगळ्या संधी आहेत. फक्त माझी स्वतःची सोय, हे मात्र चालणार नाही. प्रपंच इतरांच्या सोयीसाठीच लावलेला आहे. तुम्ही स्वतःपुरत्या प्रपंचातच बसलात तर घर तरी कुठलं बांधणार ? प्रपंचातल्या इतर कुणाला तरी तुम्हालाच झोपडी बांधून द्यावी लागेल किंवा त्याला झाडाखाली राहावं लागेल. भगवंताला मग ते झाड ठेवावं लागेल. जर प्रपंच नाही सोडला व सावध राहिला तर, काहीतरी चांगल्या अर्थानं घडण्याची शक्यता आहे. आता तो जर बेसावध राहिला तर, उपयोग होणार नाही, हे आपण बघतोच. आपल्याला जो प्रपंच सोडू नये, असं म्हटलेलं आहे, ते असं काहीतरी विधायक घडवण्यासाठी आहे, एवढं लक्षात घ्यावं !

इथं प्रपंच मोडायचा नाही, ही गोष्ट खरी आहे आणि परमार्थही सोडायचा नाही, असं तर करायचं आहे. त्यात अडचण अशी आहे की, हे प्रपंचाचं सगळं मांडायला लागलं की, त्यातला परमार्थ जातोच. यांनाच एवढी जागा लागते की, भगवंताला घरात जागाच राहात नाही. मग तो कुठंतरी कट्ट्याखाली किंवा फळीवर ठेवलेला असतो. यांनाच जागा कमी असेल, फिरायला अडचणीचं असेल तर, पूर्वीच्या काळी कोनाड्यात किंवा आजच्या काळात लॉफ्टवर ठेवला तरी, देव आनंदानं राहील. तो म्हणतो,

मला ठेवलं, हेच खूप झालं ! या सगळ्यांत परमार्थ सोडला नाही, हाच आपल्यावर उपकार आहे ! दुर्दैवानं एखाद्यानं लॉफ्टवर, जिथं नजर जाणार नाही तिथं, फळी मारून देव ठेवला आणि खालून नमस्कार केला, स्मरण ठेवलं तरी, देवाला चालेल.

पण आपण परमार्थ सोडू नये. कारण देव सध्या वर आहे, कधीतरी आपल्याला गरज लागेल तेव्हा तरी, तो खाली काढावा लागेलच की नाही ? आता तो खाली किती आणणार ते आपण ठरवावं. देव जवळ यावा, जाता-येता दिसावा, त्याचं दर्शन व्हावं - असं काहीतरी करता येईल. पण तो सोडू नये, एवढा मात्र दंडक आहे. तो सोडला तर, माझं ध्येय गेलं. भगवंत, समाधान हे माझं ध्येय आहे. तो माझ्या परमार्थाचा मार्ग आहे. ती वाटचाल करायची ती वर बघितल्याप्रमाणं प्रपंचातूनच करायची आहे.

उद्या हे सगळं सोडायचं म्हटलं तर, पायाशिवाय चालतो म्हटल्यासाररखं होईल.पाय,वाट असल्याशिवाय कसा तो गावाला जाईल? वाट तर पाहिजेच. त्या अर्थानं प्रपंच पाहिजे, म्हणजे हे सगळं व्यवस्थित होईल आणि हे करताना परमार्थ सोडायचा नाही, हे मात्र लक्षात ठेवून असावं. वाटेचंच प्रेम लागलं व तिथंच रमलं तर, मग ध्येय तिथंच राहील. वाटेवर जाणारा मनुष्य हा पुढं पाहात असतो. पुढं वळण आहे का, पुढं काही अडचण आहे का, आपण किती आलो, अजून किती जायचं आहे याचं त्याला भान असतं आणि तो खरा यात्रिक असतो.

प्रपंचात असंख्य माणसं 'रमलेली' असतात. प्रपंचात स्थायिक होऊ नये, यात्रिक व्हावं ! कारण त्यात यात्रेचं भान ठेवता येतं आणि देहाचंही भान ठेवता येतं. मनुष्य यशात रमतो यात विशेष नाही. समजा राग-लोभ आहे, एखादी अडचण आहे, अपयश आहे तर किती रमायचं त्याच्यासाठी? तर, अपयशात रमणारी माणसं आहेत. रमतात म्हणजे त्यांना त्यात

राहिल्यावर बरं वाटतं. खूप वेळ त्याची चर्चा होते, कितीतरी काळ जातो, मन त्यातच अडकतं, येणारे जाणारे चौकशी करतात, इतरांशी चर्चा होते. फार काळ दुःख, निराशा, अपयश - या विचारांत मनुष्य राहिला तर, तो डिप्रेशनमध्ये-नैराश्यात जातो, वेगवेगळ्या प्रकारचे आजार उद्‌भवतात. त्या माणसाच्या लक्षात येत नाही की, तो यात्रेत आहे. यात्रा म्हटल्यावर वाटेत काहीतरी अडचण येणारच की ! काहीतरी लागणारच की ! कधीतरी झाड लागेल, पाणी लागेल, काटा लागेल, असं काहीतरी होणारच असतं. काटा लागला तर, मनुष्य मुक्काम का करतो ? काटा लागल्यावर तो काढून टाकला आणि पुढं जाऊ लागला - तो माणूस यात्रिक आहे. कारण त्याला जायचं आहे, काहीतरी ध्येय आहे.

आपल्या संगीतात स्वरांचं सुसंवादीपण आहे. दोन अचल स्वर आहेत आणि ते एकमेकांशी सुसंवादी असतात. षड्‌ज आणि पंचम हे सुसंवादी असतात. षड्‌ज अशासाठी सुसंवादी आहे की, तो पंचमाचा मध्यम असतो. षड्‌ज हा आधार, तरी तो सुसंवादी अशासाठी होतो की, त्याच्या मध्यमाच्या पट्टीत तो पंचम बनतो. म्हणून आपल्या वाटयाला आलेल्या प्रपंचाच्या पट्टीतून पुढं जर जाता आलं तर, षड्‌जाच्या मध्यमाच्या सुसंवादी अशा आणि वरच्या, परमार्थाच्या सप्तकात जाता येतं. ज्यांना संगीताची कल्पना आहे, त्यांच्या हे लक्षात येईलच. आपणही या अर्थानं विचार करून बघायला हरकत नाही. त्यादृष्टीनं प्रपंच मोडू नये आणि परमार्थ सोडू नये.

प्रपंच मोडू नये आणि परमार्थ सोडू नये - अशा दोन नकारात्मक गोष्टी एकत्र आल्या आहेत म्हणजे काही करू नये, असा यात सांगण्याचा भाव आहे का ? म्हणजे नेमकं काय करावं, अशी शंका येण्याचा संभव आहे. कारण काहीकाही वेळेला माणसांना काही करण्याची आवड नसली म्हणजे तेवढंच निमित्त पुरतं !

तसं होऊ नये म्हणून, सकारात्मक अर्थ असा आहे की, प्रपंच मोडू नये, म्हणजे प्रपंच मांडावा आणि वर सांगितल्याप्रमाणं तो मांडला तरी, त्यात रमू नये. आता परमार्थ सोडू नये म्हणजे, परमार्थ जोडावा, भगवंत जोडावा, आपलं ध्येय जोडावं. ते जोडलं असेल तर, हे सगळं मांडण्याला अर्थ आहे. नसेल तर, ती नुसती मांडामांड आहे. शेवटी एक दिवस मांडामांड राहाणार आणि काय होणार, ते आपल्याला माहिती आहे. तसं होऊ नये आणि मरणाआधी मुक्त झालो तर, ते आपलं ध्येय आहे.

त्यासाठी प्रपंच मांडावा आणि परमार्थ जोडावा, यांची गरज आहे आणि हा आपला साधासुधा नाही तर उत्तम मार्ग आहे व तो अवश्य चालावा. शेवटी ही तडजोड असल्यामुळं दोन्हींवर भर देऊन सांगावं लागतं. श्रीमहाराज नेहमी म्हणायचे, तडजोडीशिवाय जीवन आकाराला येत नाही. आपण देह घेऊन आलो म्हणजे शेवटी तडजोड केलीच ना ?

कुणी शंका काढतील की, मी एकटाच होतो, सूक्ष्म रूपात किंवा कुठल्या स्वरूपात होतो त्याला व्हेरिफिकेशन-पुरावा काय आहे ? हा विचार आपण क्षणभर सोडून देऊ आणि जरा उदाहरणानं अर्थ पाहू म्हणजे आपल्याला असल्या पुराव्यांची गरज लागणार नाही. विचार करा की, आपण जन्माला तर एकटे आलो आहोत, मग पुढं आपण एकटं राहावं की नाही ! चांगली नोकरी लागली, सगळं व्यवस्थित चाललं आहे, आनंदानं एकट्यानं जीवन घालवावं, पण तसं होत नाही. काय करमत नाही, भीती वाटते, एकाकी वाटतं - असं काहीतरी होतं. काय होतं, हे प्रत्येकाला आपलं आपल्याला माहीत असतं. शेवटी तडजोड होतेच ना ? त्याच्याशिवाय माणसाला पुढं जाता येत नाही, प्रवास होत नाही. त्यामुळं दोन्ही गोष्टींवर भर देऊन सांगावं लागतं.

लहानपणी कोकणात विहिरीतून पाणी काढायला आम्हाला शिकवलं.

व्यवस्थित पाणी काढेल की, नाही असं वाटून बादलीला दोर बांधून रहाटावरून ती सोडायला द्यायचे. त्यात धोका नसायचा. बादली सोडून दिली तर, पाण्यावर राहील किंवा भरली तर, दोर जिथपर्यंत आहे तिथपर्यंत पाण्यात खाली जाईल. नंतर ताकद असेल तर, दोर ओढून बादली वर काढेल. पहिल्यांदा भोकं पडलेली बादली प्रॅक्टीस व्हावी म्हणून द्यायचे. आम्ही जोर लावून रहाटावरून बादली वर ओढायचो आणि हेलकावे बसत ती बादली वर यायची तर, निम्मच पाणी राहायचं, निम्मं गळून जायचं !

मी विचार करायचो की, यातलं निम्मं पाणी जातं. आमच्यातली मोठी माणसं - ज्यांनी पाणी काढायला मला शिकवलं, ते म्हणायचे, पण निम्मं पाणी वर येतं ना ? ज्यांनी विहिरीतून पाणी काढलं असेल त्यांना याची माहिती असेलच. पुढं मग घागर द्यायचे. घागर दोराला बांधून पाणी काढणाऱ्यांना कल्पना असेलच की, दोराचा फास घागरीला व्यवस्थित बांधावा लागतो. नाहीतर, पाणी राहिलं बाजूलाच, घागरच पाण्यात जायची. म्हणजे प्रपंचाची मांड पक्की आली की, मग घागरीचं काम आहे. त्याच्याआधी मात्र सगळं बादल्यांचं काम आहे. ही दोन्हींही माणसाला करायला लागतात. त्याशिवाय पर्याय नाही. घागरीनं पाणी काढणं, हे कौशल्याचं काम आहे.

म्हणून घर बांधणं, अमकं तमकं करणं, समाजकार्य करणं असं मनुष्य करतो. त्यासाठी आधी त्याची स्वतःवरची पकड पक्की पाहिजे. ज्यावेळी रहाटावरची पकड पक्की येते त्यावेळी तो मग पायरहाटावर बसतो. ज्यांनी पायरहाटावर पाणी शेंदलं असेल त्यांना पायरहाटाचं वजन किती असतं याची कल्पना असेल. एकावेळेला सगळे पोहरे खालीवर जात येत असतात. वर येणाऱ्या पोहऱ्यांचं वजन इतकं असतं की, जर पायरहाटावर मांड पक्की नसेल तर,मनुष्य उलटा विहिरीत जाण्याचा धोका असतो. म्हणून स्वतःवरची मांड पक्की झाली की, मग प्रपंचाचं काम परमार्थामध्ये नेता येतं.

या अर्थानं दोन्हींवर भर देऊन सांगावं लागतं. बादली गळकी असू द्या. पण बादली पाहिजे, पाणी वर येतंच ना ? तसंच प्रपंच फाटका आहे. कुणीतरी राजारंक हे ठरलेलंच आहे. घागर जरी सोडली तरी ती पण हिंदकळून तिरकी होऊन थोडं पाणी जातंच तिच्यातलं, पण उरलेलं वर येतं ना ? तर ते जे पाणी वर येतं, त्याच्यासाठी हे सगळं आहे.

सुखाला-आनंदाला सगळेच तहानलेले आहेत - कुणी पाणी जास्त वर काढतो,कुणी कमी. म्हणून संपन्न-विपन्न वगैरे होतं प्रपंचात. ते ठीक आहे. पण कष्ट करून पाणी काढणारा कितीही काढो, स्वतःची तहान भागली की, प्रपंच. आता या प्रपंचानं ताजेतवाने झालात, पुढं काय करणार ? कुणा अशक्ताला, बादली-घागर नसलेल्याला चार घागरी शेंदून देणार का ? की, आता तहान भागली, आता भूक. भूक भागली, आता मनोरंजन-यात्रा-सहली ? काय करणार पाहा. तहानलेले असूनसुद्धा दुसऱ्यांची तहान भागवणारे मोठे ! तहान भागली तिथंच सामान्यांना परमार्थ सुरू करता येईल.आपण निदान एवढा तरी परमार्थ करावा. नाहीतर, नुसतं स्वतःपुरतं पाणी काढण्याला काय अर्थ उरला आणि बादली - घागर बाळगण्याला तरी, काय अर्थ ?

सगळा प्रपंच आपण मांडतो तो परमार्थ साधावा म्हणूनच मांडतो. परमार्थाचं पाणी वरती निघावं, त्यातून आपल्याबरोबर असंख्यांचं कल्याण व्हावं, म्हणूनच प्रपंचाच्या बादल्या आणि घागरी सांभाळाव्या लागतात. प्रपंच मोडू नये आणि परमार्थ सोडू नये, हा आपला उत्तम मार्ग आहे. मध्यम शब्द कोणत्या अर्थानं वापरला, ते आपण लक्षात घ्यावं आणि आपली उत्तम मार्गाची वाटचाल करावी, हे बरं !

।। श्रीराम ।।

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. २३/०८/२००८ च्या निरूपणावर आधारित)

चिंतनक्षण

वचन क्र. ७ * निरूपण : क्र. ८

कर्तृत्वाने हरला आणि ते माणसाला कळले
म्हणजे भगवंताची कृपाच झाली म्हणायचे.

कर्तृत्वानं हरला आणि ते माणसाला कळलं, म्हणजे भगवंताची कृपाच झाली म्हणायचं. आता 'कृपाच झाली म्हणायचं' असं म्हणण्यामध्ये भाव मात्र सरळ आहे, बरं का !

आपल्याला आता राजकारण आणि त्यातली पावलं ओळखतात. समजा, साडेतीनशे रुपयांचा गॅसचा सिलिंडर सव्वातीनशे रुपयांना मिळायला लागला तर, स्वस्तच झाला म्हणायचा. पूर्वी तीनशे रुपये किंमत होती, ती नंतर एकदम साडेतीनशे झाली. आता त्यावर बराच विरोध झाला. म्हणून ती सव्वातीनशे झाली. तसे खरे पंचवीस रुपये वाढलेच. पण सव्वातीनशे म्हणजे स्वस्तच झाली म्हणायची. पूर्वीची दोन रुपये पावशेर भाजी वाढत वाढत चार रुपये, पाच रुपये, सहा रुपये अशी झाली आणि आता चार रुपये पावशेर म्हणजे स्वस्तच झाली म्हणायची.

चार-पाच घरांचे अनुभव बघितल्यानंतर, यांचा स्वभाव किंवा हिचा स्वभाव त्यामानानं खूपच चांगला आहे, असं म्हणायचं. एखादा मनुष्य शहाणाच म्हणायचा. हे सगळं 'म्हणायचा' भाग आहे हे लक्षात यावं, म्हणून ही उदाहरणं आपल्यासमोर ठेवली. असं 'म्हणायचं' यात काहीतरी भाव आहे.

कृपा झाली म्हणायची म्हणजे, ही खरी कृपा नव्हे. पण म्हणायला हरकत नाही. कारण कुठल्यातरी अपेक्षेनं - कुठल्यातरी दृष्टीनं ते खरं आहे.

कृपा झाली असं म्हणायचं म्हणजे, साध्या भाषेत 'नव्हे पण होय' असा अर्थ घ्यावा. वरच्या उदाहरणामधलं स्वस्त नव्हे, पण स्वस्तच होय, म्हणजे 'नव्हे ते होय' म्हटल्यासारखा प्रकार आहे. शब्द दिसतात छोटे छोटे पण ते दोन्ही एकत्र करून एका वाक्यात बसवण्याचा प्रयत्न केला आहे.

भगवंताची कृपा म्हणजे काय, ते आपण प्रथम बघू. कृपेची आपली एक कल्पना आहे. सर्वसाधारणपणे खटल्याचा निकाला लागला, लग्न जमत नव्हतं ते जमलं, स्थळ चांगलं मिळायला हवं तर ते मिळालं, किंवा खूप दिवस जमिनीचं अडकलेलं काम मार्गी लागलं, अशा सगळ्या बाबतींत आपण म्हणतो की, श्रीमहाराजांची कृपा झाली आणि ते काम मार्गी लागलं. खूप दिवस काम होत नव्हतं. गोंदवल्याला जाऊन श्रीमहाराजांचं दर्शन घेऊन आलेत आणि दुसऱ्या दिवशी ऑर्डर हातात पडली, कृपाच झाली.

श्रीमहाराज या ऑर्डरी काढण्यासाठी बसलेत की, कोर्टातले कागद खालीवर करण्यासाठी बसले आहेत ? आपली कृपेची कल्पना, तिची सध्याची व्याप्ती काय आहे, ते आपण लक्षात घ्यावं. साधारणपणे आपले व्यवहारातले, प्रपंचातले अडथळे दूर होणं, काही अडकलेल्या गोष्टी मार्गी लागणं, चांगल्या गोष्टी होणं, वाईट गोष्टी न होणं, अपघातातून वाचलो - आमच्यावर गाडी धडकायची तर, ती त्यांच्यावर धडकली, आम्ही वाचलो म्हणजे श्रीमहाराजांची कृपाच झाली म्हणायची. म्हणजे, आपल्या ज्या कृपेच्या कल्पना आहेत, त्यात माझ्याऐवजी दुसऱ्यावर गाडी धडकावी, असं आहे का ?

क्षणभर व्यवहारानं विचार केला तरी, लक्षात येतं की, काहीतरी गडबड आहे. गाडी आमच्यावर धडकणार ती त्यांच्यावर धडकली तर, ते नाही का हॉस्पिटलमध्ये गेले ? तारतम्यानं पाहिलं तर लक्षात येतं की, ही कृपेची कल्पना चुकीची आहे. आपण जे जे सर्वसाधारणपणे कृपा म्हणून म्हणतो ते वरच्या उदाहरणांवरून बघितलं तर,आपल्याला कृपेची नीट कल्पना

नसते, हे लक्षात येईल.

वास्तविक, मनुष्याच्या उद्धाराचं पाऊल पुढं पडलं म्हणजे भगवंताची कृपा झाली म्हणायची. आता ती काही निगेटिव्ह-नकारात्मक बाजूनं म्हणजे अपघातातून वाचून किंवा दुसऱ्यावर गाडी जाऊन किंवा यांची कामं मार्गी लागून, लग्न जमत नव्हतं ते जमलं म्हणून, खटला मार्गी लागला म्हणून अशासाठी का भगवंताची कृपा आहे ? याच्यानं काय होणार आहे ? आज जी प्रतिकूलता होती, ती अनुकूलता झाली. समजा, जागेचं काम मार्गी लागलं. कोर्टात सगळी केस मिटून याच्या हातात जमीन पडली म्हणजे भगवंताची मोठी कृपाच झाली, असं वाटतं. आता या जागेवर तो माणूस मंदिर का बांधणार आहे ? असं काही नाही. तो स्वतःच्या राहाण्याची सोय करणार. आत्तापर्यंत थोड्या गैरसोयी होत्या त्या जाऊन दूर करणार, सगळं स्वतःला सुखी करण्यासाठी करणार. एक जी गोष्ट अडचणीची, प्रतिकूल होती - ती दूर झाल्याबरोबर त्याला तो माणूस कृपा म्हणतो आहे.

वास्तविक, कृपा तुमच्यावर तुम्ही अडचणीच्या जागी असतानाही होती आणि ज्या सुखाच्या जागेत तुम्ही जाणार किंवा जे काय पैसे हातात पडले किंवा अगदी आजारातून बरे झालात समजा असं गृहीत धरू, तरी त्यामुळं ती कृपा असं म्हणता येईल का ? यात उद्धाराचा प्रश्न जर सुटत असेल तर, त्याला कृपा म्हणता येईल.

एखाद्याचा आजार हा त्याच्या उद्धाराचा अडथळा असेल आणि तो त्यांना दूर करणं आवश्यक असेल आणि तसा तो जर दूर केला असेल तर त्या आजारातून बरं होण्यानं कृपा झाली म्हणायची. एरवी फक्त व्यवहार सोयीचा झाला. यापेक्षा कृपेचा खरा अर्थ तो नव्हे. कृपेचा खरा अर्थ काय याचा आपण विचार करत आहोत. उद्धाराच्या दृष्टीनं एखादं पाऊल पुढं पडणं किंवा मनुष्याचा जीवनात काही असीम शांती उत्पन्न झाली तर, कृपा

म्हणता येईल.

कुठंतरी, शेजारचा माणूस मनाविरुद्ध असतो, त्रास देणारा असतो, तो जागा सोडून गेला तर, बरं होईल, असं वाटतं. बरं झालं त्यांना एकदाची दुसरी चांगली जागा मिळाली, पण ते इथून जाऊ देत, असं वाटत असतं. आणि ते त्यांचं भलं व्हावं म्हणून का वाटत असतं ? आपले प्रश्न किंवा हेतू हे आपल्या स्वार्थाचे आणि स्वतःच्या गोष्टींचे आहेत. हे जर ध्यानात आलं तर कृपा कशाला म्हणायचं याच्याकडं आपलं थोडं अधिक व्यवस्थित लक्ष जाऊ शकेल आणि योग्य गोष्टीला आपण कृपा म्हणू शकू. समजा शेजाऱ्याचा त्रास होता, कटकट होती. व्यवहारामध्ये असं असू शकतं. आपलासुद्धा तसा त्रास कुणाला असू शकतो, हे पण लक्षात ठेवावं !

तर, हे सगळं लक्षात घेऊन आपल्याला पुढं जायचं आहे. शेजाऱ्याच्या रेडिओचा, टीव्हीचा आवाज येत होता, त्याच्यामुळं माझं स्वतःचं जपात लक्ष लागत नव्हतं, ते आता लागायला लागलं. एकाग्रतेनं जपाला बसता येतं. पूर्वी एक तास जप होत होता तो आता तीन तास व्हायला लगला. आता बिचाऱ्यांना चांगली जागा मिळाली, चांगली गोष्ट आहे. अशासाठी जर काही चांगलं झालं असेल, तर ते थोडंसं कृपेत मोडायला हरकत नाही. वास्तविक, अशा अडचणी असूच नयेत. तरीपण शेजारची अडचण कमी झाल्यामुळं उद्धाराचं पाऊल, शांतीचं पाऊल, आनंदाचं पाऊल पुढं पडलं असेल तर, त्याला भगवंताची कृपा म्हणायला हरकत नाही. आपल्यासमोर हे ठेवलेलं आहे आणि आपला अनुभव आणि व्यासंग यांच्याप्रमाणं याचा बरोबर अर्थ घ्यायला हरकत नाही.

पण इथं मात्र कर्तृत्वानं हरला आणि ते माणसाला कळलं, म्हणजे भगवंताची कृपाच झाली म्हणायचं, असं म्हटलेलं आहे. तर त्याच्यात कृपाच झाली, असं का म्हणावं लागलं ? कर्तृत्वानं हरला आणि माणसाला ते

कळलं - या दोन गोष्टी झाल्या म्हणजे भगवंताची कृपाच झाली म्हणायचं. म्हणायचं म्हणजे कृपा झाली - होय पण नाही, नाही पण होय - अशांपैकी आहे. कारण ती खरी कृपा म्हणता येईलच, असं नाही.

मनुष्य कर्तृत्वानं हरला, एक साधी गोष्ट घेऊ. कर्तृत्वानं हरायला बाहेर कुठं जावं लागत नाही. घरातसुद्धा कर्तृत्वानं भरपूर हरता येतं. सर्वसामान्य व्यवहारातलं हरणं म्हणजे काय आणि कृपा होणं म्हणजे काय, यांची सांगड कशी घालायची याचा विचार हे वचन वाचताना मनात आला. आम्हाला सगळीकडं जिंकायचं असतं आणि त्यासाठी आम्ही भगवंताकडं जातो आणि इथं तर हरण्याला कृपा झाली, असं म्हटलेलं आहे. हे विरुद्ध आहे, असं कुणी म्हटलं तर ते बरोबर आहे, तसं वाटणं स्वाभाविक आहे.

आपल्या जिंकण्याच्या कल्पना या तशा अत्यंत प्राथमिक स्वरूपाच्या आणि व्यवहारातल्या आहेत. प्रपंचात कमतरता असतात, काही गैरसोयी असतात. त्या सोयीच्या होत नाहीत तोपर्यंत जिंकल्यासारखं वाटत नाही. त्यामुळं ते सोयीचं झालं की, जिंकलं आणि जिंकलं की, कृपा झाली, असं वाटत असतं. अशी आपली जिंकण्याची कल्पना आहे. म्हणून इथं हरण्याचा उल्लेख असून कृपा झाली म्हणायची, असं म्हटलं आहे. आणि तसं का म्हटलं आहे ? तर कर्तृत्वानं हरण्यानं कदाचित भगवंताच्या कृपेचा मार्ग सोपा होईल. खरं सांगायचं तर, भगवंताची कृपा व्हायला वाटेत माझं कर्तृत्व आड येतं. वास्तविक, इतकं कर्तृत्व वाटण्याएवढं आपण काही नेपोलियन बोनापार्ट किंवा सिकंदर म्हणून घरामध्ये जन्माला आलो आणि आता काय जिंकू असं त्या माणसाचं झालं, अशी काही परिस्थिती नाही !

एखाद्या देवस्थानी, सार्वजनिक ठिकाणी आपण गेलो आणि पाय धुण्यासाठी साधा नळ सोडला, तर काही वेळेला तो बंद होत नाही. नळात

बिघाड असतो, आपल्यात नसतो. आपल्याला इकडं तिकडं बघावं लागतं की, तो नळ कुणी बंद करील काय. तसाच नळ सोडून गेलो तर कुणी काही म्हणेल काय, असं वाटतं की नाही ?

साधा नळ हरवतो आपल्याला. तसंच सामान्य गोष्ट आहे की, वीज आपल्याला हरवते. आपण एखादा कार्यक्रम व्यवस्थित आखून ठरवतो. सात वाजून दोन मिनिटांनी त्यानं ते, सात पाचला त्यानं ते करायचं, असं सगळं ठरलेलं असतं. सात वाजताच वीज बंद, ती हुर्यो करून टाकते एकदम. हरवायला काय हो, सगळं जग बसलं आहे हरवायला ! कोण हरवत नाही ? सगळं वेळेत आवरायचं ठरवलं, पाणी वेळेवर येईल याची खात्री नाही. अवेळी येईल याचीसुद्धा खात्री नाही ! पाणी वेळेवर येईल याची खात्री नाही, हे एकवेळ मान्य होईल. पण अवेळी रात्री अकरा वाजता येईल याची पण खात्री नाही. आपल्याला तिथंसुद्धा हरवतात. संध्याकाळी नाही आलं पाणी, आता रात्री अकराला ते येईल. तोपर्यंत टीव्ही बघत जागं रहायचं आणि अकराला पाणी भरायचं. तर नेमकं रात्री साडेआठला टीव्हीवरची आवडती सिरीयल सुरू व्हायच्या आत पाणी हजर. एकदा जग हरवायला लागलं, तर बघत राहाण्यासारखं हरवतं.

दोन-तीन वर्षं अगदी कष्ट करून कुठलीही कसूर न ठेवता घर बांधलं तर, गळणारा स्लॅब आपल्याला हरवतो. अगदी उत्तमांतलं उत्तम सिमेंट, न गळणारे पाईप असं जाहिरातीत बघून सगळं तसं वापरलं आणि उत्तम पेंट दिला. पण शेवटी पाऊस झाला आणि लावलेला रंग ओघळायला लागला किंवा थेंब गळायला लागले, अभिषेक सुरू झाला की, देवाची आठवण होते की नाही ? एखादा गळणारा स्लॅबसुद्धा माणसाला हरवतो. हे सगळं लक्षात आलं की, तिथं तरी निदान आपल्या कर्तृत्वाची मर्यादा ओळखावी.

अगदी आपल्या माहेरची मंडळी आलेली आहेत. स्वयंपाकाचा उत्तम बेत केलेला असला, तरीसुद्धा गॅसचा सिलिंडर हरवू शकतो वेळेला. इतक्या गडबडीची वेळ असते अन् त्यात सिलिंडर संपतो. पण मनुष्य त्याकडं तसं बघत नाही. तो म्हणतो तसं व्हायचंच ना, कधी तरी तो संपत आला आणि त्यामुळं यावेळी तो गेला. तुम्हाला कळतं असं तुम्ही समजता ना, तुम्हाला का नाही कळलं त्यावेळेला ? तो सिलेंडर संपणार हे तुम्हाला का कळलं नाही ? तुम्ही घेतलेली काळजी गेली कुठं ? उलट त्याच्यावरती प्रश्न विचारल्यावर लक्षात येतं की, अशा अनेक गोष्टींचा संबंध मी हरण्याशी आहे.

श्रीमहाराज नाही का एकदा म्हणाले, जे बैलांना कळलं ते गणपतरावांना कळलं नाही. त्यावेळी गोंदवल्यापासून कोरेगावपर्यंत बैलगाडीनं यावं लागायचं. श्री महाराजांनी गणपतरावांना निघू नका, म्हणून सांगितलं होतं. पण कोर्टाची तारीख आहे, मला जायलाच पाहिजे म्हणून श्री महाराजांची आज्ञा मोडून बाहेर पडले. रात्री गाडीत गणपतरावांना झोप लागली. घाटात बैलं बुजली आणि माघारी फिरली. सकाळी उठून आता कोरेगाव स्टेशन आलं असेल म्हणून उठले तर, कुठलं कोरेगाव स्टेशन ? गणपतराव टक्कन जागे झाले आणि बघतात तर बैलगाडी गोंदवल्यात. मंदिराजवळ. आणि श्री महाराज मंदिराजवळ उभे आहेत आणि बैलगाडी मंदिरासमोर. वर म्हणतात, अहो, काय हे बैलांनी केलं ? अशी बैलांची गोष्ट. नंतर प्रत्यक्षात ती तारीख पुढं गेली आणि कोर्टातलं कामही तिथं अडलं नाही. ही वस्तुस्थिती आहे.

काय होतं, मनुष्य कर्तृत्वानं हरतो, पण हरतो हे कळत नाही. म्हणून हरला आणि माणसाला ते कळलं, अशा दोन गोष्टी आहेत ! हरणं तर फार सोपं आहे, सोपं म्हणजे काय, माणसाचा नाईलाजच आहे. जिंकण्याच्या जागा फार कमी आहेत.मनुष्य त्या जपून ठेवतो. म्हणून जिंकलो असं अनेकांना

वाटतं की मी याच्यात जिंकलो, त्याच्यात जिंकलो. अहो कळ येते छातीत आणि मनुष्याला पुढचं पाऊल टाकता येत नाही. आपण हे बघितलेलं आहे.

मनुष्य बाहेर पडतो जोरानं, काहीतरी ठरवलं असतं. वाटतं की, यंव करीन, त्यंव करीन. पण कुठलं काय ते, दारात पायरी ओलांडताना पाय मुरगळतो आणि पुढचं पाऊल टाकता येत नाही. अहो सगळीकडं हरायचीच परिस्थिती आहे आणि त्यातून जर आपण हरणार नसूच, तर सगळ्यांत शेवटी निसर्ग हरवतोच माणसाला, हे ठरलेलं आहे. देहाचं राज्य आपल्याला निसर्गानं जिंकून दिलेलं आहे, हे भान जर आपण नाही ठेवलं तर, ते तुमचं राज्य निसर्ग हिसकावून घेतो बरोबर. म्हणून विवेकानंदांनी म्हटलं की, निसर्ग मूठ उघडायला लावील, एवढं लक्षात ठेवा आणि खरोखरच तशी परिस्थिती आहे.प्रपंचातलं कर्तृत्व असू देत,बाहेरचं असू देत, लौकिक, सत्ता, संपत्ती असं कुठलंही कर्तृत्व असू देत, तिथं कुठंतरी मनुष्याला निसर्ग दाखवून देतो की, ते तुझ्या हातात नाही. माणसाच्या आयुष्यात असे प्रसंग येतातच. प्रसंग येतात पण माणसाला ते कळत नाहीत. त्यामुळं शहाणं होता येत नाही, ही अडचण आहे. वचनाचा अर्थ नीट लक्षात घेतला तर, ते नक्की समजेल.

प्रसंग येतात पण कळत नाहीत, जाणवत नाहीत, होय की नाही ? मनुष्य प्रचंड तयारी करतो आणि म्हणतो की, मला एवढे मार्क मिळतील. पण परीक्षा हुकवते माणसाला, तरीसुद्धा त्याच्या लक्षात येत नाही की, हे कसं झालं ? किंवा परीक्षा काही वेळेला जिंकून देते आणि त्यावेळेलाही मनुष्याला कळत नाही की, अरे हे कसं झालं ? दोन्हीं बाजूंनी बघायचं की, माझ्या कर्तृत्वाचं हे बरोबर माप आहे का ? हे मापाच्या पुढं तरी आहे किंवा मागं तरी आहे. माझं कर्तृत्व जास्त होतं पण अपेक्षेपेक्षा कमी मार्क मिळाले आणि कर्तृत्व कमी असूनही मार्क मात्र जास्त पडले. याचाच अर्थ कर्तृत्वानं आपण हरतो. एखाद्याचे मार्कांचे अंदाज बरोबर येत असतील, तर तो दुसरीकडं

हरेल. तर, हे लक्षात ठेवायला काय हरकत आहे ? कर्तृत्व करू नये असं नाही. हे निगेटिव्ह-नकारात्मक सांगण्यासाठी नसून, आपल्या प्रगतीसाठी हे वाक्य सांगितलं आहे.

कर्तृत्व, ज्ञातृत्व आणि भोक्तृत्व हे तीन धरून माणसाचा अहंकार राहतो. यापलीकडं माणसाकडं अहंकार राहायला जागा नाही. या तीन गोष्टी धरून माणसाचं व्यक्तित्व किंवा अहंकार राहतो.

भोक्तृत्व म्हणजे उपभोग घेण्याची शक्ती होय. आपल्यात घडलेली घटना आहे. फिरून येऊन दमलेला माणूस त्याला पाणी हवं होतं. ते आणून त्यांच्यासमोर टेबलवर ठेवलं. पण ते गृहस्थ पाणी पिऊ शकले नाहीत. ते कोचावर खाली बसले आणि कोचावरच त्यांनी मान टेकली.

आपण दुसरं उदाहरण बघू. आपल्या आयुष्यात असा दिवस आला की नाही, ते आठवून बघा. आपण स्वयंपाक केलेला आहे आणि सगळे जेवणार आहोत. पण जेवणापूर्वी फोन येतो, चर्चा होते. काहीतरी अपघात झाला, कुणीतरी गेलं, झालं आणि जेवण थांबलं. ती माणसं त्या दिवशी काही जेवू शकली नाहीत. ही माणसाची भोक्तृत्वाची परिस्थिती आहे.

आपण एखादा ग्रंथ वाचायला घेतला तर, वाचताना काही समजत नाही माणसाला. ज्ञातृत्वानं हरतो माणूस. ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायात सुरुवातीच्या ओव्यांत ते, 'मी भूतांत आणि भूते माझ्यात' असं येतं की नाही, नक्की याचा काय अर्थ आहे ? माझ्यापासून झालं म्हणतात की, नाही म्हणतात, असं कळेनासं होतं. श्री ज्ञानेश्वर महाराजांसारखी कालदर्शी, सत्याचा अनुभव घेतलेली माणसं चुकीचं कसं सांगतील ? ते म्हणतात, ते बरोबरच आहे, ते सत्यच सांगतात. पण माझी सत्य समजून घेण्याची बुद्धीची मर्यादा शेवटी कमी पडते. माझ्या बुद्धीला होय आणि नाही असं एकत्र सहन होत नाही. तिला एकतर होय किंवा नाही, एवढंच सहन करण्याची क्षमता आहे.

म्हणून ज्ञातृत्वानं पण मनुष्य लटका आहे.

एका बाजूनं कर्तृत्वानं, दुसऱ्या बाजूनं ज्ञातृत्वानं आणि तिसऱ्या बाजूनं भोक्तृत्वानं मनुष्य राहतो आणि त्याच जोरावर त्याचा अहंकार राहतो. वर जे अनुभव बघितलेत त्यातला कुठला अनुभव आपल्याला आला नाही, असं वाटलं तर आपणच आपल्या अनुभवांची चौकशी करून बघायला हरकत नाही. आपल्यापरीनं दहा वीस वर्षांचं मागचं आयुष्य बघितलं तर लक्षात येईल की, कर्तृत्वानं काय, ज्ञातृत्वानं काय, भोक्तृत्वानं काय मी अमूक करीन, तमूक करीन, अमूक एका पद्धतीनं अमूक एक गोष्ट करीन-तर तशी ती करता येईलच याची खात्री नाही. करीन हे ठरवा पण 'करीन हे मी, करीन ते मी, संसारातून सुख मिळवीन मी' हे सगळं जे आहे ना, ते त्याच्यासाठीच त्या पदात म्हटलं आहे.

कर्तृत्व, भोक्तृत्व आणि ज्ञातृत्व यांमुळं मनुष्याचा अहंकार टिकतो. वास्तविक, या तीनही गोष्टी मर्यादित आहेत, याची कल्पना यावी. ती येणं येणं फार महत्त्वाचं आहे. म्हणूनच या वचनात म्हटलं ना की, ते माणसाला 'कळलं', म्हणजे भगवंताची कृपा झाली म्हणायची. खरं सांगायचं तर, मनुष्य कर्तृत्वानं हरलेला आहे आणि ते त्याला कळावं या दोन गोष्टी एकत्र आल्या तर काय होईल ? इथं हरणं म्हणजे काय आहे ? हरणं म्हणजे जे नेहमीचं कमीपणाचं समजतात ते हरणं आहे का ? सर्वसाधारणपणे आपल्या दृष्टीनं हरणं म्हणजे असमर्थता, कमीपण, अपमान असं वाटत असतं. पण इथं हरणं म्हणजे आपल्या शक्तीचं यथार्थ आकलन होणं ! माझी पंचवीस पावलं चालण्याची शक्ती आहे पण पन्नास पावलं चालण्याची माझ्यात शक्ती नाही. शक्तीचं यथार्थ आकलन होणं म्हणजे हरणं, या अर्थानं, हरणं हा शब्द इथं आहे. तेवढं लक्षात ठेवलं तर, मग हा मार्ग किंवा म्हणणं आपल्याला स्पष्ट होईल.

आता हे हरणं माणसाला कळलं तर याच्यात भगवंताची काय कृपा होईल ? तर भगवंताची कृपा व्हायला किंवा उद्धाराचं पाऊल पुढं पडायला किंवा शांती, आनंद लाभायला योग्य कृती व्हायला लागतील. आपल्या क्षमतांचं यथार्थ आकलन झालं की, योग्य कृती आपल्याकडून घडतात आणि शांती, आनंद जवळ येतात. माझी पन्नास पावलं चालण्याची क्षमता आहे, असं क्षमतेचं यथार्थ आकलन आहे. पण मला सत्तर पावलं चालण्याची गरज आहे आणि वरची वीस पावलं मी चालू शकत नाही. याचं आकलन झालं तर, त्या अर्थानं मी कर्तृत्वाने हरलो. मग वरचं वीस पावलं चालण्याचं काम आहे. त्यासाठी शरणागती पत्करावी लागते. ती येते आणि ती आली तर माणसाचा समाधानाचा, शांतीचा पुढचा मार्ग मोकळा होतो.

आपण दारात उभे राहिलो तर, आपल्या घरात प्रकाश येण्याची शक्यता नाही. आपण बाजूला झाल्यावर जसा प्रकाश आत येईल, तसं कर्तृत्वानं हरलो म्हणजे तिथून बाजूला झालो, जे करायचं तिथपर्यंत केलं आणि याच्यापुढं माझ्या हातात नाही, हे लक्षात ठेवलं किंवा त्याप्रमाणं वागलं म्हणजे शरणागती आणि त्यामुळं भगवंत आत यायला मोकळीक होते. भगवंताची कृपा किंवा खऱ्या अर्थानं पुढं प्रगतीच्या दृष्टीनं क्षमतेचा वापर आणि शरणागती - या दोन गोष्टी एकत्र झाल्या, म्हणजे खऱ्या अर्थानं परमार्थात पुढं पाऊल पडेल, आनंदाचं पाऊल पडेल, शांतीचं पाऊल पडेल. ते पाऊल पडत नाही.

आपण अस्वस्थ राहतो याचं कारणच असं आहे की, आपण कर्तृत्वानं अनेकवेळा हरून, ते कळण्याची संधी येऊनसुद्धा, ते कळून घेत नाही. कळलंच तर, त्याचं आकलन टिकवता येत नाही. त्याचं आकलन टिकवता येत नाही म्हणून परमार्थातल्या, समाधानातल्या, आनंदातल्या आपल्या जीवनातल्या सगळ्या अडचणी पुढं येतात.

माणसाचं सारं जीवन घरगुती संबंध, सामाजिक संबंध असं सर्वत्र संबंधांचं आहे. तर मनुष्याला या संबंधामध्ये सुखासमाधानानं रहायला काय अडचण आहे ? कर्तृत्वानं हरणं हे एक सूत्र इथं दिलं आहे, बाकी ज्ञातृत्वानं आणि भोक्तृत्वानं हरणं, ते तर आहेच. पण कर्तृत्वानं हरण्याचे अनेक प्रसंग येऊनही मनुष्याला ते कळत नाहीत. ते जर त्या गणपतरावांना कळलं तर पुढच्या वेळेला श्री महाराजांनी सांगितलेलं ते ऐकतील आणि ते ऐकलं तर त्यांच्याच सुखाचा, समाधानाचा, प्रपंचाचा मार्ग मोकळा होईल. ते व्हावं यासाठी या वचनाचा आपल्याला उपयोग होऊ शकतो.

आता ही जरी तत्त्वं म्हणून वाटली तरी, त्यांची ॲप्लिकेशन्स-व्यावहारिक उपयोग आहेत. व्यावहारिकदृष्ट्या प्रपंचामध्ये मनुष्य रिॲलिस्टीक व्ह्यू-वस्तुस्थितीला धरून राहू शकतो. मनुष्य कर्तृत्वानं हरला आणि ते त्याला कळलं तर स्वतःच्या कर्तृत्वाविषयी त्याच्या अवास्तव कल्पना राहणार नाहीत. आणि ते जर कळत नसेल तर, मग काय दहा वेळेला तो हरला तरी तो अकराव्या वेळी म्हणेल की, मी जिंकेन. त्याला जर कळलं की, मी दहा वेळा हरलो, तिथंपर्यंतच माझी क्षमता होती. अकराव्या वेळेला तो म्हणेल की, पुढंच काम भगवंतानं केलं तर होईल. म्हणजे व्यवहाराच्या दृष्टीनंसुद्धा तो रिॲलिस्टीक-वस्तुनिष्ठ राहातो.

मनुष्याला आपण म्हणतो ना की, तो ओव्हर कॉन्फिडन्ट होता.अतिआत्मविश्वास बाळगत होता, म्हणूनच परीक्षेत नापास झाला. प्रपंचाच्या परीक्षेतही माणसं ओव्हर कॉन्फिडन्ट असतात, म्हणूनच नापास होतात ना ? मुलगा असं करीलच, मुलगी असं करीलच, अमका तसा वागेलच, मित्र असं करीलच - अशा सगळ्या कल्पना असतात. पण त्या सगळ्या चुकीच्या आहेत. अनुभव येऊनसुद्धा मनुष्य त्या लक्षात ठेवत नाही. म्हणूनच श्रीमहाराज नेहमी म्हणायचे, प्रपंचाच्या अनुभवातून जो शहाणा

होत नाही तो कशानंच शहाणा होणार नाही. ही वस्तुस्थिती आहे.

थोडक्यात, एवढे कर्तृत्वानं हरण्याचे अनुभव येऊन ते मनुष्याला कळले, त्यानं ते लक्षात ठेवले तर प्रापंचिकदृष्ट्या तो रिॲलिस्टीक व्ह्यूनं-वस्तुनिष्ठतेनं राहू शकेल. कॉन्फिडन्ट जरून राहू देत पण ओव्हर कॉन्फिडन्ट व्हायची गरज नाही. माणसाला आत्मविश्वासाची गरज आहे पण हे जे अवाजवी आत्मविश्वास आहेत ते राहणार नाहीत. त्यामुळं परमार्थातल्या या वचनाला, परमार्थाबरोबरच, प्रपंचाचं एक सूत्र म्हणूनसुद्धा ॲप्लिकेशन आहे-व्यावहारिक उपयोग आहे.

कर्तृत्वाचं योग्य आकलन आलं तर, पारमार्थिकदृष्ट्या योग्य, पुरेसे प्रयत्न होतील आणि पुढं शरणागती येईल, शरणागतीच भगवंताचं दार उघडते. आपण काय वाटेल ते करा, शरणागतीशिवाय दार नाही उघडणार ! पारमार्थिक प्रगतीसाठी या वचनाचा अधिक जास्त उपयोग होईल. तिथं तर प्रयत्नांचं योग्य आकलन व्हायला पाहिजे. या पुढचे प्रयत्न माझ्या हातात नाहीत, ते आपण घडवून घ्यावेत - अशी भगवंताला, गुरूंना दार उघडण्याची प्रार्थना करायला पाहिजे. अशी शरणागती पाहिजे. या वचनाचे असे दोन्ही प्रापंचिक व पारमार्थिक ॲप्लिकेशन्स - उपयोग आहेत.

कर्तृत्वानं हरला आणि माणसाला ते कळलं, म्हणजे भगवंताची कृपाच झाली म्हणायची. आता ती त्याचीच कृपा झाली असं म्हणावं लागतं आहे. वास्तविक, आपणच करायच्या या गोष्टी आहेत. या वचनाकडं यादृष्टीनं पाहिलं तर, हे कुणी करायचं ? हे काय भगवंतानं करायचं ? तुम्हाला हरवायला का भगवंत बसला आहे ? जसं श्रीमहाराज आपल्याला पास करायला किंवा ऑर्डरी काढायला बसले नाहीत, तसं भगवंत हरवण्यासाठी बसलेलाच नाही. विश्वव्यवस्था चालू आहे, आपल्याला सगळीकडं हरण्याची संधी येते ती घ्यावी, हरावं आणि ते मस्तपैकी कळावं.

मग लक्षात ठेवावं की, अरे आपल्याला याच्यात गुरूंची साथ पाहिजे. इतकं सोपं आहे खरं म्हणजे ! मग आता ही कृपा झाली म्हणजे काय, कृपा झालीच म्हणायची ! म्हणजे खरंतर, आपल्यावर कृपा करण्याची योग्य वेळ आली आणि आता ती आपल्याला कळेल, असं म्हणायचं आहे. हे खरं आपलं आपल्याला कळावं आणि त्याचा वापर करून घ्यावा. त्याला प्रापंचिक आणि पारमार्थिक ॲप्लिकेशन्स आहेत.

हे लक्षात घेऊन, त्या त्या ठिकाणी त्यांचा योग्य उपयोग करावा आणि या आगळ्या कृपेचा अनुभव घ्यावा. प्रपंच आणि परमार्थ दोन्हीदृष्ट्या आपल्याला ते हिताचंच होईल !

।। श्रीराम ।।

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. ०६/०९/२००८ च्या निरूपणावर आधारित)

चिंतनक्षण

वचन क्र. ८ * निरूपण : क्र. ९

साधना म्हणजे, अनेक अडथळ्यांची,
सात्त्विक शर्यतच आहे.

साधना म्हणजे अनेक अडथळ्यांची सात्त्विक शर्यतच आहे. या स्पर्धेच्या युगात शर्यत माहीत नाही, असं म्हणणं म्हणजे धाडसच ठरेल. आपल्याला कुठंही घरात, बाहेर, व्यवसाय, नोकरी -काय कुठं असेल तिथं- शर्यतीची साधारण कल्पना आहे. शर्यत हा मुळात अरबी शब्द आहे. चुरस, स्पर्धा, पैज, चढाओढ - हे शब्द त्याच्यावरून आलेले आहेत. आपल्या साधनेचा आणि त्याचा संबंध कुठं आला ?

तर, साधना ही अनेक अडथळ्यांची सात्त्विक शर्यत आहे. शर्यतींचे बरेच प्रकार असले पाहिजेत. आपण 'निकोप स्पर्धा' असा शब्द वापरतो. साधनेत सात्त्विक शर्यत अभिप्रेत आहे आणि तीसुद्धा कशा स्वरूपाची आहे तर, अनेक अडथळ्यांची आहे. नुसतं रनिंग-पळणं नाही तर वाटेत बांबू, काठ्या, खड्डे, चिखल - असे अडथळे असतात. तशी शर्यत आहे. नुसतं पळायचं आणि आपलं ध्येय गाठून मोकळं व्हायचं, असं साधनेचं स्वरूप नाही, हे सांगण्यासाठी हे वचन आहे. त्यामुळं अर्थातच आपल्या वाट्याला असं काही आलं तर, काही दुःख होण्याचं कारण नाही. कारण मुळातच ही सात्त्विक शर्यत आहेच आहे.

एका गृहस्थांचा अनुभव असा की, जपाला संख्या दिली. समजा, रोज दहा हजार दिली, तर अलीकडं संख्या झाल्यापासून त्यांना वाटायला लागलं की, एकदा सकाळी तो जप पुरा झाला की, परत उद्या सकाळीच

जपाला बसायचं. संख्या पूर्ण झाली की, देवाचा, नामाचा मध्ये काही संबंधच राहिला नाही, असं वाटतं. रोजच्या संख्येचं माप घातलं त्याच्यातच ते इनहेरेन्ट-अंगभूत आहे. एकदा संख्येची मर्यादा घातली की, पूर्ण करण्याचे जसे फायदे आहेत, तसे पूर्ण झाल्यामुळं आता नामाचा संबंध उरला नाही, असे तोटेपण आहेत. आपल्या 'जपसंकल्प - स्वरूप व पद्धती' या पुस्तकात संख्येच्या फायद्या-तोट्यांमध्ये तसा उल्लेख आहे. तर, असे सात्त्विक अडथळे ठरले आहेत. वास्तविक, माउलींनी - मनुष्य सुखाच्या पाऊलवाटेनं साधनेचा राजमार्ग चालला आहे - असं वर्णन केलं आहे. पण आपला खरोखर अनुभव असा आहे की, साधना ही अडथळ्यांची शर्यत असून, त्यात एखाद-दुसरा अडथळा नव्हे, तर त्यात अनेक अडथळे आहेत.

घरांतली साधारण प्रतिक्रिया कशी असते, इथंपासून सुरुवात करू या. समजा, अशी कल्पना करू की, मनुष्य एखाद्या दिवशी उठून शांतपणे देवासमोर बसला तर, अडथळ्यांना तिथूनच सुरुवात होते. आज काय बिघडलं आहे का ? किंवा काय कुणाचा निरोप आला, फोन आला आहे का? असं बिघडण्यासारखं काही झालं का ? इकडचे असतील तर तिकडच्या घरचा आला आहे का ? तिकडचे असतील तर इकडच्या घरचा आला आहे का ? अशी शंका घेऊन अडथळ्यांना सुरुवात होते.

वास्तविक, मनुष्य आपण होऊन शांतपणे बसला आहे तर, त्यांचा त्रास किती कमी आहे खरं म्हणजे ! पण अडथळा निर्माण होतो. तो शांत का बसला आहे, असं वाटतं. शांत बसले असतील तर नाम घेत असतील. आता हे काय नवीन काढलं आहे ? नाम घेऊन काय होणार ? इतके लोक नाम घेतात, कुठं काय झालं आहे ? त्या घेणाऱ्या लोकांमध्ये कुठं काय फरक पडला ? नुसती हातात माळ धरली तरी माणसाला विचारणारे भेटतात, आता माळ का ! हे आता काय करतात कुणास ठाऊक ? वास्तविक, माळ

घेऊन तो त्यांना मारतो का, काय करतो आहे ? तो माळ घेतो, देवाचं नाव घेतो, शांतपणे त्याचं काम चाललं आहे. तर इथं अडथळा यायचं काय कारण आहे ? पण लोकांच्या प्रतिक्रियांपासून अडथळा सुरू होतो ना ? असे इथंपासून सगळे अडथळे आहेत आणि पुढं तर, अक्षरशः अडथळ्यांची शर्यत आहे. आणि पुढं जर आणखीन काही उपक्रम वगैरे असला तर, मग काय प्रश्नच नाही.

ऐन दिवाळीत शिबीर काढलं का ? दिवाळी सोडून नंतर कधी घेता आलं नसतं का ? तेवढेच कुठं चार-पाच दिवस असतात. 'तेवढे कुठं चार-पाच दिवस असतात' म्हणूनच शिबीरही ठरतं ना ? पण नातेवाईकांचं ऐकावं लागतं ना - शिबिराचं खूळ काढतात, काहीतरी वेगळेपणा करायचं म्हणून करतात. हातात माळ घेऊन बसलं तर, वेगळेपणा दाखवायचा म्हणून करतात, असं त्यांना वाटतं. शांतपणे बसलं तरी,उगाच वेगळं काही करायचं म्हणून करतात. अशा सर्व घरातल्यांच्या, नातेवाईकांच्या कॉमेंट्स् आपल्याला ऐकायला लागतात आणि त्यात आपला जप चालू ठेवावा लागतो. आपली साधना चालू ठेवावी लागते.त्यामुळं ही अडथळ्यांचीच शर्यत आहे.

आपण साधनेच्या मार्गाला लागतो म्हणजे खरंतर समाधानाच्या, परमेश्वराच्या मार्गाला लागतो. ही तशी चांगली आणि कौतुक करण्याची गोष्ट आहे, असं कुणाला वाटलं तर, त्यात काही चूक नाही. पण असं समजायचं कारण नाही की, यामुळं आपलं अगदी लोक स्वागत करतील, पायघड्या घालतील आणि परमेश्वर हातात हात धरून थेट घेऊन जातो आहे - अशा काही अपेक्षा करण्यात अर्थ नाही. कारण, हा परमेश्वर आतच आहे म्हटल्यावर, आतला मार्ग कठीणच असणार. बाहेरचे मार्ग सोपे नाहीत तर, आतला मार्ग कसा सोपा असेल ? बाहेर भगवंत आहे असं म्हटलं, कुठं विश्वामध्ये आहे तर तो दिसतच नाही. वाटच अवघड आहे. त्यामुळं ती

अडथळ्यांची शर्यत बनते.

शर्यतीमध्ये आपल्याला जसं एखादं उद्दिष्ट असतं की, सर्व अडथळे पार करून ती लाईन क्रॉस करायची आहे. तसं या शर्यतीमध्ये एक ध्येय आहे.तेवढं विसरून काही चालत नाही.भगवंत,आनंद हे आपलं साध्य आहे. प्रपंचात आपल्याला काय कमी अडथळे आहेत का ? अचानक दिवाळीत शिबीर निघालं,बरोबर आहे.पण दिवाळीत दुसऱ्या गोष्टी निघत नाहीत का? त्यासाठी मनुष्य बाजूला जात नाही का ? कुण्या नातेवाईकाला बरं नसेल तर, दिवाळी बाजूला ठेवून हॉस्पिटलमध्ये आठ दिवस बसत नाही का ? अशा तऱ्हेच्या कितीतरी गोष्टी होत असतात. ठरवलेल्या गोष्टी तशा होतातच असंही नाही किंवा ज्या आपण ठरवीत नाही त्यांना सामोरं जावं लागतं.

खरं म्हणजे इतक्या तऱ्हेचे प्रकार आहेत. पण साधनेच्या बाबतीत मात्र हे लगेच निघतं आणि आपल्याला लोकांच्या प्रतिक्रियांचा त्रास होतो. काहीजण अडथळे निर्माण पण करतात. त्याचवेळेला असं काही काम काढतील की, त्यांना जाताच येऊ नये. आपण हे सगळं लक्षात घ्यावं.

साधना म्हणजे काय, हा प्रश्न आहेच की. साधना म्हणजे नुसतं जप करणं, नुसतं ध्यान करणं असंही नाही. भगवंत हे मूळ ध्येय आहे आणि ते गाठण्यासाठी केलेले सुनियोजित, सुबद्ध प्रयत्न आहेत. कोणतं योग्य, कोणतं अयोग्य, कुठलं आपल्याला सुकर आहे, कुठलं सुकर नाही - असा त्याच्यात काहीतरी विचार केलेला आहे. तर अशा तऱ्हेचे प्रयत्न म्हणजे आपल्या दृष्टीनं साधना आहे. मग त्याचं ध्येय भगवंत या स्वरूपात -आत्मस्वरूपही असेल, आनंद असेल, समाधान असेल - आपण त्याला नाव द्याल ते योग्यच आहे. कारण शेवटी त्या सगळ्यांचा अर्थ एकच आहे. यादृष्टीनं साधनेला ध्येय आहे.

आपण अशी कल्पना करू की, अडथळे आले आणि ते पार करता

आले नाहीत. तरीसुद्धा आपल्याला जाताना मार्गामधला एक अडथळा जरी पार करता आला तरी, तो तेवढा तरी नक्की कमी झाला आहे, असं समजावं.

अगदी कुणी आपल्याला त्रास देणार नाही अशी वेळ आहे, तशा वेळेला आपण नामाला बसलो तर, ती वेळ सत्कारणी लागली. म्हणजे आपण एक अडथळा दूर केला. नाहीतरी त्या वेळेत झोपून राहिलो असतो, टीव्ही तरी बघितला असता, कुठं तरी फिरून आलो असतो. अशी दुसऱ्या कारणाला ती वेळ लावणारच होतो. पण ती रिकामी वेळ नामाला देऊन तेवढंच भगवंताकडचं एक तासानं, जपानं जे काही घडत असेल तेवढं तरी अंतर काही पावलांनी कमी झालं. आपल्याला या शर्यतीत एवढी खात्री आणि आश्वासन आहे.

आपण ही सात्त्विक शर्यत म्हटली तशा इतरही शर्यती असल्या पाहिजेत. तर राजस आणि तामस शर्यतीसुद्धा असतात. आज बाहेर तामस शर्यतींचं प्रमाण खूप आहे. राजस शर्यतींचं असणं स्वाभाविकच आहे. कारण ऐंशी टक्के लोक राजसच आहेत. त्यामुळं ते काहीतरी अखंड धडपड करत असतात. राजस शर्यती या प्रापंचिक आहेत. त्यांच्याकडं गाडी आली, म्हणून माझ्याकडं आली पाहिजे. त्यानं जसं घर बांधलं, तसं घर मला बांधायचं आहे, किंबहुना त्याच्यापेक्षा जास्त चांगलं बांधायचं आहे. तर ही शर्यत झाली ना ? त्याच्यासारखंच बांधलं तर माझं काय राहिलं ? म्हणून काहीतरी करून का होईना, आडवीतिडवी भिंत बांधून का होईना, पण निदान त्याच्यापेक्षा काहीतरी वेगळं करावं. अशा या तऱ्हेच्या राजस स्वरूपाच्या शर्यती आहेत.

तामस शर्यतींचं बोलूच नये, अशी परिस्थिती आहे. राजस शर्यतीत निदान मनुष्य एवढं तरी म्हणतो की, त्यांच्याकडं काय वस्तू, घर, सामानसुमान, गाडी, बंगला काय असेल ते त्या पद्धतीचं माझ्याकडं असू देत. तामस म्हणतो, माझ्याकडं नसलं तरी चालेल, त्यांच्याकडं नसू दे,

त्यांच्याकडं का आलं,ते कसं घालवता येईल,त्याचा नाश कसा करता येईल - असं तामस शर्यतीत आहे. हा वृत्तीमधला फरक आहे. त्यामुळं शर्यतीतसुद्धा सात्त्विक शब्द वापरण्याचं कारण असं की, राजस शर्यतीमध्येसुद्धा शर्यत सात्त्विक केव्हा राहाते आणि ती केव्हा राजस होते, हे समजून घेऊ या.

राजस शर्यतीचा आध्यात्मिक बाजूनं विचार करू या. एखाद्या ठिकाणी प्रसाद केला तर, तसाच प्रसाद माझ्याकडं होऊ दे, असं वाटतं. म्हणजे प्रसादांत, पदार्थांत शर्यत असू शकते. व्यवस्थेतपण शर्यत असू शकते. त्यांच्याकडं जसा झाला तसा नामदिवस माझ्याकडं होऊ दे, असंही वाटतं. वास्तविक, आपलं खरं काम नामाला बसण्यात आणि त्याच्या आनंदात आहे. पण भगवंताकडं जायचं काम सोडून इकडं तिकडं लक्ष गेलं आणि इतरांशी तुलना करून माझं साधन ठरवायचं मनात आलं, म्हणजे कुठं तरी ते शर्यतीवर आलेलं आहे आणि ते राजस शर्यतीवर आलेलं आहे, सात्त्विक शर्यत नाही त्यात.

भगवंताकडं जायला अधिक चांगला मार्ग हुडकण्याचा मी प्रयत्न केला नाही. त्यानं काय केलं, त्याच्यात आणखी वेगळं करता येईल का, असा माझा प्रयत्न चालला आहे. त्यामुळं ते तुलनेतलं आहे म्हणून ते राजस शर्यतीतलं आहे. तामसामध्ये दुसऱ्याकडं नामदिवस झाला तर, उत्तम उपासना निर्विघ्नपणे झाली, कुणाला कुणा सत्पुरुषाचा सहवास मिळाला की, त्याला अस्वस्थता येते. तामस शर्यत अस्वस्थता दाखवते. आपल्याला तशा स्वरूपाची तामस शर्यत नको आहे. निदान साधनेमध्ये राजस किंवा तामस शर्यती असू नयेत. एवढं जरी लक्षात ठेवलं तर, योग्य होईल. सात्त्विक शर्यत आहे, आपण तिचा विचार पुढं करूच. म्हणजे आपल्या दृष्टीनं शर्यतीवर आपली नजर राहील.

शर्यत तर आहेच, कारण मी एका ठिकाणी आहे, दुसऱ्या ठिकाणी

मला जायचं म्हटल्यावर मला पळणं, चालणं भाग आहे. त्या दिशेनं प्रवास करणं भाग आहे आणि त्या प्रवासामध्ये अडथळे ठेवलेले आहेत. हे काय नवीन खूळ - अशा प्रतिक्रियांपासून सर्व अडथळे आहेत आणि त्यातून मला जायचं आहे, हे गृहीत धरलं आहे. त्यासाठी माझी एवढी जबाबदारी असेल की, शर्यत सात्त्विकच राहील. राजस किंवा तामस शर्यतीमध्ये मी जाऊ नये, एवढं मला करता येईल.

आता ही शर्यत सर्वसाधारणपणे स्पर्धा दाखवते. म्हणजे त्याच्यामध्ये दुसरा कोणीतरी सामील असला पाहिजे. वास्तविक, माझा आणि देवाचा संबंध असताना दुसऱ्याच्या शर्यतीचा संबंध कसा काय आला ? सुरुवातीला ज्या कॉमेंटस्-प्रतिक्रिया सांगितल्या, त्या क्षणभर सोडून देऊ. पण आपल्यामध्येच दोन गोष्टी वास करत असतात. ती त्यांच्यातली शर्यत आहे. सत्संगाला एक जा म्हणते तर दुसरी जाऊ नको म्हणते. ज्या दिवशी 'जा' चा जोर होतो, त्या दिवशी मनुष्य सत्संगाला हजर होतो आणि ज्या दिवशी 'जाऊ नको' म्हणणाऱ्याचा जोर होतो, गेलंच पाहिजे का, असं म्हणणाऱ्याचा जोर होतो, त्या दिवशी मनुष्य सत्संगाला हजर नसतो.

आपल्यामध्ये हे जे दोन आहेत, त्यांच्यात काहीतरी फरक आहे. त्यांची शर्यत चालू असते आणि तिच्याकडं लक्ष ठेवून आपल्याला ती बघावी लागते. ज्याला दोन मनं किंवा दोन विचार असं साध्या भाषेत म्हणता येईल. त्यावेळेला आपल्या लक्षात येईल की, या दोन मनांनी निर्माण केलेली ही शर्यत आहे. एक मन साधनेच्या बाजूचं आहे. तर दुसरं साधनेच्या विरुद्ध आहे. एक मन म्हणतं, सत्संगाला जाऊन काय होणार आहे ? तर दुसरं मन म्हणतं 'सतसंगत जग सार साधो' या मार्गानं गेल्याशिवाय पर्याय नाही, त्याला जावं लागेल आणि हे ज्याला माहिती आहे तो म्हणतो ठीक आहे - ग्रंथ वाचलाच पाहिजे, मला पारायण करायला पाहिजे.कारण त्याच

मार्गानं मला या भवव्यथेतून बाहेर येता येईल आणि पुढं जाता येईल. शर्यत करण्यात अर्थ नाही, तो प्रवास आहे आणि तो करता येईल.

आता लक्षात आलंच की, या शर्यतीत खूप माणसं सामील आहेत. प्रतिक्रिया देणारी माणसं आहेतच. हा अडथळा एवढ्यावर संपत नाही. तो फक्त बाहेरचा नाही. त्याचबरोबर काही वेळेला माणसाची आपल्या स्वतःच्या भूतकाळाशीसुद्धा शर्यत होते. भूतकाळ हा अनेकांच्या सात्त्विक प्रवासामध्ये अडथळा आहे. माझा अ.ब.क. - विशिष्ट भूतकाळ, त्याचा अडथळा आता कशाला पाहिजे ? मी भगवंताकडं निघालो आहे आणि तो तर मला वर्तमानावर जगवून पुढं न्यायला तयार आहे. मग भूतकाळाचा अडथळा मला कशाला पाहिजे ? माझे आज भगवंताकडं जायचे प्रयत्न चालले आहेत. पण त्या प्रयत्नांमध्ये भूतकाळ अडथळा असू शकतो. मागं चुकीचं जे घडलं, ते सगळं मला मान्य आहे. चुकून शब्द वापरला, चुकून गोंधळ झाला, चुकून कृती घडली - हे सगळं खरं आहे. पण त्यातलं आता काही बदलता येण्यासारखं नाही आणि आज माझ्या परमेश्वराच्या प्रवासात ते कशासाठी पाहिजे ? पण सात्त्विक शर्यतीत आपल्याच दुसऱ्या मनानं निर्माण केलेला हा भूतकाळाचा अडथळा आहे. ते मन म्हणतं, तू असा-तसा होतास तर तू भगवंताकडं कसा जाऊ शकशील, तू यात पडू नको आणि भगवंत तर म्हणतो, तू माझ्यासाठी प्रयत्न करतो आहेस, धडपडतो आहेस तर त्याच्यामध्ये तुझ्या भूतकाळाचा अडथळा कशाला पाहिजे ? पण हा भूतकाळाचा अडथळा आपल्या सात्त्विक शर्यतीतमध्ये कुठंतरी येतो.

या सात्त्विक शर्यतीत अनेक अडथळे आहेत. त्यामध्ये मनाचा अडथळा आहे, भूतकाळाचा अडथळा आहे तसा परिस्थितीचासुद्धा अडथळा आहे. आपल्या बाजूनं असणारी एक परिस्थिती असते. कदाचित इथं एकमेकांचे नातेवाईक हजर असतील, त्यामुळं त्यांच्यासमोर सांगायला

काहीच हरकत नाही. नातेवाईक हासुद्धा एक मोठा तोंड द्यावा लागणारा अडथळा आहे. काय आता हे नवीन खूळ काढलं आणि काय आता हे कशात रमले, नाम काय, जप काय, माळा काय, असं काय सगळं चाललं आहे - अशा किती प्रकारच्या अडथळ्यांना माणसाला तोंड द्यावं लागतं.

सगळेच नातेवाईक प्रतिकूल असतात असं आपल्याला म्हणायचं नाही. साधनेतले असतात ते साथ देतात किंवा तटस्थ राहातात. पण बहुतांश नातेवाईक हे पूर्ण प्रापंचिक ठेवणीचे असतात. त्यांच्या प्रतिक्रिया विरोधी असतात. त्यांना तोडणंही व्यवहारानं बरोबर नसतं. आपण काय करतो आहेत, ते पटवून देणंही शक्य नसतं. अशावेळी, एवढे नातेवाईक ओलांडून त्यांना अनुकूल करून घ्यावं लागतं व त्याच्यातून तो मनुष्य हे अडथळे पार करून येतो. म्हणजे खरोखर परमेश्वर त्याच्यावर कृपा करतोच, यात काही शंका नाही. आपण त्या सगळ्या नातेवाईकांचा आदर ठेवू या की, ते त्यांचं कर्तव्य करत असतात. तर नातेवाईक आणि अशी इतर माणसंही असू शकतात. ती आपल्या साधनेमध्ये अडथळा निर्माण करतात. अशा वेळेला आपलंच सावधानतेचं काम आहे.

मनुष्याला आपलं मन, भूतकाळ, परिस्थिती, नातेवाईक आणि इतर माणसं या अडथळ्यांची कल्पना येत जाते. जरा पुढं पुढं मनुष्य गेला की, अडथळ्यांचं स्वरूप बदलतं. भगवंताच्या मार्गामध्ये अडथळे तर आहेतच. पण पुढं येणारे अडथळे थोडे सूक्ष्म असतात. बरोबरीच्या साधकांची एकमेकांना मदत पाहिजे. दोन्ही एकाच मार्गानं चाललेत आणि त्यांना भगवंताकडं जायचं आहे. पण साधकांचेच एकमेकांना अडथळे निर्माण होतात.

एक उदाहरण म्हणून बघू की, शेअर रिक्शानं माणसं सत्संगाला येतात. दोघंही एकाच ठिकाणी येणार असल्यानं लवकर रिक्शा भरली तर पटकन येता येतं. ही एक प्रकारची त्यातली मदतच असते, पण त्यांच्याबरोबर

नको जायला, मागच्या रिक्शानं जाऊ, असं होऊ शकतं ! साधकांच्या साधनेतल्या प्रगतीसंबंधीसुद्धा अडथळा असू शकतो. हे मागनं आले आणि साधनेत पुढं गेले तर, त्यांच्या रिक्शात नको बसायला, त्यांच्याबरोबर नको जपाला बसायला किंवा त्यांच्याकडं नको जपाला जायला, असं होऊ शकतं.

असे सूक्ष्म अडथळे मनुष्यासमोर आहेत. आता आपल्या लक्षात आलं असेल की, ही सात्त्विक शर्यत साधीसुधी नाही. वास्तविक, दोघंही साधक, दोघांचं ध्येय एकच, मार्ग एकच, पंथ कदाचित वेगळा असेल. पण जर भगवंताचीच वाटचाल करायची आहे तर, एकमेकांचा अडथळा का असावा ? पण साधकांचा एकमेकांना, पतीचा पत्नीला, पत्नीचा पतीला, मुलांना, मोठ्यांना, आजोबांना - कशाही प्रकारे एकमेकांना साधक असूनसुद्धा प्रगतीच्या बाबतीत अडथळा होऊ शकतो. हे लक्षात ठेवलं तर, आपल्याला त्याचा त्रास वाटणार नाही. हे आपण का शिकतो आहोत तर, अडथळ्यांच्या शर्यतीत त्रास वाटणार, हे गृहीत धरलं आहे.

पंथाचा अडथळा होतो. अनेक वेळेला विशिष्ट पंथाची बांधिलकी हा अडथळा होतो. वास्तविक, याचा अडथळा होऊ नये. किती पंथांची ही संतमाणसं आहेत. इथं संतछायेत आपण पाहातो की, मुळातच पाच महापंथ किंबहुना त्यांच्यापेक्षा जास्त अशा पंथांतल्या संतांचं वास्तव्य आहे. त्यातले बरेचसे निर्गुणवादी म्हणजे कुठल्याच पंथात नाहीत. इतके सगळे महापुरुष दत्तपंथ ते वारकरी पंथ - अशा अनेक पंथांचे आहेत. सर्वजण सर्वांगांनी एकमेकांशी एकरूप आहेत. मुळातच ते तसे आहेत. खरं पाहिलं तर, त्यांना वेगळे पंथ म्हणूच नये. भगवंताचा मार्ग पहिला काय, दुसरा काय सर्व एकच आहेत. अशा वेळेला पंथाच्या बांधिलकीमुळं दुसऱ्या पंथातलं चांगलं घेता न येणं, हा एक साधनेतला अडथळा निर्माण होतो.

अडथळ्यांचं स्वरूप हळूहळू स्वतःवर येतं, हे आपल्या लक्षात

आलं असेल. बाकीच्यांचं ठीक आहे. पण माझी जी आधीची जीवनपद्धत आहे, तीच माझ्या साधनेच्या आड येते. भगवंताकडं जायला विशिष्ट प्रकारची जीवनपद्धत लागते. कल्पना करा की, मनुष्याचा स्वभाव असा आहे की, त्याला बऱ्याच ठिकाणी हिंडायची सवय असते आणि भगवंताची इच्छा आहे की, तुम्ही घरात बसावं. तर, माझा हिंडण्याचा स्वभाव अडथळा झाला. कारण दहा ठिकाणी गेलो की, दहा विषय डोक्यात येतात. जपाला बसलं की, तेच दहा विषय, भगवंत नाहीच असं होतं. तर अशा तऱ्हेची माझी जीवनपद्धती या सात्त्विक शर्यतीतला अधिक उच्चतर अडथळा आहे.

प्रपंच चालायचा म्हणजे माणसाला नोकरी करावी लागेल, शेती असेल, काही व्यवसाय करावा लागेल. ते चरितार्थाचं साधन झालं. त्यात श्रेष्ठ-कनिष्ठ असणार, पैशाचा संबंध येणार, व्यावसायिक स्पर्धा येणार, कुणी लहान-कुणी मोठं असणार, कुणी मालक-नोकर असणार. पण ज्यावेळी तो सत्संगाला जातो, तेव्हा खरंतर, बाहेरच्या आपल्या लौकिक गोष्टी - भरभराटीचे व्यवसाय, नोकरीतली पदं, वयाचे अधिकार, गरीबी-श्रीमंती - अशा साऱ्या गोष्टी बाहेर ठेवूनच सत्संगात प्रवेश करावा. तर लाभ होतो. पण अनेकांना ते जमत नाही. त्यांच्या बाहेरच्या मोठेपणावर त्यांचं सत्संगातलं स्थान ते नकळत गृहीत धरतात. साधनेतलं लहान-मोठेपण वेगळ्या गोष्टींवर ठरतं. पण हे कळलं नाही तर, सत्संगातसुद्धा ते लौकिक लहानमोठेपण अडथळा ठरतं आणि मनुष्य सत्संगाच्या खऱ्या लाभाला मुकतो.

तीच गोष्ट साधनेत आपल्या वयाच्या ज्येष्ठतेची असते. साधनेत मनुष्य वयाच्या लहानमोठेपणावर लहान-मोठा ठरत नाही. त्याच्या साधनेतल्या प्रगतीवर ठरतो. त्यातसुद्धा साधनेला अनेक वर्षं आलो, अनुग्रह घेऊन खूप वर्षं झाली, किंवा खूप थोर सत्पुरुषांची दर्शनं जास्त प्रमाणात झाली - एवढ्यावर साधनेतलं ज्येष्ठपण ठरत नाही. पण हे लक्षात नाही

आलं तर, अनेकांना या दोन्ही गोष्टी साधनेत पुढं जाण्यात अडथळ्याच्या ठरतात. मग सोळा वर्षांच्या माउलींपेक्षा आपण बरेच मोठे आहोत, असं वाटतं आणि जो गरजेचा आहे तो साष्टांग दंडवत माउलींना घालायलाही अडचण पडते. अर्थात, या अडथळ्यानं नुकसान आपलंच होतं.

आता खूप सूक्ष्म स्वरूपाचा अडथळा म्हणजे आपल्याला येणारे आध्यात्मिक अनुभव होत. माणसाला एक अनुभव आला की, वाटतं पुन्हा तसाच प्रकाश दिसावा, तशीच घटना घडावी, तसाच माणूस भेटावा. तर कशाला तसा परत अनुभव यावा ? ज्या भगवंतानं हे घडवलं त्याला जर गरज वाटत असेल तर घडवील पुन्हा, नाहीतर घडवणार नाही, नाहीतर दुसरं काहीतरी घडवेल. शेवटी भगवंत कर्तुम् - अकर्तुम्- अन्यथा कर्तुम् आहे ना ? त्याचा तो प्रॉव्हिन्स-प्रांत आहे, तो द्यायचं ते देईल, दर्शन देईल, नाहीतर देणार नाही. पण त्या अनुभवांचा विचार करताना, आजची साधना राहाते किंवा आजच्या साधनेत दुर्लक्ष होतं, बाजूला जायला होतं. हा केवढा अडथळा - आपला आपल्याच आलेल्या अनुभवाचा - आहे, याची कल्पना येत नाही.

नामाच्या मार्गामध्ये नामाची शिफारस जास्त केली जाते ती एवढ्यासाठीच की, मुळामध्ये त्यात अनुभवच येत नाही. कित्येक वर्षं मनुष्य नाम घेतो पण त्याला काही अनुभव येत नाही. तो नाराज होतो, खट्टू होतो. काय इतकी वर्षं नाम घेतो पण श्री महाराज साधंसुधं मधाचं बोटसुद्धा लावायला तयार नाहीत. कुठला अनुभव नाही, दर्शन नाही, काही होत नाही. खरंतर, काही होत नाही, हे किती चांगलं आहे ? क्षणभर विचार करा, तुमचा एक अडथळा श्रीमहाराज आधीच काढून घेत आहेत. म्हणजे त्यांची केवढी कृपा आहे, हे लक्षात येईल.

समजा असे दोन-चार अडथळे की, जे अनुभवांच्या स्वरूपांचे

आहेत. तसे आले. नामामुळं चार अनुभव आले. मग आपण गप्प बसू का, हा विचार करावा. काय होईल ? अनुभव आला म्हणून आनंदानं शांत राहाण्यापेक्षा, दुसऱ्या दिवशी सकाळी चहा घ्यायच्या आधीच, तो दुसरीकडं सांगायला जाईल की, 'मला काल रात्री स्वप्नात असा असा अनुभव आला. दर्शन झालं.....' गेली सकाळ जपाची, हो की नाही ? इतकं होऊ शकतं ! अशी आपली मनाची अवस्था आहे. तर आपल्याला अनुभव येऊ देत नाहीत ही आपल्यावर केवढी कृपा असेल ! कर्म आणि त्याचा परिणाम हा अबाधित सिद्धांत आहे. त्यामुळं तुम्ही घेतलेल्या नामाचा परिणाम होणारच आहे. फक्त अनुभवाच्या रूपानं तो मला दिसावा असं जे वाटतं, त्याची आवश्यकता नाही. आपल्या घरात लहान मूल वाढतं की नाही ? त्या महिनाभराच्या बाळाला बघायला माणसं येतात आणि बघून जातात. सहा महिन्यांनी, वर्षभरानं त्यांची खेप होते, तेव्हा 'अरे वा ! बाळ किती मोठं झालं आहे', असं त्यांना वाटतं. घरातल्या माणसांच्या लक्षातच येत नाही की, बाळ मोठं झालं आहे. तसं साधकाच्या प्रगतीच्या बाबतीत असावं !

'लोकांना' जाणवायला पाहिजे की, बाळ मोठं झालं. अनुभवांची गंमत निघाली म्हणून हे बाळाचं उदाहरण आहे. खरी वाढ ही नैसर्गिक वाढ आहे. तो साधक काही फूटपट्टी लावत नाही. माप लावून बघत नाही की, कसा मोठा झाला. तो आपोआप मोठा होतो. इतकं छान होत असताना आपण कशाला अनुभवांचा विचार करावा, कशाला एकमेकांच्या अनुभवांची चिकित्सा करावी ? पण माणूस चिकित्सेत जातो आणि अडथळ्यात येऊन स्वतः अडकून बसतो आणि त्याची प्रगती थांबते. असा हा चिकित्सेचा सात्त्विक शर्यतीमधला एक मोठा आणि सात्त्विकच वाटणारा, असा अडथळा आहे. याहीपेक्षा पुढचा अडथळा, किंबहुना शेवटचा अडथळा म्हणजे, इतक्या अडथळ्यांची शर्यत पार करून, जेव्हा साधकाची खरी प्रगती होते तेव्हा

कधीतरी क्वचित तिची जाणीव होणं. ती जाणीव झाली की, आनंदानं का होईना, कृपेच्या अनुभवानं का होईना, क्षणभर सावधानता जाण्याची शक्यता असते. जर ती तत्काळ परत आणता आली आणि प्रगतीविषयी कृतज्ञ राहून वाटचाल चालू ठेवता आली तर, हा अडथळा ओलांडता येईल. नाहीतर, सापशिडीसारखा पुन्हा परत आपल्याला साधनेत मागं आणून ठेवणारा दुसरा सूक्ष्म अडथळा नाही. म्हणून सावध असावं. एवढे अडथळे आपल्यासमोर आहेत. यातून आपली साधना म्हणजे आपलं ध्येय - भगवंत, नाम, शांती, चित्ताचा पालट, वृत्त्यंतर - काय आपल्याला जे नाव द्यायचं असेल ते द्या. पण ते आपण अनुभवायचं आहे.

आता अडथळे येतात त्यावेळेला असं वाटतं की, परमेश्वराच्यासाठी आपण हे करतो तर, त्यानं थोडे फार अडथळे दूर करावेत. अगदी पहिला अडथळा घरातली माणसं. तिथंपासून आध्यात्मिक अनुभव इथंपर्यंत. तर अशा तऱ्हेचे अडथळे येणार असतील तर भगवंतानं ते दूर करावेत. काहीतरी मार्ग सोपा करावा, काही मदत द्यावी, मार्ग प्रशस्त करावा. असं दगड धोंड्यांतून आपल्याला चालयला लावू नये, असं वाटतं. ही चढण आहे, हे निश्चितच मान्य आहे. पण भगवंतानं शंभरफुटी चढणीमध्ये एक एक फुटाचा अडथळा तयार केला आहे, असं लक्षात घ्यावं आणि म्हणूनच चढण चालणं शक्य आहे. एकदम शंभर फूट चढायला लागलं तर जमणार नाही.

एक अडथळा पार केला की, मग दुसरा अडथळा आहे. पायऱ्या आहेत, म्हणून तो डोंगर चढता येतो, घसरडं ठेवलं तर ? म्हणून अडथळ्यांना त्यांची जागा आहे आणि ती त्यांची त्यांना राहू देत. चढावरती दगडाच्या रूपानं, पायरीच्या रूपानं चढ सुसह्य केलेला असतो. साधनेमध्ये येणारे अडथळे हे आपल्याला साधनेचा कठीणपणा किंवा दुर्गम प्रवास सोपा करत असतात, सुसह्य करत असतात. एकदम जर पायरी दोन फुटाची झाली,

तरीसुद्धा माणसाला चढण चढता येणार नाही. ती अर्ध्या फुटाची, पाऊण फुटाची असते म्हणून मनुष्य चढू शकतो.

हे सगळं लक्षात ठेवलं तर, अडथळ्यांकडं बघण्याची दृष्टी येऊ शकेल आणि ते अडथळे का ठेवलेत ते कळून येईल. ते एकदा लक्षात आलं तर, भगवंताला आपण म्हणू, तुला काय अडथळे ठेवायचे ते ठेव. मी काही वाट सोडायला तयार नाही, भक्ती सोडायला तयार नाही, तुझी दिशा सोडणार नाही. आपण भजन ऐकलं असेल,

'जब जानकीनाथ सहाय करे । तब कौन बिगाड करे तेरो नर,'

ते तसं आहे. तुम्ही निघाल्यापासून भगवंताचं तुमच्याकडं लक्ष आहे. तुम्ही निघाला नव्हतात, तेव्हासुद्धा लक्ष होतंच. साहाय्य होतंच.

त्यामुळं साधना ही अनेक अडथळ्यांची सात्त्विक शर्यत आहे, हे वचनाच्या रूपानं समोर ठेवण्याचं कारण एवढंच की, आपल्याला दृष्टिकोन असावा. ही सात्त्विक शर्यत आहे ती भगवंताकडं नेणारी आहे, सत्त्वाकडं नेणारी आहे. राजस, तामस - यांमधला फरक लक्षात घेऊन निदान उपासनेत तरी राजस, तामस अडथळे असू नयेत.

एक लक्षात ठेवू की, अनेकविध अडथळ्यांची शर्यत आहे तर, असू देत. आपण आपला मार्ग निर्धारानं, आणि रामाच्या-नामावरच्या निष्ठेनं, आणि आत्ता पाहिलं तशा सावधानतेनं चाललो तर, भगवंताचं साहाय्य खात्रीनं होणार आहे. ते आपल्याला त्या ध्येयापर्यंत निश्चितच पोचवेल ! कारण आत्ता पाहिलं तसं - जानकीनाथ सहाय -भगवंताचं साहाय्य आपल्याला आहेच आहे !

।। श्रीराम ।।

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. १३/०९/२००८ च्या निरूपणावर आधारित)

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

सारविस्तार : भाग एक

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

चिंतनक्षण : वचन क्र. एक ते आठ वरील १ निरूपणे

संतछाया